ISSN (Print) : Applied...

जीवन शिक्षण
एप्रिल – मे २०२३
किंमत रु. ६०/–
पृष्ठे ८४ वर्ष : ६८
अंक : १ व २ जोड अंक
पुणे.

# जीवन शिक्षण

Jeevan Shikshan
April - May 2023
Price ₹60
Pages 84 Vol. : 68
Issue : 1 and 2
Pune.



समग्र शिक्षा व **'STARS'** प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन दि. २८ व २९ एप्रिल, २०२३ रोजी द ॲम्बी व्हॅली सिटी, लोणावळा या ठिकाणी करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस मा. ना. श्री. दीपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. रणजितसिंह देओल (भा.प्र.से.), प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. सूरज मांढरे (भा.प्र.से.), आयुक्त (शिक्षण), मा. श्री. कैलास पगारे (भा.प्र.से.), राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई, मंत्रालयीन विभागातील सर्व उपसचिव, कक्ष अधिकारी यांसह मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, मा. श्री. शरद गोसावी, संचालक (प्राथमिक) आणि अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, मा. श्री. कृष्णकुमार पाटील, संचालक, बालभारती आणि माध्य. व उच्च माध्य. शिक्षण संचालनालय, मा. श्री. महेश पालकर, संचालक, योजना शिक्षण संचालनालय आणि अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र चे विविध संचालनालयातील सहसंचालक, सहा. संचालक, उपसंचालक, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

सदर कार्यशाळेत महाराष्ट्र राज्यातील सर्व आयुक्त (म.न.पा.), प्रकल्प अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.), प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, प्रशासन अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना) इत्यादी मान्यवरांनी सहभाग घेतला.















# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६८ | एप्रिल-मे २०२३ | अंक १ ला व २ रा

❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.) — **अध्यक्ष**
संचालक तथा संपादक

**रमाकांत काठमोरे,** — **कार्यकारी संपादक**
सहसंचालक

**डॉ. नेहा बेलसरे** — **सहसंपादक**
प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि
सा. शास्त्रे व कला-क्रीडा

**डॉ. कमलादेवी आवटे,** — **सदस्य**
प्राचार्य, भाषा आणि समन्वय

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**ज्योती उपाशी,** सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

❖ **अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा उपविभाग प्रमुख (प्रसारमाध्यम) — **सदस्य सचिव**

❖ **निर्मिती सहायक :**
अरुण जाधव, अधिव्याख्याता, प्रसारमाध्यम व सी.पी.डी. विभाग

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.

❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** ५७,२५०

❖ **मूल्य : रु. ६०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**

**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

## अंतरंग

| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ शालेय शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - मसुदा सारांश | डॉ. दत्तात्रय थिटे | ५ |
| ❖ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य | अरुण जाधव | १४ |
| ❖ महाराष्ट्र निर्मितीची कथा | प्रा. डॉ. गणेश राऊत | १७ |
| ❖ महाराष्ट्र गीत : जय जय महाराष्ट्र माझा | श्रीकांत चौगुले | २५ |
| ❖ शालेय जीवनातून व्यावसायिक कौशल्यांचा विकास | डॉ. इब्राहिम नदाफ | २८ |
| ❖ निपुण भारत : निपुण महाराष्ट्र | रूपाली कस्तुरे | ३० |
| ❖ बोलक्या भिंतींची बोलकी शाळा, लाविते ज्ञानाचा लळा... | डॉ. उत्तम तानवडे | ३३ |
| ❖ फिरते वाचनालय | भीमराव शिंदे | ३५ |
| ❖ रानातली शाळा | विजय उरकुडे | ३६ |
| ❖ असा साधला संवाद | दीपाली शेडगे | ३७ |
| ❖ प्रत्ययान्त किंवा प्रत्ययघटित शब्दांचे लेखन | सलिल वाघमारे | ४० |
| ❖ संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्पाचे अनुभवामृत | भारती देशमुख | ४६ |
| ❖ छोटे प्रयोगकर्ते | लता गवळी | ४८ |
| ❖ चित्रवाचन | प्रमोद धायगुडे | ५१ |
| ❖ शिकण्यासाठी साधने | मंगेश जाधव | ५४ |
| ❖ शालेय शिक्षणात उद्योजकता : काळाची गरज | डॉ. संतोष आगरकर | ५७ |
| ❖ दृष्टीचे रक्षण करूया, सृष्टीचा आनंद घेऊया... | प्रतिभा नवले | ५९ |
| ❖ सुट्टी, अभ्यास आणि मौजमस्ती | उर्मिला लंबे | ६२ |
| ❖ पाहुण्यांची शाळेला अचानक भेट | नवनाथ जाधव | ६४ |
| ❖ पत्रलेखन | डॉ. कैलास दौंड | ६६ |
| ❖ विज्ञानकोडे सोडवूया, शास्त्रज्ञ बनूया... | करुणा गावंडे-जांभुळकर | ६८ |
| ❖ माझा वर्ग : माझा उपक्रम | आरती पाटील | ७० |
| ❖ विद्यार्थियों के मानसिक विकास में शिक्षक की भूमिका | डॉ. पूनम शिंदे | ७२ |
| ❖ शब्दकोडे | नंदा कुलकर्णी | ७७ |
| ❖ मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या योजना (क्रमश:) | डॉ. द. वि. चिक्करमने | ७८ |
| ❖ इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ८२ |

*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....✍



मित्रांनो,

१ मे हा दिवस महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राची निर्मिती शेतकरी, कामगार यांच्या श्रमाने झाली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महाराष्ट्रातल्या कष्टकरी आबालवृद्धांनी हिरिरीने सहभाग घेतला होता. त्या लढ्याची आठवण आपण मनात तेवत ठेवली पाहिजे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पुढील ओळी आठवतात...


*राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा,*
*नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा,*
*प्रणाम घ्यावा, माझा हा, श्री महाराष्ट्र देशा...*

भारताच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्फूर्तिदायक व सर्व नागरिकांना प्रेरणा देणारे 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे गीत १९ फेब्रुवारी, २०२३ पासून महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून स्वीकारण्यात आले आहे.

राज्य शालेय शिक्षण मंडळाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये या राज्यगीताचा समावेश येत्या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे. या राज्यगीताचा प्रभावी प्रचार व प्रसिद्धी, यांसाठी सर्व विभागांनी आपल्या अधिनस्त आस्थापनांस/कार्यालयांस योग्य त्या सूचना द्याव्यात असे नमूद करण्यात आले आहे.

माहे एप्रिल–मे २०२३ च्या जोडअंकात विविध विषयांना स्पर्श करण्यात आला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून शालेय शिक्षणासाठीचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा दि. ६ एप्रिल, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. यासंबंधीचा अभ्यास, जाणीव–जागृती व अभिप्राय देण्यासाठी सारांश स्वरूपातील लेख अंकात समाविष्ट करण्यात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाजातील सर्व घटकांनी पुन्हा पुन्हा अभ्यासावे, चिंतन करावे असेच आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा उपयोग भावी पिढ्यांसाठी नक्की होईल यात शंकाच नाही. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र निर्मितीची कथा अंकात देण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र गीत : जय जय महाराष्ट्र माझा, शालेय जीवनातून व्यावसायिक कौशल्यांचा विकास, निपुण भारत : निपुण महाराष्ट्र, बोलक्या भिंतींची बोलकी शाळा, लाविते ज्ञानाचा लळा, फिरते वाचनालय, रानातली शाळा, असा साधला संवाद, प्रत्ययान्त किंवा प्रत्ययघटित शब्दांचे लेखन, संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्पाचे अनुभवामृत, छोटे प्रयोगकर्ते, चित्रवाचन, शिकण्यासाठी साधने, शालेय शिक्षणात उद्योजकता : काळाची गरज, दृष्टीचे रक्षण करूया, सृष्टीचा आनंद घेऊया, सुट्टी, अभ्यास आणि मौजमस्ती, पाहुण्यांची शाळेला अचानक भेट, विज्ञानकोडे सोडवूया, शास्त्रज्ञ बनूया, पत्रलेखन, माझा वर्ग: माझा उपक्रम, विद्यार्थियों के मानसिक विकास में शिक्षक की भूमिका व इतिहासाच्या पानांवरून अशा विविध विषयांवरील लेखांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालकांना हे लेख उपयुक्त व दिशादर्शक ठरतील असा मला विश्वास आहे.

महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
तथा संपादक, जीवन शिक्षण

# शालेय शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - मसुदा सारांश

**डॉ. दत्तात्रय थिटे**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
संशोधन विभाग, रा.शै.सं. व प्र.प.पुणे.
**भ्रमणध्वनी :** ९१३०८५८०५६


आपल्या देशात राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. शिक्षणातील सर्वच घटकांनी पायाभूत स्तराबरोबरच, शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये अंतर्भूत शालेय शिक्षणाची संरचना वयोगट ३ ते १८ साठी ५+३+३+४ या चार स्तरांमध्ये अनुक्रमे पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, मध्य स्तर व माध्यमिक स्तर अशी विभागली आहे. त्याचाच एक भाग सुरुवातीची ५ वर्षे बालशिक्षणाची असून या स्तरावर वयोगट ३ ते ८ वर्षे निश्चित केलेला आहे. बालवाटिकासाठी वयोगट ३ ते ६ वर्षे आणि इयत्ता पहिली व दुसरीसाठी वयोगट ६ ते ८ वर्षे निश्चित करण्यात आला आहे. पायाभूत स्तरासाठी ऑक्टोबर, २०२२ मध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा जाहीर झालेला आहे. तसेच शालेय शिक्षणासाठीचा 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' मसुदा स्वरूपात दि. ६ एप्रिल, २०२३ रोजी प्रकाशित झाला आहे.

मित्रांनो, आपल्या व्यावसायिक सेवा क्षेत्रात बदल घडवणारा शालेय शिक्षणासाठीचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा मसुदा संक्षिप्त रूपात पाहू या.

### शालेय शिक्षण आराखड्याचे स्वरूप :

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी सक्षमपणे करण्यासाठी ३ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या शिक्षणाला प्रस्तुत आराखडा संबोधित करतो. शैक्षणिक धोरणात संकल्पित केल्याप्रमाणे ५+३+३+४ या चार स्तरांवर इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंतचा अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रातील वचनबद्धता स्पष्ट केली आहे. लक्ष्य निर्देशित, सरावातून सक्षम बनवणारा, शैक्षणिक वैधता असणारा, आकर्षक, सुधारणेकडे वाटचाल करणारा, भारतीय विविधतेचा स्वीकार करणारा व अभ्यासक्रमातील घटक परस्पर मजबूत करणारा एकात्मिक अभ्यासक्रम ही प्रस्तुत अभ्यासक्रम आराखड्याची वैशिष्ट्ये आहेत, असे म्हणता येईल. सदर आराखडा पाच भागांमध्ये विभागला आहे; ते भाग पुढीलप्रमाणे :

> *राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार NCERT, नवी दिल्ली यांनी दि. ६ एप्रिल, २०२३ रोजी, 'शालेय शिक्षणासाठीचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–मसुदाप्रत' https://ncert.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. सदर आराखड्यामध्ये शालेय शिक्षणाचे स्वरूप आणि त्याचे पाच भाग, पंचवीस प्रकरणांतून विस्तृत स्वरूपात देण्यात आले आहेत. तसेच शालेय शिक्षणाची उद्दिष्टे, अभ्यासक्रमाची क्षेत्रे, शिकण्याची मानके, आशय, अध्यापनशास्त्र व मूल्यांकन यांविषयीचा दृष्टिकोन इ. बाबींची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. या धोरणानुसार पालक, शिक्षक, समाज व शिक्षण यंत्रणेतील सर्व घटक यांची भूमिकादेखील महत्त्वाची आणि साहाय्यभूत ठरणार आहे. त्यासाठी सर्व घटकांनी मसुद्याचे वाचन, चिंतन करून त्यावरील महत्त्वपूर्ण सूचना, अभिप्राय ncf.ncert@ciet.nic.in या ई–मेल पत्त्यावर पाठवाव्यात.*




याप्रमाणे प्रस्तुत आराखड्याची मांडणी पाच भागांत आणि पंचवीस प्रकरणांत विस्तृत स्वरूपात करण्यात आलेली आहे.

**भाग अ – दृष्टिकोन :**

अभ्यासक्रम आराखड्याच्या या भागात शालेय शिक्षणाची उद्‌दिष्टे, अभ्यासक्रमाची क्षेत्रे, शालेय स्तराचे तर्क आणि संरचना, तसेच प्रत्येक स्तरावर शिकण्याची मानके, अध्यापनशास्त्र, आशय व मूल्यांकन या विषयीचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

**भाग ब – शालेय विषय/क्षेत्र :**

पायाभूत स्तर, भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, कला, शारीरिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, आंतरविद्याशाखीय क्षेत्रे व माध्यमिक स्तरावरील इयत्ता अकरावी व बारावी या शालेय विषयांची व्याप्ती व स्वरूप सखोल दिलेले आहे.

**भाग क – क्रॉस कटिंग थिम्स :**

मूल्ये, समावेशन, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, पर्यावरण आणि भारतात रुजलेले ज्ञानघटक यांचा समावेश अभ्यासक्रमात एकात्मिक पद्धतीने अंतर्भूत केलेला आहे.

**भाग ड – शालेय संस्कृती व प्रक्रिया :**

शालेय संस्कृती व शालेय प्रक्रिया यांसाठी आवश्यक बाबी या भागात स्पष्ट केल्या आहेत.

**भाग इ – साहाय्यक वातावरण :**

शिकण्यासाठी योग्य वातावरण तयार करणे, विद्यार्थी शिक्षक प्रमाण, शिक्षक सक्षमीकरण आणि शैक्षणिक व प्रशासकीय कार्यालयांची भूमिका या भागात अपेक्षित केली आहे.

प्रत्येक मुख्य भागाचा सारांश सविस्तरपणे पुढे दिला आहे.

**भाग अ – दृष्टिकोन :**

शालेय शिक्षणाची अपेक्षित उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ज्ञान, क्षमता, मूल्ये व वृत्ती यांची मांडणी अभ्यासक्रमाच्या रचनेत सुयोग्यरीत्या केलेली असते. प्रत्येक व्यक्तीने त्याची संपादणूक करणे हे शिक्षणाचे प्रमुख उद्‌दिष्ट आहे.

प्राचीन भारतीय मूलतत्त्वे ज्ञानाची वैधता प्रमाणित करतात. त्यामध्ये प्रत्यक्षता, अनुमान, उपमान, अर्थापत्ती व अनुपलब्धी यांवर सिद्ध झालेले ज्ञान वैध मानले जाते. ज्ञान कोणते? काय जाणणे? म्हणजेच आशय. आशयज्ञानातून व्यक्तींच्या क्षमतांचा विकास, मूल्यांची रुजवणूक व त्यातून व्यक्तींची वृत्ती व व्यक्तिमत्त्व घडवणे हे शिक्षणाचे कार्य आहे.

**शालेय शिक्षणाच्या उद्‌दिष्टांची मांडणी खालीलप्रमाणे :**

शालेय शिक्षणातून ज्ञानी, निरोगी आणि क्षमता व मूल्ये असलेल्या व्यक्तींचा समाज घडेल. लोकशाही अर्थव्यवस्थेत प्रभावीपणे सहभागी होणारा गतिमान, बहुलवादी आणि लोकशाही वृत्ती आणि संस्कृती जोपासणारा एक समाज असेल. अभ्यासक्रमाच्या या आराखड्यात उद्‌दिष्टांची मांडणी खालीलप्रमाणे :

(अ) तर्कशुद्ध विचार आणि स्वायत्तता,
(ब) आरोग्य आणि कल्याण,
(क) समाज सहभाग,
(ड) आर्थिक सहभाग,
(इ) सांस्कृतिक व सामाजिक सहभाग.

यांवर आधारित आहे. औपचारिक शैक्षणिक संस्था म्हणून शाळांचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, क्षमता, मूल्ये व वृत्ती यांचा विकास करणे हा आहे.

शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नैतिक मूल्ये, लोकशाही मूल्ये, ज्ञानरचनावादी मूल्ये, सकारात्मक कार्यवृत्ती, भारतीय मूळ तत्वज्ञानाचा अभिमान, या मूल्यांचा शिक्षणाचा एक भाग म्हणून मांडणी केली आहे. मूल्ये आणि वृत्ती हे कृती करण्यासाठी प्रेरणा देतात; परंतु कुशलतेने वागण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट क्षमता असणे आवश्यक आहे. यामध्ये पृच्छा, संप्रेषण, समस्या निराकरण, तार्किक कारणमीमांसा, आरोग्य, सौंदर्य व सांस्कृतिक क्षमता आणि सामाजिक प्रतिबद्धता यांचा समावेश होतो.

### अभ्यासक्रमाची क्षेत्रे :

शैक्षणिक उद्दिष्टांवर आधारित अभ्यासक्रमाची क्षेत्रे, स्तरांनुसार विशिष्ट अभ्यासक्रमात ज्ञान, क्षमता, मूल्ये व वृत्ती यांमध्ये विभागली आहेत. ही विभागणी केवळ वर्ग, शिक्षक, वेळापत्रक यांची व्यावहारिक गरज म्हणून नव्हे; तर अभ्यासक्रमाच्या अंतर्गत तर्कावर केलेली आहे. भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, कला, शारीरिक शिक्षण इत्यादी विषयांची मांडणी प्रत्येक स्तरावर सुनिश्चित केली आहे.

### शालेय स्तर : तार्किक संरचना :

बालविकासाचे वर्णन वयाशी संबंधित कालावधीशी केले जाते. मुलांच्या बाल्यावस्था ते किशोरावस्थेच्या कालावधीत शालेय शिक्षण होत असते. बालकाच्या नैसर्गिक वाढीबरोबर शारीरिक, बौद्धिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व नैतिक विकास होत असतो. भारतीय तत्वज्ञानात विकासाचे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय हे पंचकोश सांगितले आहेत. बालकाची वाढ व विकासाच्या प्रत्येक टप्प्याची वैशिष्ट्ये लक्षात घेता मुलांचा संकल्पना विकास, मूलभूत साक्षरता विकास, आकलनात्मक, व्यावहारिक व सैद्धांतिक संकल्पना यांवर आधारित शालेय शिक्षण अभ्यासक्रमाची संरचना केली आहे. त्याप्रमाणे पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, मध्य स्तर व माध्यमिक स्तर या चार स्तरांत विभागणी केली आहे.

### शिकण्याची मानके, आशय, अध्यापनशास्त्र व मूल्यांकन या विषयीचा दृष्टिकोन :

शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शाळांनी नेमके काय करावे याची सुस्पष्टता येण्यासाठी या अभ्यासक्रम आराखड्यात शैक्षणिक मानके दिलेली आहेत. शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर शिक्षणाची उद्दिष्टे, अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती ही मानके निश्चित करण्यात आली आहेत. शैक्षणिक धोरणात अपेक्षित आशय अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यात आला आहे. यामध्ये गरजाभिमुख समग्र विचार, शोध व चर्चा, विश्लेषणावर आधारित संकल्पनात्मक प्रयोग आणि समस्या सोडविणाऱ्या आशयाचा समावेश आहे. अभ्यासक्रमात अनिवार्य विषय, अध्ययनशील वातावरण, अध्ययन साहित्य, पाठ्यपुस्तके यांविषयीचा समग्र दृष्टिकोन विस्तृत स्वरूपात दिलेला आहे. अध्यापनशास्त्राचाही सखोल विचार या आराखड्यात मांडला आहे. मुलांची निरोगी वाढ व शिकणे यांचा परस्परसंबंध विचारात घेऊन अध्यापनशास्त्राचा विचार केला आहे. नावीन्यपूर्ण व परिणामकारक अध्यापनपद्धतींचा समावेश प्रत्येक स्तरावर केला आहे. अध्यापनशास्त्रविषयक सर्वसमावेशक तत्त्वे सांगितली आहेत. यामध्ये वर्ग व्यवस्थापन, विद्यार्थी वर्तन व विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी शिक्षकांचे नियोजन महत्त्वाचे ठरते. शिक्षणाचे मूल्यांकन, शिक्षणासाठी मूल्यांकन व शिक्षण म्हणून मूल्यांकन या स्वरूपात मूल्यांकन दृष्टिकोन

स्पष्ट केला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचे यथार्थ मूल्यांकन, चांगल्या मूल्यांकनाची तत्त्वे, सध्याची आव्हाने, संकलित व आकारिक मूल्यांकन तसेच इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्याबाबत सूचित केले आहे. प्रत्येक स्तरावरील शालेय वेळापत्रकात सर्व विषयांना समान वेळ देण्यात आला असून, प्रत्येक तासिकेच्या मधे पूर्वतयारीसाठी ५ मिनिटांचा अवधी देण्यात आला आहे.

### भाग ब – शालेय विषय/क्षेत्र :

नवीन शैक्षणिक आकृतिबंधातील सुरुवातीची पाच वर्षे पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर तीन वर्षे (इ. तिसरी ते पाचवी), मध्यस्तर तीन वर्षे (इ. सहावी ते आठवी), व माध्यमिक स्तर चार वर्षे (इ. नववी ते बारावी) अशी आहेत. या प्रत्येक स्तराच्या अभ्यासक्रमात शैक्षणिक मानके निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार शैक्षणिक उद्दिष्टे, अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्तींनुसार अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे.

### (१) राष्ट्रीय अभ्यासक्रमातील पायाभूत स्तर :

बालशिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (बालशिक्षण ते इयत्ता दुसरीपर्यंत) यापूर्वीच ऑक्टोबर, २०२२ मध्ये जाहीर झाला असला तरी, प्रस्तुत आराखड्यात संक्षिप्त रूपात शालेय शिक्षणात सलगता यावी या उद्देशाने दिलेला आहे. अभ्यासक व शिक्षकांनी तो स्वतंत्रपणे अभ्यासणे आवश्यक आहे.

### (२) भाषा शिक्षण :

मानवी विकासात भाषा शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शालेय शिक्षणात भाषा शिक्षणातून साक्षरता प्राप्त करणे, परिणामकारक संवाद कौशल्ये, नवनिर्मिती व बहुभाषिक क्षमता विकसित करणे अपेक्षित केले आहे. आज भाषा शिक्षणात निरक्षरता, पाठांतर, निरस अध्यापनशास्त्रीय योजना, दर्जा नसलेले शैक्षणिक साहित्य अशी अनेक आव्हाने आहेत. या अभ्यासक्रम रचनेत त्रिभाषा सूत्र वापरले आहे. प्रत्येक स्तरासाठी दिलेल्या शैक्षणिक मानकांच्या स्वरूपात अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती विधाने सुस्पष्ट दिलेली आहेत. वाचन–लेखनाची प्रथम भाषा १ (R1), द्वितीय भाषा २ (R2) व तृतीय भाषा ३ (R3) देण्यात आली आहे.

पूर्वतयारी स्तरावर दोन भाषा सुचविलेल्या आहेत. भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले आहे. भाषा (१) व (२) साठी एकूण ५ अभ्यासक्रमांची ध्येये निश्चित केली असून अनुक्रमे १७ व १५ क्षमतांचा समावेश केला आहे. या स्तरावर मौखिक काम, वाचन व लेखन कौशल्ये व शब्दसंग्रह विकास यांवर आशय व अध्यापनशास्त्रात भर देण्यात आला आहे.

मध्य स्तरावर त्रिभाषा शिक्षण योजले आहे. भाषा (१) व (२) साठी पाच व भाषा (३) साठी तीन अभ्यासक्रमांची ध्येये निश्चित असून अनुक्रमे १६, १० व ७ एकूण क्षमतांचा समावेश केला आहे. या स्तरावर कार्यात्मक वाचन, साहित्य वाचन, चिकित्सक वाचन, आवडीचे वाचन या कौशल्यांवर भर असून लेखनामध्ये निबंध, अहवाल, अनुभव, टीकात्मक लेखन यांचा समावेश केलेला आहे. माध्यमिक स्तरावर नववी व दहावीसाठी भाषा (१), भाषा (२) व भाषा (३) साठी अनुक्रमे एकूण पाच, दोन व एक अभ्यासक्रमाची ध्येये असून यामध्ये अनुक्रमे १४, ६ व २ क्षमता निश्चित केलेल्या दिसून येतात. या स्तरावर मौखिक सादरीकरण, भाषिक कौशल्यांचा विकास, बहुसांस्कृतिकता, कार्यात्मक लेखन कौशल्य यांवर भर देण्यात आला आहे. सर्व स्तरांवर आकारिक व संकलित स्वरूपाचे मूल्यमापन विविध तंत्रांसह देण्यात आलेले आहे.

## (३) गणित शिक्षण :

मानवी जीवन व्यवहारात गणित सर्वत्र व्यापलेले आहे. गणित शिक्षणातून गणितीय भाषा, आशय समजणे, आकृतिबंध शोधणे, अनुमान काढणे, तार्किक तर्काने समर्थन करणे या क्षमतांचा विकास केला जातो. गणितीय संवाद लेखी व तोंडी, संख्याज्ञान व क्रिया, भूमिती, बीजगणित यांचे वैचारिक आणि प्रक्रियात्मक ज्ञान; यांतून सर्जनशीलता, समस्या सोडवणे, कुतूहल व आवड निर्माण होणे या स्वरूपात गणित शिक्षणाची उद्दिष्टे दिलेली आहेत.

पूर्वतयारी स्तरावर गणित शिक्षणासाठी एकूण अभ्यासक्रमाची ५ ध्येये निश्चित केली असून, १८ क्षमतांचा समावेश केला आहे. मध्य स्तरावर अभ्यासक्रमांची एकूण ९ ध्येये असून २९ क्षमतांचा समावेश केला आहे. तसेच, माध्यमिक स्तरावर अभ्यासक्रमांची एकूण १० ध्येये असून ३१ क्षमतांचा समावेश केला आहे. या स्तरावर आशय निवडताना संकल्पनांची व्याप्ती विस्तारत जाईल असे अपेक्षित आहे. आशयाचे साहित्य व स्रोत यांची सलगता व एकबंधता पाठ्यपुस्तके व कार्यपुस्तिका यांमध्ये असायला हवी. शोधावर आधारित, कृतियुक्त, पृच्छा, समस्या निराकरण, उद्गामी, अवगामी यांसारख्या अध्यापनपद्धती वापरण्यात याव्यात. विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी समजून उपचारात्मक अध्यापन करण्यात यावे. भाषा, गणित, कला, खेळ अशा शालेय विषयांचे अभ्यासक्रमीय एकात्मीकरण साधलेले आहे. मूल्यमापनासाठी विविध साधने व तंत्रांचा वापर करून आकारिक व संकलित प्रकारचे मूल्यमापन दिले आहे.

## (४) विज्ञान शिक्षण :

विज्ञान ही आपल्या अवतीभोवतीचे जग समजून देणारी एक ज्ञानशाखा आहे. ज्ञानाची पडताळणी, वैधता, मूल्ये आणि क्षमता, प्रश्ननिर्मिती, गृहीतके, पृच्छा, परिणामांची कारणे व कारणांचा परिणाम, नवनिर्मिती विचार, निर्णय घेण्याची क्षमता यांसाठी विज्ञानाचे महत्त्व आहे. शालेय शिक्षण हा विज्ञान शिक्षणाचा पाया आहे. निरीक्षण, अनुभव व प्रयोग करून विज्ञानाचे आकलन दृढ होते. बदलणारे भौतिक जग, विकास क्षमता, वृत्ती व मूल्ये, गतीने होणारे बदल व त्याची कारणमीमांसा, सामाजिक, आर्थिक, तांत्रिक विकासासाठी आवश्यक नवीन ज्ञानाची गरज विज्ञान शिक्षणातून भागते. विज्ञान शिक्षणात वैज्ञानिक ज्ञानाची समज विकसित करणे, शास्त्रीय पद्धती, शास्त्रीय माहितीचा उपयोग, इतर अभ्यासक्रमांचा विज्ञानाशी तसेच तंत्रज्ञान व समाज सहसंबंध प्रस्थापित करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे इ. उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**पूर्वतयारी स्तर :** विद्यार्थी जवळच्या परिसराचे निरीक्षण करून सभोवतालच्या वस्तूंशी खेळू लागतात. या स्तरावर अभ्यासक्रमाचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारून एकात्मिक स्वरूपात विज्ञान शिकण्यासाठी आवश्यक क्षमता विकसित केल्या जातात.

**मध्य स्तर :** मध्य स्तरापासून विज्ञान विषयाच्या शिक्षणाची सुरुवात होते. या स्तरावर अभ्यासक्रमाची एकूण ७ ध्येये निश्चित केली असून २४ क्षमतांचा समावेश केला आहे. परिसरातील घटना किंवा बदलाचे निरीक्षण करून शास्त्रीय स्पष्टीकरण देता येणे, परिसराची विविधता लक्षात घेऊन वर्गीकरण करता येणे अपेक्षित आहे.

**माध्यमिक स्तर :** माध्यमिक स्तरासाठी अभ्यासक्रमाची एकूण ७ ध्येये निश्चित केली असून २६ क्षमतांचा समावेश केला आहे. यामध्ये शास्त्रीय माहितीचे उपयोजन, प्रक्रियांचे विश्लेषण, कार्यकारणसंबंध इत्यादी क्षमतांचा समावेश केला आहे.

विज्ञान शिक्षणातून वैज्ञानिक मूल्ये, तसेच त्यांची जोपासना, सहिष्णुता, एकात्मता इत्यादी मूल्ये आणि आकृतिबंध यांची पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी निरीक्षण, शोधन, संकलन, विश्लेषण, पडताळा, प्रक्रिया, प्रकल्प, पृच्छा, दिग्दर्शन यांसारख्या शास्त्रीय पद्धतींचा उपयोग केला आहे. प्रयोगशाळा→ वर्ग → निसर्गक्षेत्र हा अध्यापन पद्धतींचा एक मार्ग दर्शविते. विज्ञान अध्यापनातून सहयोग, संवेदनशीलता, समता, संधींची समानता या मूल्यांसह वैज्ञानिक ज्ञानाची समज विकसित करणे, शास्त्रीय माहितीचे उपयोजन, इतर अभ्यासक्रमातील संबंध, तंत्रज्ञान व समाज सहसंबंध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे अपेक्षित आहे. तक्ते, प्रतिमाने, प्रयोगशाळा, विज्ञान कोपरे यांद्वारे वर्ग व्यवस्थापन सुचविण्यात आलेले आहे. मूल्यमापनासाठी आकारिक व संकलित प्रकाराने विविध साधनतंत्रांचा उपयोग करता येईल.

### (५) सामाजिक शास्त्र शिक्षण :

सामाजिक शास्त्र शिक्षणातून मानवी समाजाचा आणि व्यक्तींमधील संबंधांचा पद्धतशीर अभ्यास केला जातो. सुजाण नागरिक म्हणून बदलणाऱ्या जगाला समजून घेणे आणि समाजात सहभागी होऊन सहानुभूतीने जबाबदारी घेणे महत्त्वाचे आहे. इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या शाखांच्या आशयातून एकात्मिकरीत्या समाज, सामाजिक संस्था व त्यांची कार्ये समजून दिली आहेत. शालेय शिक्षणाच्या मध्य स्तरापासून या विषयाचे अध्ययन सुरू होते. अध्ययनार्थीच्या जवळची स्थानिक परिस्थिती, प्रादेशिक विभाग, राष्ट्र व जग यांमधील संबंध समजणे आवश्यक आहे. माध्यमिक स्तरावर उपरोक्त चारही शाखांतील आशयाचा संकल्पनात्मक सखोल अभ्यास एकात्मिक पद्धतीने संरचित आहे. ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांच्या परस्पर संवादाद्वारे चालणाऱ्या समाजाचे कार्य व प्रक्रिया यांचे ज्ञान व समज विकसित करणे, सामाजिक प्रश्नांची उकल करणे तसेच मानवी, नैतिक आणि संविधानात्मक मूल्यांची जोपासना करणे ही या विषयाची प्रमुख उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

मध्य स्तरासाठी सामाजिक शास्त्र विषय शिक्षणासाठी अभ्यासक्रमाची एकूण ९ ध्येये निश्चित केली असून २३ क्षमतांचा समावेश केला आहे. इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या शाखांचा एकात्मिक आशय दैनिक घटना, निरीक्षणे आणि वास्तवतेची ओळख या स्तरांवर अपेक्षित आहे. लोकल ते ग्लोबल स्वरूपाचा आशय निवडताना २० टक्के स्थानिक, ३० टक्के प्रादेशिक, ३० टक्के राष्ट्रीय आणि २० टक्के जागतिक आशय उदाहरणांसह देण्यात आलेला आहे.

माध्यमिक स्तरावरदेखील चारही शाखांचा एकात्मिक आशय अपेक्षित आहे. दोन्ही स्तरांची पाठ्यपुस्तके, डिजिटल साहित्य, नकाशे, लिखित संदर्भ, समकालीन दृश्य कला यांचा त्यात समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थी उत्तम श्रोते व कृतिप्रवण व्हावेत, प्राप्त ज्ञानातून नवीन ज्ञाननिर्मिती व्हावी यांसाठी जीवनाभिमुख सामाजिक शास्त्र, आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन, वर्गातील आंतरक्रिया अनुभवाशी जुळणाऱ्या, कल्पनाशक्तीचा विकास, वाद–संवाद यांद्वारे मुलांचे शिकणे व्हावे हे अपेक्षित आहे. प्रश्न पद्धती, अनुभव, संधी, अध्ययन कृती, प्रकल्प, भूमिका अभिनय, चेतना, चर्चा, क्षेत्रभेट इत्यादी पद्धतींचा उपयोग करता येईल. आकारिक व संकलित प्रकारचे मूल्यमापन दोन्ही स्तरांवर अपेक्षित आहे.

### इतर विषय :

कलाशिक्षण वैयक्तिक व सामूहिक मानवीकृतींची उच्चतम श्रेणी असून, त्याद्वारे सर्जनशील, नावीन्यपूर्ण,

कल्पक अभिव्यक्ती, सांस्कृतिक प्रतिबद्धतेस वाव देते. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये कल्पना व भावना व्यक्त करण्यासाठी रंगकाम, कागदकाम, संगीत, आणि नाट्य यांतून अहिंसा, प्रेम, मैत्रभाव, शांतता या सामाजिक व मानवीमूल्यांचा विकास होतो. पूर्वतयारी, मध्य, माध्यमिक या सर्व स्तरांवर दृश्य, नाट्य, नृत्य व संगीत या कलांचा समावेश केला आहे. यांमधून विचारप्रक्रिया व उत्पादक प्रक्रिया यांचा विकास साधला जाईल.

सभोवतालचे बदलते जग, पर्यावरण शिक्षण, विज्ञान व सामाजिक शास्त्रात पर्यावरण शिक्षणाचा एकात्मिक समावेश, आव्हाने पेलण्याची क्षमता विकसित करणे याप्रमाणे विद्याशाखीय क्षेत्रे निश्चित केली आहेत. त्यामधून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व पर्यावरण शिक्षण यांसारख्या घटकांचा आशयात अंतर्भाव केला आहे.

शारीरिक हालचाली, लयबद्ध संचालन, व्यायाम, योग, क्रीडा प्रकार व मनोरंजक खेळ यांतून सांघिक वृत्ती तसेच खिलाडू वृत्तीचा विकास साधला जाईल. लवचिकता, स्नायूंचा विकास, कारक कौशल्ये व मनोशारीरिक विकास होण्यासाठी कृतींची योजना केलेली आहे. यांमधून संघकार्य, सहकार्य, समस्या निराकरण, शिस्त, जबाबदारी, तणावमुक्ती व नेतृत्व यांचा विकास होतो. सर्वांना समान संधी असून सर्व स्तरांसाठी शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम निश्चित केलेला आहे.

माध्यमिक स्तरावरील इयत्ता अकरावी व बारावी शिक्षण स्तरासाठी मानव्यविद्या – तत्वज्ञान व इंग्रजी, सामाजिक शास्त्रे – इतिहास व समाजशास्त्र, विज्ञान– जीवशास्त्र व रसायनशास्त्र, गणित, कला, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण व आंतरविद्याशाखीय विषयांचा विचार केलेला आहे. इयत्ता बारावी नंतर उच्च शिक्षणासाठी सहज स्थानांतरण होण्याकरिता अभ्यासक्रमात लवचिकता, संकल्पनात्मक आकलनावर भर आणि बहुविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे.

सर्व स्तरांवरील विषय योजनेची शैक्षणिक उद्दिष्टे, अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती निश्चित करण्यात येत आहे. अध्यापनशास्त्र, पद्धती, अध्ययन अनुभव, साधने, तंत्रे, आशय निश्चिती आणि मूल्यमापन यांविषयी भाष्य करण्यात आले आहे. अध्ययननिष्पत्तींच्या विकसनाचे काम सुरू असून आपले अभिप्राय एनसीईआरटीला अपेक्षित आहेत.

### भाग क – क्रॉस कटिंग थिम्स :

**(१) मूल्ये :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तत्त्वांमध्ये अंतर्भूत, भारतीय संविधानिक मूल्ये रुजलेला नागरिक घडविण्याची अपेक्षा शिक्षणातून व्यक्त केली आहे. मानवी मूल्यांची जोपासना करणारा, तार्किक क्षमता, समावेशन, सहानुभूती व वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला आणि नवनिर्मितीक्षम, उत्पादक, कृतिप्रधान व समतेच्या पायावर आधारलेला बहुआयामी समाज विकसित होण्यासाठी या घटकाचा एकात्मिक स्वरूपात अभ्यासक्रमात समावेश केला आहे. शाळांमधून मूल्यांची रुजवणूक कार्य संस्कृतीतून, विविध उपक्रम व कृतींतून, आशयाच्या आकलनातून आणि भारतीय सांस्कृतिक विविधतेच्या पायावर परिपाठातील नियमित सरावातून केली जाते. अभ्यासक्रम आराखड्यात या विषयी महत्त्वाचे तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मूल्यशिक्षण हा स्वतंत्र विषय म्हणून प्रभावी ठरेल का? मुलांच्या जीवनसंघर्षात शिकलेली मूल्ये व त्यातील फरक यांबाबत आपण काय कराल? मूल्यांच्या विकासाचे मूल्यमापन करता येईल का? या तीनही प्रश्नांची उत्तरे साधी, सोपी, सरळ नाहीत. शालेय वातावरणातील सर्व

घटकांच्या कार्य संस्कृतीतून, नियमित सरावातून हे साध्य होऊ शकते.

**(२) समावेशन** : सद्य:स्थितीत देशात विविध स्तरांवर असमानता दिसून येते. गरिबी, सामाजिक भिन्नता, अपवादात्मक अभ्यासक्रम यांतून समावेशन आणि समता प्रस्थापित करण्यासाठी अडथळे निर्माण होत आहेत. गळती, लिंगभेद, सामाजिक-सांस्कृतिक भिन्नता, भौगोलिक असमानता, दिव्यांग बालके, अध्ययन अक्षमता, स्थलांतरण, अल्पसंख्याक इत्यादींबाबत समवेशित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी शालेय भौतिक सुविधा, अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके आणि अध्यापनशास्त्र यांमध्ये समावेशन तत्त्व स्वीकारणे व समानता यांसाठी शालेय स्तरावर शिक्षक, मुख्याध्यापक व समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

**(३) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान :** माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान ही एक व्यापक संकल्पना आहे. मानवाने तंत्रज्ञानावर आधारित तयार केलली साधने, पद्धती व प्रक्रिया यातून अनेक बदल झालेले आहेत. तंत्रज्ञानाची क्षमता शिक्षणात प्रभावीपणे उपयोगात आणणे आवश्यक आहे. विद्यार्थी, शिक्षक यांचेसाठी सहजसुलभ हाताळणी, आकर्षक आशय निर्मिती, डिजिटल साहित्य, लायब्ररी, व्हिडिओ, ऑडिओ, ऑनलाईन कोर्सेस, क्यूआर कोड्स, आभासी प्रयोगशाळा, आशय निर्मिती क्षमता, मूल्यमापन, प्रश्नपेढी इत्यादी क्षेत्रांत तंत्रज्ञान प्रभावीपणे उपयोगात आणता येईल. त्यासाठी आयसीटी वापरण्याबाबत सुरक्षा व सावधगिरी बाळगण्याचे तंत्र व तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. बालहक्क आणि तंत्रज्ञान यांचाही विचार अभ्यासक्रम आराखड्यात केलेला आहे. शालेय शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

**(४) मार्गदर्शन आणि समुपदेशन :** प्रत्येक व्यक्तीला सक्षम करण्यासाठी मदत करण्याची प्रक्रिया म्हणून मार्गदर्शन केले जाते. मार्गदर्शन प्रक्रियेतून व्यक्तीला स्वत:चे निर्णय आणि कृती, वैयक्तिक कल्याण आणि उपयुक्त सामाजिक सहभागासाठी सक्षम केले जाते. समुपदेशनातून समस्या सोडविण्यासाठी सल्ला देण्यातून प्रक्रिया घडते. व्यक्तीची वृत्ती समजून घेऊन निर्णय घेणे यातून घडते. शालेय वातावरणात मार्गदर्शन आणि समुपदेशन यांद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या शिकण्याला गती मिळून सक्षम केले जाते.

**(५) पर्यावरणाबाबत संवेदनशीलता :** पर्यावरण विषयक संवेदनशीलता विकसित करणे हा शिक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांनी पर्यावरणाबद्दल शिकणे व त्याविषयी काळजी घेणे, निसर्गाचे सौंदर्य शोधणे आणि त्याविषयी अभिमान बाळगणे शालेय स्तरावर महत्त्वाचे आहे. अभ्यासक्रमातून पर्यावरणाची जपणूक याबाबत सकारात्मक संवेदनशील आशय असणे आवश्यक आहे.

**(६) मूळ भारतीय ज्ञानघटक :** भारतीय परंपरा, तत्त्वज्ञान, विविधता यांची जपणूक अभ्यासक्रमातून केली आहे. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजांची पूर्ती करणे, भारताच्या अतुलनीय कलात्मक भाषा आणि ज्ञान परंपरा आणि भारतातील तरुणांमध्ये सशक्त राष्ट्रीय अभिमान, आत्मविश्वास, आत्मज्ञान, सहकार्य आणि एकात्मता या हेतूंसाठी अभ्यासक्रमातून याची जडणघडण करणे आवश्यक आहे.

### भाग ड - शालेय संस्कृती व प्रक्रिया :

मूल्यांवर विश्वास, परस्पर सहसंबंध, विविध कृती उपक्रम यांच्या सरावातून शालेय संस्कृती प्रस्थापित होत असते. शालेय संस्कृतीचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर प्रत्यक्ष परिणाम होत असतो. त्यासाठी अध्ययनशील वातावरण विकसित करणे, मूल्ये व

वृत्ती यांचा विकास करणे व आव्हाने पेलण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. शालेय संस्कृतीतून सहकार्य, विद्यार्थी–शिक्षक नातेसंबंध, इतर घटकांशी असलेले परस्पर संबंध, वर्गव्यवस्थापन या सर्व बाबींवर अभ्यासक्रम आराखड्यात निर्देश दिलेले आहेत. शालेय प्रक्रिया सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी अभ्यासक्रमातील आशयाची देवाणघेवाण, वेळापत्रक, परिपाठ, ग्रंथालय, विद्यार्थी सभा इत्यादी कृतींचे आयोजन केले जाते. शाळा, पालक, समाज यांच्या सहभागातून शाळा विकास आराखडा, वार्षिक कॅलेंडर, शालेय शिस्त, विद्यार्थी सुरक्षितता, माहितीचे व्यवस्थापन व अहवाल यांद्वारे शालेय प्रक्रिया सुनिश्चित होत असते.

**भाग इ – साहाय्यक वातावरण :**

अध्ययनशील शालेय परिसंस्था निर्माण करून विद्यार्थ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची भूमिका अभ्यासक्रम आराखड्यात मांडली आहे.

**भौतिक सुविधा** : यात संरक्षक भिंत, उतार रस्ता, परिपाठासाठी सुरक्षित जागा, खेळण्यासाठी पुरेसे मैदान, परसबाग, वृक्षारोपण इत्यादी बाह्य बाबी आणि सुसज्ज वर्गखोली, ग्रंथालय (वर्ग स्तर, शाळा स्तर, समाज स्तर), प्रयोगशाळा, मध्यान्ह भोजनाची जागा, पिण्याचे पाणी, स्वतंत्र स्वछतागृह, वीज पुरवठा या बाबी महत्त्वाच्या आहेत. शालेय परिसंस्था प्रमाणित, सुरक्षित आणि सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. वर्गातील अध्ययन परिणामकारक होण्यासाठी विद्यार्थी–शिक्षक प्रमाण योग्य राखणे आवश्यक आहे. शालेय वातावरण अध्ययनशील राखण्यासाठी शिक्षक शिक्षणातून सेवापूर्व शिक्षण आणि सेवांतर्गत प्रशिक्षण यांवर भर देऊन, त्यांना सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाच्या, पदोन्नतीच्या संधी देणे अपेक्षित आहे. ही परिसंस्था शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणांची भूमिका कार्यकुशल, सुनिश्चित व संनियंत्रित करण्याची व विद्यार्थिहिताची राहील. पालक व समाजाची भूमिकादेखील यासाठी पूरक साहाय्यभूत ठरणार आहे.

(शालेय शिक्षणासाठीचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा मसुदाप्रत **https://ncert.nic.in** या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचे सूक्ष्म अवलोकन करून महत्त्वपूर्ण सूचना, अभिप्राय एनसीईआरटीच्या **ncf.ncert@ciet.nic.in** या ई–मेल आयडीवर पाठविण्यात याव्यात.)


## वर्गणीदार होण्यासाठी

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/– (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य

**अरुण जाधव**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे



भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले त्याच सुमारास भारताच्या स्वातंत्र्यलढ्यापासून प्रेरणा घेऊन आशिया आणि आफ्रिका खंडातील काही देशांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला आणि त्यातल्या काही देशांनी स्वातंत्र्य मिळविले. युरोपीय देशांच्या वसाहत वादातून काहींनी सुटका करून घेतली. काही देशांची सुटका तशी झाली नाही; परंतु तिथे लोकशाही स्वातंत्र्याचे वारे वाहायला तरी लागले. विसाव्या शतकाच्या पाचव्या आणि सहाव्या दशकामध्ये स्वतंत्र झालेल्या देशांतील स्वातंत्र्याचे आणि लोकशाहीचे पुढे काय झाले याचा इतिहास सर्वांना माहीत आहे. हे सगळे देश वसाहतवादाच्या कचाट्यातून मुक्त झाल्यानंतर, त्यांनी प्रगतीची वाट चोखाळावी अशी अपेक्षा होती; परंतु सर्वांच्या बाबतीत स्वातंत्र्याचा हा हेतू साध्य झालेला नाही. भारतामध्ये हे साध्य होण्यामागे भारतीयांच्या परंपरा, विशिष्ट मनोप्रवृत्ती आणि या देशाला लाभलेले नेतृत्व या गोष्टी आहेत; हे तर कोणी नाकारू शकणार नाही; परंतु या स्थैर्यामध्ये भारताच्या राज्यघटनेचे मोठे योगदान आहे आणि ती तयार करण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जात असल्याने आपण बिनदिक्कतपणे असे म्हणू शकतो, की भारताच्या स्थैर्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे.

> *डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अलौकिक व्यक्तिमत्त्व. त्यांनी मांडलेले शिक्षणविषयक विचार आजही उपयुक्त ठरताना दिसतात. शिक्षणाच्या बाबतीत त्यांनी केलेले कार्य आणि त्यांचे शैक्षणिक विचार याबाबतचा अभ्यासपूर्ण लेख.*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार आहेत आणि घटना तयार होताना तिच्या जडणघडणीत, तसेच तिचा मसुदा तयार करण्यात त्यांनी सर्वाधिक कष्ट घेतलेले आहेत. आता आपल्या देशाचे जे विकासगामी चित्र निर्माण झालेले आहे, ते करण्याची तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या घटनेत केली आहे, त्यामुळे हे शक्य झाले आहे.

उच्च विद्याविभूषित, प्राध्यापक आणि शिक्षणतज्ज्ञ असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक आघाडीचे, जागतिक विचारवंत होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात सर्वांत जास्त महत्त्व शिक्षणाला दिले आणि शिक्षणामुळेच मनुष्य उत्कर्ष करू शकतो, असे त्यांनी प्रतिपादित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, 'व्यक्तीला अस्तित्वाची, क्षमतांची आणि सामर्थ्याची जाणीव करून देते ते शिक्षण होय.'

ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य समाजासाठी महत्त्वपूर्ण आहे. बाबासाहेब हे असामान्य व कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले, उच्च

विद्यासंपन्न व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे सामाजिक सुधारणेसह शैक्षणिक क्षेत्रातही मोठे योगदान आहे. त्यांचे जीवन, कार्य आणि विचार आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक कारकीर्द सुद्‌धा अतिशय प्रेरणादायी आहे. त्यांनी शिक्षणासाठी घेतलेले परिश्रम, संपादित केलेल्या अत्युच्च शैक्षणिक पदव्या आणि त्यातून त्यांनी कमावलेली असामान्य व कुशाग्र बुद्‌धिमत्ता या गोष्टी आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य आणि योगदान जाणून घेणार आहोत.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. शिक्षणाने माणसात कर्तव्ये आणि हक्कांची जाणीव निर्माण होते. समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे या विचाराने शिक्षणापासून वंचित समाजाला शिक्षणाचे महत्त्व त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत, ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.'' शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्‌ध हक्क आहे आणि हा अधिकार कोणालाही नाकारता येणार नाही, असे शिक्षणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते.

प्राचीन समाजव्यवस्थेत सर्वांना शिक्षण घेण्याचा हक्क नव्हता. त्यामुळे बहुसंख्य समाज अडाणी, निरक्षर राहिला. त्यांची स्थिती शिक्षणामुळेच सुधारेल असा विचार करून बाबासाहेबांनी शैक्षणिक कार्याकडे विशेष लक्ष दिले.

हजारो वर्षांपासून शिक्षण नाकारलेल्या समाजातील घटकांची, अज्ञान व निरक्षरतेमुळे जी दयनीय अवस्था झाली होती त्याचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे, याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना करून दिली. समाजातील या घटकातील लोकांनी त्यांच्या मुलांना शाळेत पाठवावे यासाठी बाबासाहेबांनी त्यांना प्रोत्साहन दिले. या मुलांना शिष्यवृत्ती, गणवेश, भोजन व निवारा अशा सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या अनुयायांना ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' असा संदेश दिला.

सर्वच स्तरांतील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून २० जुलै, १९२४ रोजी मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची स्थापना केली. या संघटनेच्या वतीने सोलापूर येथे ४ जानेवारी, १९२५ रोजी एक वसतिगृह सुरू करून वंचित विद्यार्थ्यांना निवास, भोजन, कपडे व शैक्षणिक साधनसामग्री पुरवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या वसतिगृहास सोलापूर नगरपालिकेकडून अनुदान मिळवून दिले. या संस्थेने 'सरस्वती विलास' नावाचे मासिक व एक मोफत वाचनालयही सुरू केले.

१४ जून, १९२८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचितांसाठी शिक्षणसंस्थेची स्थापना केली. वंचितांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय करणे हे या संस्थेचे मुख्य ध्येय होते. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी पेलण्यास ही संस्था समर्थ नसल्याने येथील विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई सरकारने या संस्थेस मदत करावी, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यामुळे मुंबईच्या गव्हर्नर साहेबांनी ८ ऑक्टोबर, १९२८ रोजी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ५ वसतिगृहे मंजूर केली. तसेच वसतिगृहांच्या खर्चासाठी दरमहा रु. ९०००/- चे अनुदानही मंजूर केले. जेव्हा ही रक्कम

खर्चासाठी अपुरी पडू लागली, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील धर्मादाय संस्थांकडून व इतर काही देणगीदारांकडून आर्थिक मदत मिळवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै, १९४५ रोजी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या संस्थेच्या वतीने सन १९४६ मध्ये मुंबईत सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय, सन १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय, सन १९५३ मध्ये मुंबईत सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, तर सन १९५६ मध्ये मुंबईत सिद्धार्थ विधी महाविद्यालय सर्व समाजांसाठी सुरू केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य विचार

(१) मला तो धर्म आवडतो जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता शिकवतो.

(२) मी एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मापन त्यानुसार करतो, जिथे तिथल्या महिलांनी प्रगती केली असेल.

(३) जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत.

(४) शिक्षित व्हा, संघटित व्हा.

(५) धर्म माणसांसाठी आहे; माणूस धर्मासाठी नाही.

(६) माणूस नश्वर आहे, त्याचप्रमाणे विचारदेखील नश्वर आहेत. एखाद्या कल्पनेच्या प्रसाराची गरज असते, जसे वनस्पतीला पाण्याची गरज असते, अन्यथा ती कोमेजून मरते.

(७) महापुरुष हा प्रतिष्ठित माणसापेक्षा वेगळा असतो, कारण तो समाजाचा सेवक होण्यास तयार असतो.

(८) समानता ही काल्पनिक गोष्ट असू शकते, परंतु तरीही ती एक नियमन तत्त्व म्हणून स्वीकारली पाहिजे.

(९) बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम ध्येय असले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अमूल्य विचारांनी लाखो तरुणांना प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या विचारांचे अनुसरण केल्याने अनेक तरुणांचे जीवन बदलले.

'घरातील स्त्री शिकली, तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होते, हा त्यांचा त्यावेळेचा दृष्टिकोन आजही शंभर टक्के लागू पडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षित व्हा, चळवळ करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा, कधीही धीर सोडू नका ही जीवनाची पंचसूत्री सांगितली होती. ती पंचसूत्री आणि त्यांचे अमूल्य विचार आचरणात आणले, तर भावी पिढीचे भविष्य खूप उज्ज्वल असणार आहे यात शंका नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!


# महाराष्ट्र निर्मितीची कथा

**प्रा. डॉ. गणेश राऊत**

मे, २०२३ मध्ये महाराष्ट्राच्या स्थापनेला ६ दशके उलटून गेली आहेत. या लेखात त्या संदर्भातील महत्त्वाच्या घटनांची नोंद घेतली आहे.

**संयुक्त महाराष्ट्राची चळवळ :**

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले; परंतु या राज्याच्या निर्मितीसाठी अखंड धडपड त्याच्याही अगोदर कितीतरी वर्षे चालूच होती. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे स्वप्न पूर्णत्वास येण्यास कित्येकांना रक्त सांडावे लागले. महाराष्ट्र राज्य निर्माण होण्याच्या अमृतमंथन प्रक्रियेतून जशी काही रत्ने मिळाली, तसेच हलाहल विषही महाराष्ट्रीय जनतेने पचवले. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानावर महाराष्ट्राची यशोपताका उभारली आहे. या हुतात्म्यांमध्ये मराठी, गुजराथी, उर्दू, तेलुगू भाषकांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याची निर्मिती या सर्वांच्या दृष्टीने जीवनमरणाचा लढा होता. त्याकडे संकुचित दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही.



**लोकमान्य टिळकांची भूमिका :**

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्याची सांधेजोड करून, राष्ट्रीय शिक्षण मातृभाषेतून देण्याची

> *१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यासाठी मराठी माणसांना मोठा लढा द्यावा लागला. काहींना हौतात्म्य पत्करावे लागले. या लेखात रेखाटलेला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा इतिहास वाचनीय आहे.*

गरज प्रतिपादन केली. विश्वविद्यालयातसुद्धा मातृभाषेतूनच शिक्षण मिळावे, सरकारी कामकाज त्या त्या मातृभाषेतून चालवावे, यासाठी त्या भाषेचे स्वराज्य असण्याची गरज आहे. लोकशाही स्वराज्य पक्षाच्या (काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी) उद्देशपत्रिकेत व पक्षाच्या कार्यक्रमात भाषावार प्रांतरचनेचा आग्रह धरला व महाराष्ट्र हा स्वतंत्र एकभाषी प्रांत व्हावा, अशी घोषणा केली. तात्यासाहेब केळकरांनी केसरीतून महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीला तात्काळ चालना द्यायला सुरुवात केली.

१९१७ सालच्या कोलकाता अधिवेशनात डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांनी आंध्र प्रांत स्वतंत्र करण्याचा ठराव मांडला. काँग्रेसने आंध्र प्रांत निर्माण करण्याचा ठराव संमत केला. १९२१च्या नागपूर

अधिवेशनात कोलकाता येथे महात्मा गांधी यांनी भाषावार प्रांतरचनेचा ठराव मांडला. काँग्रेसची फेरउभारणी भाषा तत्त्वावर केली.

**नेहरू कमिशन :**

लॉर्ड बर्कनहेड याने सायमन कमिशनमधून भारतीयांना वगळण्याचे समर्थन करताना भारतीयांना आव्हान दिले, की भारतीय नेत्यांनी एक सर्वसंमत राज्यघटना तयार करावी. भारतीयांनी हे आव्हान स्वीकारून सर्वसंमत घटना तयार केली. पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली समितीने २० ऑगस्ट, रोजी अहवाल सादर केला. वर्कर्स अँड पीझंटट पार्टी (कामकरी शेतकरी) पक्षाने भाषावार राज्याची मागणी करून महाराष्ट्र प्रांताची मागणी नेहरूंकडे केली.

**वऱ्हाडकरांची मागणी :**

१९१८ मध्ये वऱ्हाड प्रदेश जुन्या मध्यप्रांत व वऱ्हाड (सी. पी. अँड बेरार) मध्ये समाविष्ट होता. वऱ्हाड मराठी भाषकांचा अल्पसंख्य; पण शिलकी उत्पन्नाचा भाग होता. तेथून येणारे उत्पन्न हिंदी भाषकांसाठी खर्च होई. त्यामुळे व्हॉईसरॉयच्या काउन्सिलमध्ये मुधोळकर व दामले या पुढाऱ्यांनी 'वऱ्हाडला' मराठी भाषेचा स्वतंत्र प्रांत म्हणून मान्यता द्यावी अशी मागणी केली. १९३७ च्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाल्यावर १ ऑक्टोबर, १९३८ मध्ये तसा ठराव करण्यात आला.

**संयुक्त महाराष्ट्र सभा :**

नुसत्या ठरावांनी काहीच साध्य होत नसते; म्हणून १९४० मध्ये रामराव देशमुख यांनी मुंबईत वऱ्हाडच्या मागणीचा पाठपुरावा करणारी संस्था स्थापण्याचे ठरविले. तेथे 'संयुक्त महाराष्ट्र सभा संघटना' स्थापण्यात आली. १९४१ च्या मे महिन्यात डॉ. केदार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरविण्यात आली. १९४३ साली परिषदेचे दुसरे अधिवेशन अमरावती येथे डॉ. मुकुंदराव रामराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले; परंतु कार्य पुढे जाण्याच्या दृष्टीने या परिषदांचा फारसा उपयोग झाला नाही.

**बेळगाव साहित्य संमेलनाचे योगदान :**

१२ मे, १९४६ रोजी बेळगाव येथे महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले. या संमेलनाच्या ललित साहित्य विभागाचे अध्यक्ष श्री. गजाननराव माडखोलकर होते. त्यांनी पारंपरिक भाषणपद्धतीला फाटा देऊन आणि काळाची गरज लक्षात घेऊन संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे सुतोवाच केले. संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावात मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड, मराठवाडा व गोमंतक यांच्या सरहद्दीवरचे मराठी भाषक प्रदेशसुद्धा संयुक्त महाराष्ट्रात सामील करण्याची मागणी केली. याच संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापण्यात आली.

समितीचे सभासद प्रा. दत्तो वामन पोतदार, श्री. शंकरराव देव, श्री. केशवराव जेधे, श्री. श्री. शं. नवरे व समितीचे आमंत्रक म्हणून श्री. ग. त्र्यं. माडखोलकर काम करतील असे ठरले.

या ठरावाचा पाठपुरावा करण्यासाठी साहित्य संमेलने आणि साहित्य परिषद यांनी मात्र संयुक्त महाराष्ट्राचा पाठपुरावा कायम केला. या सगळ्यांतून जोरदार वातावरणनिर्मिती करण्यात येत होती.

**जळगाव परिषद :**

संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन १९४७ च्या एप्रिल महिन्यात दि. १३-१४ रोजी भरले. श्री. शंकरराव देव हे अध्यक्ष, श्री. बियाणी व श्री. पूनमचंद रांका, श्री. पोतदार व श्री. जेधे हे उपाध्यक्ष, मुख्यकार्यवाह श्री. माडखोलकर, सहकार्यवाह श्री. नवरे, डॉ. अंत्रोळीकर, श्री. वसंतराव नाईक, सौ. प्रमिला ओक , कोषाध्यक्ष श्री. दा. वि. गोखले व

कार्यकारी मंडळात १४ सदस्य अशी रचना झाली.

जळगाव परिषदेने मुंबईसह महाराष्ट्र, सीमा प्रश्न, भाषिक अल्पसंख्य यासंबंधी अगोदरच्या ठरावांचा पाठपुरावा करायचे ठरविले.

### दार कमिशन नियुक्ती :

भारतीय स्वातंत्र्य नजरेच्या टप्प्यात आले असता, घटना समितीत भाषिक राज्यांचा प्रश्न पुढे येणे अपरिहार्य होते. हिंदी संघराज्याचे घटक स्पष्ट करण्यासाठी, भाषावार प्रांतरचना कितपत उपयुक्त आहे, याची पाहणी करण्याकरिता डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या सूचनेनुसार न्यायमूर्ती एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. आयोगाचे कामकाज चालू असतानाच महात्मा गांधी यांनी ३० ऑगस्ट, १९४७ ला 'हरिजन'मध्ये भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात लेख लिहून 'भाषावार प्रांतरचनेला धरून मुंबईने योग्य ती सर्वमान्य योजना तयार करावी.' असे सुचविले.

### मुंबई अधिवेशन :

१६–१७ ऑक्टोबर, १९४८ रोजी सं. म. प. ने मुंबईत अधिवेशन भरविण्याचा निर्णय घेतला. या अधिवेशनातील प्रदर्शनाचे उद्‍घाटन काकासाहेब गाडगीळ यांनी केले. ख्यातनाम साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचा 'मुंबई कोणाची' हा खास तमाशा व शाहीर अमर शेख यांच्या गाण्यांचा कार्यक्रम झाला. अधिवेशनाचे अध्यक्ष रामराव देशमुख यांनी पुढील ठराव मान्य केले. यात 'हिंदी' संघराज्याच्या नवीन घटनेत प्रांताच्या यादीत 'संयुक्त महाराष्ट्र' असा मराठी भाषकांच्या सलग प्रदेशाचा एक नवा प्रांत विलंब न लावता ताबडतोब निर्माण करण्यात यावा. या प्रांतामध्ये –

(१) सध्याच्या मुंबई राज्यातील मुंबई शहरासह मराठी भाषकांचा सर्व प्रदेश.

(२) सध्याच्या मध्यप्रांत–वऱ्हाड प्रांतातील वऱ्हाड व नागपूर यांमधील मराठी भाषकांचा सर्व प्रदेश.

(३) मुंबई व मध्यप्रांत या राज्यातील विलीन झालेल्या संस्थानांपैकी मराठी भाषकांचा संस्थानी प्रदेश.

(४) विलीन न झालेले कोल्हापूर संस्थान व विलीन न झालेल्या निजामी राज्यातील मुख्यतः मराठवाड्यात समाविष्ट असलेला मराठी भाषकांचा प्रदेश आणि पोर्तुगीज अमलाखालील गोवाप्रांतही जेव्हा संघराज्यात विलीन होतील, तेव्हा त्यांच्यातील सर्व मराठी प्रदेश, या सर्वांचा समावेश झाला पाहिजे, अशी या परिषदेची मागणी आहे.

### दार कमिशनपुढील साक्ष :

दार कमिशन हे एकसदस्यीय कमिशन होते. त्यांच्या मदतीला आय.सी.एस. अधिकारी पन्नालाल हे होते. दार कमिशन ८ नोव्हेंबर, १९४८ रोजी मुंबईत आले. केंद्र सरकारतर्फे महाराष्ट्रासाठी सल्लागार म्हणून हरीभाऊ पाटसकर कमिशनला मदत करत होते. 'सं. म. प.' मुंबई समिती, मुंबई सरकार व त्यांचे सचिव, कम्युनिस्ट पार्टी, डॉ. मु. रा. जयकर, विठ्ठलराव चंदावरकर, हुसेनभाई जाजली, वैकुंठभाई मेहता, सर कावसजी जहांगीर व महाविदर्भ–समिती यांची संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करणारी साक्ष व निवेदने झाली.

हे सारे प्रयत्न होत असतानाच, सं. म. प. ला नवसंजीवन देण्याचे काम सेनापती बापट यांनी केले. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत १९४९–५० या वर्षी प्रभातफेऱ्यांच्या उपक्रमातून लोकांच्या मनातील विचार जागवला. सेनापतींनीच संयुक्त महाराष्ट्र मागून मिळणार नाही, तर त्यासाठी जनआंदोलन वा सत्याग्रह छेडावा लागेल, ही गोष्ट लोकांच्या मनावर बिंबवली. १६ ऑक्टोबर, १९४९ रोजी बेळगाव येथे भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाखाली सं. म. प. चे अधिवेशन भरविण्यात आले व त्यात प्रसंगी बलिदानाची तयारी

दर्शवण्यात आली.

पुढे रायगडच्या पायथ्याला महाड येथे ख्यातनाम कामगार पुढारी श्री. ना. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली. तेथेही संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढे ढकलण्यात आली.

### मुंबईतील ठराव :

२८ नोव्हेंबर, १९४९ रोजी मुंबई कॉर्पोरेशनमध्ये आचार्य अत्रे व आर. डी. भंडारे यांनी पुढील ठराव मांडला.

'भाषेच्या तत्त्वावर मुंबई ही राजधानी असलेला महाराष्ट्र प्रांत ताबडतोब इष्ट आहे, असे या महापालिकेचे विचारपूर्वक मत झाले असून, या मताची ताबडतोब अंमलबजावणी करावी, असे मुंबई सरकारमार्फत भारत सरकारला कळवावे, अशी विनंती मेयर साहेबांस करण्यात येत आहे'.

सन १९४९ ते १९५१ पर्यंत या चळवळीत फारशा हालचाली झाल्या नाहीत. चळवळ निष्प्राण अवस्थेला पोहोचण्याची वेळ आली, तेव्हा तिच्यात स्फुलिंग चेतविण्याचे प्रयत्न सेनापती बापट व लालजी पेंडसे यांनी केले. ५ जानेवारी, १९५१ रोजी ठाण्यात परिषद भरवून सं. म. प. जिवंत आहे, याचे दर्शन घडविण्यात आले. विभागीय पातळ्यांवर कमिट्या तयार करून चळवळ जिवंत ठेवण्यासाठी ठाणे जिल्हा सं. महाराष्ट्र मंडळ स्थापण्यात आले. शिरगणतीच्या कामात सं. म. प. च्या कार्यकर्त्यांनी सरकारी नोकरांना मदत केली. ठाण्यानंतर वऱ्हाडात सं. म. प.ची शाखा सुरू करण्यात आली.

### आंध्रमधील घडामोडी :

जे. व्ही. पी. समितीने आंध्रप्रदेशाची निर्मिती मान्य करूनसुद्धा वास्तवात ते आले नव्हते; म्हणून श्री. पोट्टी रामल्लू यांनी आंध्रात प्राणांतिक उपोषण सुरू केले. नेहरूंनी त्याकडे लक्ष दिले नाही. उपोषणाच्या धमक्यांना सरकार घाबरणार नाही अशी घोषणा केली. उपोषणाच्या ५८ व्या दिवशी रामल्लूंचे निधन झाले. यामुळे आंध्रातील वातावरण पेटले. सार्वजनिक मालमत्तेचे ३ कोटी रुपयांचे नुकसान झाले. रेल्वे लुटल्या गेल्या. पंडित नेहरूंनी १९ डिसेंबर, १९५२ रोजी स्वतंत्र आंध्र राज्याची घोषणा केली व ते अस्तित्वात आणण्यासाठी न्यायाधीश वांचू यांचे कमिशन नेमले.

### नागपूर करार - २८ सप्टेंबर, १९५३ :

महाराष्ट्रातील दुष्काळाच्या पाहणीसाठी पंडित नेहरू येऊन गेले; पण त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचे नावच काढले नाही. महाराष्ट्र पातळीवर सामसूम होती. संयुक्त महाराष्ट्रात येऊ इच्छिणाऱ्या विभागांना समपातळीवर सामावण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच नागपूर करार जन्माला आला. या कराराद्वारे अविकसित भागांचे मागासलेपण दूर करून, विकासासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. या करारावर विदर्भ, संयुक्त महाराष्ट्र व मराठवाडा या तीन विभागांतील प्रमुख नेते मंडळींनी सह्या केल्या. हा ११ कलमी करार पुढीलप्रमाणे होता :

(१) भारतातील राज्यांची पुनर्घटना आणि पुनर्रचना करण्याच्या प्रश्नांवर अहवाल सादर करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती नेमण्यात यायची असल्यामुळे मराठीभाषी मुलखाच्या निरनिराळ्या विभागात राहणाऱ्या आम्ही लोकांनी सर्व विभागांचे मिळून एक राज्य निर्माण करण्यास पायाभूत म्हणून खालील निर्णय मान्य केलेले आहेत.

(२) सध्याच्या मुंबई, मध्यप्रदेश आणि हैदराबाद राज्यातील सर्व सलग मराठीभाषी प्रदेशांचे हे राज्य बनविण्यात यावे. मुंबई ही त्याची राजधानी राहील.

(३) सर्व प्रकारचे विकास कार्य व शासनव्यवस्था यांच्या बाबतीत या राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित भाग असे तीन घटक मानण्यात येतील.

(४) शासन एकच राहणार असल्यामुळे, त्यांच्या

आवश्यकता लक्षात घेऊन निरनिराळ्या घटकांवरील खर्च लोकसंख्येच्या प्रमाणात केला जाईल. मराठवाड्याची अवस्था अविकसित असल्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल. या संबंधात एक अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेला सादर करण्यात येईल.

(५) सरकारात निरनिराळ्या घटकांच्या लोक–संख्येनुसार त्या घटकांना स्थान मिळेल.

(६) औद्योगिक, शास्त्रीय अथवा विशेष विषयांचे प्रगत शिक्षण देण्याची व्यवस्था असलेल्या शिक्षणसंस्थांमध्ये घटकांतील लोकांना प्रवेशाच्या बाबतीत लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा व योग्य सवलती देण्यात येतील.

(७) मुंबई हेच नव्या राज्याच्या हायकोर्टाचे मुख्य स्थान असेल व दुसरे स्थान नागपूर राहील. महाविदर्भ विभागाला नोकरवर्ग यांच्या संबंधात योग्य प्रतिनिधित्व मिळेल व हीच बाब मराठवाड्यालाही लागू राहील.

(८) सरकारी नोकऱ्या किंवा सरकारनियंत्रित व्यवसायात नोकरांची भरती करताना, प्रत्येक घटकातून लोकसंख्येच्या प्रमाणात भरती केली जाईल.

(९) निरनिराळ्या घटकांचा शासनाशी चांगला संबंध येण्यासाठी विकेंद्रीकरणावर भर देण्यात येईल.

(१०) राज्याची उपराजधानी या नात्याने नागपूरशी महाविदर्भातील जनतेचा संबंध जडलेला आहे, तेव्हा कार्यक्षम शासनाचे फायदे शक्य तेवढे नागपूरला देण्याचे प्रयत्न राहतील. या कलमांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारी कचेऱ्या काही निश्चित काळासाठी नागपूरला हलविण्यात येतील. राज्य विधानसभेचे निदान एक अधिवेशन दरवर्षी नागपूरला भरविण्यात येईल.

(११) सर्व सलग मराठी प्रदेश नव्या राज्यात समाविष्ट व्हावा; यासाठी खेडे हा घटक मानला जाईल.

नागपूर करारावर खालील व्यक्तींनी आपापल्या विभागाप्रमाणे सह्या केल्या.

- **महाविदर्भ** : सर्वश्री रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, रा. कृ. पाटील, पु. का. देशमुख व शेषराव वानखेडे.
- **पश्चिम महाराष्ट्र :** सर्वश्री भाऊसाहेब हिरे यशवंतराव चव्हाण, नाना कुटे व देवकीनंदन नारायण.
- **मराठवाडा :** सर्वश्री देविसिंग चव्हाण, लक्ष्मणराव भाटकर व सौ. प्रभावतीदेवी जकातदार. त्यानंतर पंडित नेहरू यांनी लोकसभेत पुढील घोषणा केली आणि 'सं.म.प.'ला नवसंजीवनी मिळाली.

### फाजल अली कमिशन :

भारत सरकार अशा निर्णयाला आले आहे, की भारतीय संघातील राज्यांच्या पुनर्रचनेच्या समग्र प्रश्नांची फेरतपासणी पूर्वग्रहरहित वास्तविक बुद्धीने व्हावी; जेणेकरून प्रत्येक घटक राज्याची प्रजा तसेच समग्र भारत राष्ट्र या दोहोंचेही कल्याण साधले जाईल. यादृष्टीने सरकारने एक कमिशन नेमण्याचे ठरवले आहे.

कमिशन या प्रश्नाचे सर्वांग स्वरूप, ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राप्त परिस्थिती या सर्वांची, तसेच या प्रश्नाला अनुलक्षून असलेल्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी वगैरेंची सर्वांगपूर्ण चौकशी करील, अशा पुनर्रचने–संबंधीच्या कोणत्याही प्रकारच्या सूचना विचारात घेण्याचे कमिशनला स्वातंत्र्य आहे.

या कमिशनच्या अध्यक्षपदी फाजल अलींची नियुक्ती केल्याने त्यास 'फाजल अली कमिशन' म्हणत अन्य दोन सदस्यांत श्री. पणीकर व पंडित कुंझरू होते. या

कमिशनला सादर करावयाचे निवेदन तयार करण्याचे काम 'सं.म.प.' च्या वतीने धनंजयराव गाडगीळ करू लागले. वऱ्हाड, मराठवाडा, बेळगाव व कारवार यांनी आपापल्या प्रश्नांची निवेदने सादर करायची व त्यांचे संकलन करून तात्त्विक प्रमेये सांगणारे सर्वसमावेशक निवेदन संयुक्त महाराष्ट्र परिषदेतर्फे द्यायचे असे ठरले. त्याप्रमाणे १९५४ पर्यंत काम पूर्ण झाले. फाजल अली कमिशनकडे दोन्ही बाजूंची निवेदने पोहोचली.

## संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे निवेदन :

कमिशनला 'सं.म.प.'ने जे निवेदन दिले, ते १६१ कलमांचे व दोन भागांचे होते. पहिल्या भागात राज्यपुनर्रचनेची मूलभूत तत्त्वे व कार्यपद्धती यांचे शास्त्रशुद्ध विवेचन व दुसऱ्या भागात पाच उपविभाग पाडले होते. यात भावी महाराष्ट्राची अंतर्रचना व साधनसंपत्ती, मुंबई शहराचा प्रश्न, कारवार व कोकणी भाषक, महाविदर्भाची मागणी व हैदराबादचे विभाजन असे उपविभाग होते. इतके विस्तृत, सोपपत्तिक व शास्त्रशुद्ध निवेदन हे, अलीकडच्या राजकीय व वैधानिक क्षेत्रांतील वाङ्मयात बहुमोलाचे आहे, असा कमिशनने त्याचा गौरव केला.

## आयोगाच्या शिफारशी :

राज्य पुनर्रचना आयोग ऊर्फ फाजल अली कमिशनचा अहवाल १० ऑक्टोबर, १९५५ रोजी प्रसिद्ध झाला. आयोगाने विदर्भाचे स्वतंत्र राज्य व संपूर्ण गुजराती प्रदेशासह मराठवाडा धरून मुंबईच्या द्वैभाषिक राज्याची शिफारस केली. याच्या विरोधात ५ नोव्हेंबर, १९५५ रोजी हिंद मजदूर सभा, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस, युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस यांनी एकत्र येऊन नरे पार्कवर विरोध नोंदवला.

साऱ्या महाराष्ट्राला काय करावे असा प्रश्न पडला असता, कामगारांनी कोंडी फोडली. त्याला साथ दिली ठाकुरद्वार विभागातील बालगोपाल परिषदेने व महिला परिषदेने. त्रिराज्य स्थापनेचे बिल विधानसभेत चर्चेला येणार होते. मुंबईचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी विरोधी वातावरण पाहून चौपाटीवर सभा घेतली. विधानसभेकडे जाणारे रस्ते अडवण्यात आले. जनता अश्रुधुराला जुमानत नाही हे पाहून पोलिसांनी बंदुकी चालविल्या. १५ जण मरण पावले. १८ नोव्हेंबर, १९५५ रोजी विधानसभेत 'त्रिराज्य' ठराव मुख्यमंत्री मोरारजी देसाई मांडणार असल्याने संयुक्त महाराष्ट्र कृती समितीने प्रचंड मोर्चा काढला. मोरारजी देसाई यांनी वरिष्ठ मराठी पोलीस अधिकारी डावलून परिसराच्या शांतता व सुव्यवस्थेसाठी शहा यांना डेक्कन पोलिस कमिशनरच्या जागी नेमले. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी बंदीरेषा ओलांडली, म्हणून त्यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी लाठीमार केला. १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली.

## संयुक्त महाराष्ट्र समितीचे ध्येय व धोरण :

संयुक्त महाराष्ट्र समिती ही तिचे ध्येय व धोरण मान्य असलेल्या महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची, संघटनांची व स्वतंत्र व्यक्तींची संयुक्त संघटना आहे. कामगार, शेतकरी, युवक व महिला संघटनांना घटक या नात्याने तिच्यात सामील होता येईल. समितीतील घटक संस्था, संघटना व पक्ष स्वतःच अस्तित्व कायम ठेवून तिच्या घटनेला कार्यक्रमाला मान्यता देतात व तिच्या शिस्तीचे पालन करतात. लोकशाही आणि समाजवाद यावर निष्ठा असलेली, भारताचे ऐक्य, अभंगत्व, सुरक्षितता व सार्वभौमत्व यांचे संरक्षण करणारी व भारताची घटना मान्य असलेली अशी, महाराष्ट्रातील सर्व जनतेची व्यापक संघटना, असे संयुक्त महाराष्ट्र समितीचे

स्वरूप राहील.

**उद्देश :**

(१) भाषावार राज्य रचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्र राज्यात अजून समाविष्ट झालेले मराठी भाषकांचे सलग प्रदेश या राज्यास जोडून घेणे.

(२) लोकसत्ताक व समाजवादी महाराष्ट्र प्रस्थापित करणे.

(३) सामाजिक, आर्थिक व राजकीय समता स्थापन करून महाराष्ट्राच्या जीवनाची सहकारी तत्त्वावर उभारणी करणे.

(४) समितीने पुरस्कारलेला कार्यक्रम पूर्ण करणे.

**साधने :**

(१) लोकशाहीसंमत शांततामय साधनांचा उपयोग करणे.

(२) जनजागृती व संघटना करून पर्यायी शक्ती निर्माण करणे.

(३) जिल्हा व तालुकानिहाय शाखा स्थापन करून सभासद वाढविणे.

(४) महाराष्ट्राच्या मूलभूत समस्या लक्षात घेऊन आणि आर्थिक, औद्योगिक व शेतीविषयक सर्वांगीण विकासाच्या योजना तयार करून शिक्षणाच्या व आंदोलनाच्या मार्गाने त्या कार्यवाहीत आणणे.

(५) विधिमंडळे व स्थानिक संस्थांच्या निवडणुका लढविणे व जनतेचा कार्यक्रम अमलात आणणे.

(६) अल्पमत असतानाही जनहिताच्या योजना व ठराव मांडून विधिमंडळात आणि बाहेर चळवळ उभारणे.

(७) सहकारी जीवन व समाजवाद यांचे जनतेला शिक्षण देणे.

त्रिराज्य ठरावाच्या विरोधात 'लोकमान्य' पत्राचे संपादक पां. वा. गाडगीळ यांनी विधानपरिषदेतील सभासदत्वाचा राजीनामा दिला. लोकमताचे वाढते दडपण पाहून विधानसभेत त्रिराज्य ठराव तहकूब करून टाकण्यात आला. १६ जानेवारी, १९५६ मध्ये पंडित नेहरू यांनी मुंबई शहर केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली राहील. विदर्भासह संपूर्ण मराठी भाषकांचा महाराष्ट्र आणि सौराष्ट्र–कच्छसह, गुजरात अशी दोन राज्य निर्मितीची घोषणा केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात १०६ हुतात्म्यांनी महाराष्ट्रासाठी रक्त सांडले. 'संमप'ने असहकाराचा कार्यक्रम राबवण्याचा आदेश तालुका व गाव समित्यांना दिला. याच काळात थोर सर्वोदयी नेते जयप्रकाश नारायण यांनी पंडित नेहरूंची भेट घेऊन मुंबई महाराष्ट्राला देण्याचा आग्रह धरला; परंतु मार्ग निघाला नाही. याच दरम्यान हैदराबाद विधानसभा काँग्रेसपक्षाने मुंबई केंद्रशासित न करता ती महाराष्ट्र राज्यात समाविष्ट करावी अशी शिफारस केली. फिरोज गांधी यांनी संसदेत मुंबई महाराष्ट्राला द्यावी अशी मागणी केली.

जून १९५६ च्या दरम्यान लंडन येथे संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. लंडन शहरात महाराष्ट्रीय व सहानुभूतीदार यांचा मेळावा भरला. मेळाव्याचा उद्देश मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती कार्यासाठी निधी गोळा करणे हा होता. भाषणे होऊन आर्थिक मदत मुंबईत पाठविण्यात आली.

ऑगस्ट १९५६ मध्ये लोकसभेत महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, गुजराथ, सौराष्ट्र, कच्छ, मुंबई यांचे मिळून एक संमिश्र राज्य करावे, अशी सूचना आली. सरकारने ती तत्काळ स्वीकारली. गृहमंत्र्यांनी या प्रदेशाची अधिक माहिती पुढीलप्रमाणे दिली. या नव्या राज्याचे क्षेत्रफळ १,८८,२४० चौ. मैल असेल. एकूण लोकसंख्या ७ कोटी ७८ लाख, मराठी भाषक ५२.४% तर विधानसभेत ३९६ जागा, विधानपरिषदेत

७२ सभासद, लोकसभेत ६६ व राज्यसभेत २७ जागा राज्याच्या वाट्याला येतील. केंद्रीय सरकारच्या कर उत्पन्नातून १३.७६% व उत्पन्नाच्या करातून १९.१०% या राज्याला मिळतील.

१० ऑगस्टला महाराष्ट्र काँग्रेसने, तर १९ ऑगस्टला गुजरात काँग्रेसने द्वैभाषिक राज्याला मान्यता दिली. ऑक्टोबर १९५६ रोजी मोरारजी देसाईंना केंद्रीय मंत्रिमंडळात सामील करून घेण्यात आले व यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले.

१५ नोव्हेंबर, १९५६ पासून 'मराठा' दैनिक आचार्य अत्रे यांनी सुरू केले. १९ नोव्हेंबर, १९५६ पासून नव्या द्वैभाषिक मुंबई राज्याची नवी विधानसभा सुरू झाली. १९५६ पासूनच संयुक्त महाराष्ट्र परिषदेऐवजी संयुक्त महाराष्ट्र समिती अस्तित्वात आली. द्वैभाषिकांच्या निवडणुकीत काँग्रेसला विधानसभेत श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली २३२ जागा मिळाल्या व त्यांचेच सरकार परत आले. मुंबई कॉर्पोरेशनमध्ये १३१ जागांपैकी ७१ जागा सं. म. स. (संयुक्त महाराष्ट्र समिती) ने जिंकल्या व सत्ता हस्तगत केली आणि आचार्य दोंदे महापौर झाले. यानंतर 'संयुक्त महाराष्ट्र विधानसभा पक्ष' अस्तित्वात आला.

### इंदिरा गांधी आणि संयुक्त महाराष्ट्राचा लढा :

इंदिरा गांधी अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा (१९५९) झाल्या. याच काळात त्यांनी महाराष्ट्राचा दौरा केला. कुशल राजकारणी असल्यामुळे त्यांच्या तत्काळ लक्षात आले, की द्वैभाषिक राज्य ही न टिकणारी गोष्ट आहे. त्यांनी नऊ लोकांची कमिटी नेमली. या कमिटीने आपल्या शिफारशी काँग्रेस वर्किंग कमिटीला सादर केल्या. या कमिटीची सर्वांत महत्त्वाची शिफारस म्हणजे द्वैभाषिक राज्य संपुष्टात आणावे. गुजरात स्वतंत्र राज्य स्थापून त्यांना राजधानी निर्मितीसाठी १० कोटी द्यावेत. गुजरातला येणारी तूट १० वर्षे मुंबई राज्याने भरून द्यावी. डांग भाग गुजरातला द्यावा. नव्या राज्याला मुंबई नाव द्यावे.

### महाराष्ट्र राज्याची निर्मिती :

द्वैभाषिकांचा गाडा मुख्यमंत्री हाकत होतेच; पण महाराष्ट्र-गुजरात यांचे मनोमिलन झालेलेच नव्हते. दोघांचाही स्वार्थ मुंबईत दडलेला होता. मुंबई कोणाची? हा प्रश्न अनिर्णित होता. खूपच भांडलो, तर मुंबई केंद्रशासित होईल, याची दोघांनाही कल्पना होती. प्रांतिक काँग्रेसने या संदर्भातील सर्व गोष्टी केंद्राला कळवल्या होत्याच. तीन वर्षे राज्य चालवूनसुद्धा मनोमिलन झाले नाही. ६ सप्टेंबर, १९५९ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. काँग्रेस अध्यक्षा इंदिरा गांधी यांनी या प्रश्नावर खूपच समजूतदार भूमिका घेतली. मुख्यमंत्र्यांकडून वस्तुस्थिती स्पष्ट करणारा अहवाल मागवला. मुख्यमंत्र्यांनी त्यांना पटवून दिले, की दोन स्वतंत्र राज्ये व्हावीत ही लोकांचीच इच्छा आहे. नेहरू-इंदिरा गांधी, गुजरातमधील नेते या सर्वांची अनुकूलता तयार झाली.

### महाराष्ट्र निर्मितीचा घटनाक्रम :

चंदिगढ येथील काँग्रेसच्या अधिवेशनात इंदिरा गांधी यांनी काँग्रेस वर्किंग कमिटीच्या नऊ सदस्यांची समिती नेमली. त्यांनी मुंबई राज्याच्या विभाजनाची शिफारस केली. मुंबईसह महाराष्ट्र होणार असल्याने देवाण-घेवाणीच्या तत्त्वानुसार महाराष्ट्राने डांग प्रदेशावर पाणी सोडले. उंबरगावचे विभाजन करून काही भाग गुजरातला देण्यात आला. दोन्ही उदयोन्मुख राज्यांना केंद्राने प्रत्येकी ५० कोटी द्यावेत. हे सर्व विधेयक स्वरूपात १९६० मध्ये संसदेत चर्चेला आले. संसदेने भरपूर चर्चेनंतर १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्याची घोषणा झाली. नवमहाराष्ट्रात २६ जिल्हे, व

(पृष्ठ क्र. ५० वर)

# महाराष्ट्र गीत : जय जय महाराष्ट्र माझा

**श्रीकांत चौगुले**
श्रीकृपा, गांगर्डेनगर, काटेपुरम चौक,
पिंपळे गुरव, पुणे.
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

*‘जय जय महाराष्ट्र माझा’ या गीताचा महाराष्ट्र गीत म्हणून स्वीकार केला गेला. त्याची अंमलबजावणी दि. १९ फेब्रुवारी, २०२३ पासून सुरू झाली. या महाराष्ट्र गीताची पार्श्वभूमी, त्याविषयीची माहिती व राज्यगीताच्या गायन, वादनासंदर्भात शासनाने जे निर्देश दिले आहेत; त्या सर्वांबाबतची माहिती करून देणारा, सर्वांसाठी उपयुक्त ठरणारा लेख.*

देशातील एक समृद्ध, संपन्न राज्य म्हणजे महाराष्ट्र. या नावातच महानता आहे. महान राष्ट्र ते महाराष्ट्र. महाराष्ट्राला शेकडो वर्षांची परंपरा आहे. या भूमीला ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा आहे. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा. मराठी भाषक लोकांचा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र. आधुनिक महाराष्ट्राचा विचार करता कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ, मराठवाडा या सर्व भागांचा समावेश करून १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

निसर्ग सौंदर्याने नटलेली कोकण किनारपट्टी, सह्याद्री सातपुड्याच्या उंच उंच पर्वतरांगा, या पर्वतरांगांच्या कडेकपारीत ऐतिहासिक साक्ष देत उभे असलेले गडकिल्ले, कृष्णा, कोयना, गोदावरी यांसारख्या नद्यांनी समृद्ध केलेला पठारी प्रदेश, जगप्रसिद्ध अजिंठा-वेरुळ लेणी, उल्कापाताने अस्तित्वात आलेले वैशिष्ट्यपूर्ण असे लोणार सरोवर, अशा कितीतरी वैशिष्ट्यांनी समृद्ध बनलेला महाराष्ट्र.

संत शिरोमणी ज्ञानेश्वरांपासूनची संत परंपरा. छत्रपती शिवाजी महाराजांपासूनची शौर्याची परंपरा. छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुरोगामी विचारांची परंपरा. साहित्य, कला, संगीत अशा सर्व क्षेत्रांत महाराष्ट्र भूमीचे फार मोठे योगदान आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी. देशाची आर्थिक राजधानी. देशातील एक मोठे औद्योगिक केंद्र. पुणे, नागपूर, नाशिक अशा अनेक मोठ्या शहरांचा समावेश असलेला; पण बहुतांशी ग्रामीण संस्कृतीचा कृषी परंपरेचा महाराष्ट्र. अशा या समृद्ध महाराष्ट्राची थोरवी गाणाऱ्या, महती सांगणाऱ्या अनेक रचना कवींनी केल्या आहेत. त्यांपैकी राजा बढे यांची ‘जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा.’ ही रचना आता महाराष्ट्र गीत म्हणून मान्यता पावली आहे.

## महाराष्ट्र गीताची निर्मिती :

कविवर्य राजा नीळकंठ बढे यांनी महाराष्ट्र गीताची रचना केली. ते संपादक, चित्रपट अभिनेते, साहित्यिक म्हणून परिचित होते. सुरुवातीला त्यांनी काही काळ पत्रकारिता केली. त्यानंतर आकाशवाणीवर निर्माता म्हणून काम केले. ‘रायगडचा राजबंदी’ या चित्रपटाचीही निर्मिती केली.

संस्कृत काव्य आणि उर्दू शायरीचा त्यांचा चांगला अभ्यास होता. ते उत्तम कवी, गीतकार होते. त्यांची अनेक गाणी गाजली. त्यांच्या नावावर अठरा कवितासंग्रह, चार नाटके, नऊ संगीत एकांकिका आहेत. तसेच त्यांनी कादंबरी लेखनही केले.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या दरम्यान त्यांनी दोन महाराष्ट्र गीतांची रचना केली.

त्यांपैकी 'गर्जा महाराष्ट्र माझा', हे गीत खूप गाजले. प्रसिद्ध संगीतकार श्रीनिवास खळे यांनी ते संगीतबद्ध केले आणि कृष्णराव गणपतराव ऊर्फ शाहीर साबळे यांनी आपल्या खड्या आवाजात ते गायले आणि विविध कार्यक्रमांतून ते महाराष्ट्रभर पोहोचवले.

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्याचा सोहळा मुंबईत शिवाजी पार्क, दादर येथे झाला. त्या समारंभात शाहीर साबळे यांनी हे गीत सादर केले होते. तेव्हापासून महाराष्ट्राचे प्रेरणागीत, स्फूर्तिगीत म्हणून या गीताची ओळख होती. ते आता महाराष्ट्राचे अधिकृत राज्यगीत ठरले आहे.

## राज्यगीत म्हणून मान्यता :

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रत्येक राज्याचे एक राज्यगीत असावे, असा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे आतापर्यंत तेरा राज्यांनी आपले राज्यगीत जाहीर केले आहे.

त्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे, तसेच आसाम, आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगड, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, मणिपूर, ओडिसा, पाँडिचेरी, तमिळनाडू, उत्तराखंड या राज्यांनी आपापली राज्यगीते तयार केली आहेत.

महाराष्ट्राच्या बाबतीत विचार करायचा झाला, तर मराठी माणसाच्या मनात स्वाभिमानाचे स्फुलिंग चेतवणारे 'गर्जा महाराष्ट्र' हे गीत आहे. ते सर्वांच्या परिचयाचे आहे. या मूळ गीतातील पहिले कडवे वगळून दोन कडव्यांच्या गीताला राज्यगीत म्हणून मान्यता देण्यात आली.


३१ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला. सदर शासन निर्णय दि. १ फेब्रुवारी २०२३ रोजी जाहीर करण्यात आला. तसेच त्याची अंमलबजावणी शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर म्हणजेच १९ फेब्रुवारी, २०२३ पासून सुरू झाली.

## महाराष्ट्राचे राज्यगीत व त्याचा अर्थ :

*जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा,*
*जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।ध्रु.।।*

*भीती न आम्हां तुझी मुळीही गडगडणाऱ्या नभा,*
*अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा*
*सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभू राजा*
*दरीदरीतून नाद गुंजला, महाराष्ट्र माझा*
*जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।*

*काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी*
*पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी*
*दारिद्र्याच्या उन्हात शिजला*
*निढळाच्या घामाने भिजला*
*देश गौरवासाठी झिजला*
*दिल्लीचेही तख्त राखितो*
*महाराष्ट्र माझा*
*जय जय महाराष्ट्र माझा,*
*गर्जा महाराष्ट्र माझा*
*जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।*



माझा महाराष्ट्र थोर आहे. त्याचा सदैव जयजयकार असो. अशी गर्जना सर्व जण करतात.

महाराष्ट्रातील सर्वांना महाराष्ट्राचा अभिमान वाटतो, म्हणूनच अभिमानाने आपण जयजयकार करतो.

आमच्या विरोधात कटकारस्थाने करणाऱ्या किंवा विरोधात बोलणाऱ्यांची, त्याबद्दल गडगडाट करणाऱ्यांची, आम्हांला भीती वाटत नाही. नैसर्गिक अथवा परकीय कोणतेही संकट आले, तरी त्याला आम्ही धैर्याने तोंड देऊ. अशा संकटांना शब्दाने आणि कृतीने उत्तर द्यायचे अशीच शिकवण सह्याद्रीचा सिंह असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी दिली आहे. त्यांच्याच जयजयकाराच्या घोषणा दऱ्याखोऱ्यांतून घुमत आहेत. अशा माझ्या महाराष्ट्राचा जयजयकार असो!

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कडेकपारीतील माणसे रांगडी आहेत. ती घाबरणारी, भिणारी नाहीत. ती निधड्या छातीची आहेत. त्यांच्या काळ्या छातीवर महाराष्ट्राच्या अभिमानाची लेणी कोरली आहेत, म्हणजेच त्यांच्या मनात आणि हृदयात महाराष्ट्राच्या भूमीविषयी, संस्कृतीविषयी अपार प्रेम आहे. आजवरचे पराक्रम, लढाया आणि काबाडकष्ट करण्याची सवय यांमुळे, मनगटात पोलादी ताकद निर्माण झाली आहे. वेळ आली तर, अन्याय झाला तर, जीवावर उदार होऊन प्राणपणाने झुंजायला तयार असतात. महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, उन्हातान्हात काम करतो. घाम गाळतो, घाम हाच कष्टकऱ्यांचा अलंकार आहे, तो त्यात भिजला तरी त्याचा त्याला अभिमान आहे. असा कष्टकरी देशासाठी, देशाच्या रक्षणासाठी, देशाच्या गौरवासाठी, आपला देह झिजवतो. पिढ्यान्‌पिढ्या हे घडत आले आहे. पेशवाईत आपल्या कर्तृत्वाने मराठी माणसांनी दिल्लीच्या बादशहालाही आश्रय दिला होता. असा दिल्लीचे तक्त राखणारा, इतका मोठा पराक्रम गाजविणारा महाराष्ट्र आहे. अशी गौरवशाली परंपरा असलेल्या महाराष्ट्राचा जयजयकार असो!

राज्यगीतासंदर्भात औचित्याचे पालन करण्यासाठी काही निर्देश देण्यात आले आहेत, ते खालीलप्रमाणे...

(१) 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताचा राज्यगीत म्हणून अंगीकार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) शासनाच्या सर्व सार्वजनिक कार्यक्रमात सुरुवातीस राष्ट्रगीताचे गायन, वादन हे ध्वनिमुद्रित आवृत्ती सोबत अथवा स्वतंत्रपणे करण्यात यावे.

(३) १ मे महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत झाल्याबरोबर राज्यगीत वाजविले अथवा गायले जाईल.

(४) राज्यातील शाळांमध्ये दररोज परिपाठ, प्रतिज्ञा, प्रार्थना राष्ट्रगीत यांसोबतच राज्यगीत वाजविले अथवा गायले जाईल.

(५) राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था सर्व प्रकारच्या शासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी आस्थापना तसेच सर्व नागरिकांना सांस्कृतिक सामाजिक आणि क्रीडाविषयक कार्यक्रम इत्यादींमध्ये राज्यगीताचा योग्य तो सन्मान राखून ते वाजविण्यास व गाण्यास मुभा राहील.

(६) राज्यगीत सुरू असताना सर्वांनी सावधान स्थितीत उभे राहावे व राज्यगीताचा सन्मान करावा. लहान बालके, गरोदर स्त्रिया, आजारी व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती तसेच वृद्ध व्यक्ती यांना सावधान उभे राहण्यापासून सूट असेल.

(७) राष्ट्रगीताबाबतीत जसे तारतम्य बाळगण्यात येते, तसेच ते राज्यगीताच्या बाबतीतसुद्धा बाळगण्यात यावे. हे गीत वाजवताना, गाताना त्याचा योग्य तो सन्मान राखण्यात यावा.

**(पृष्ठ क्र. ३२ वर )**

# शालेय जीवनातून व्यावसायिक कौशल्यांचा विकास

**डॉ. इब्राहिम नदाफ**
वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर, जि. सोलापूर.
**भ्रमणध्वनी :** ८६६८६८८१५०

*राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – २०२३ मध्ये व्यवसाय शिक्षणाचा विचार केला आहे. प्राथमिक स्तरावर व्यवसायपूर्व तयारीबाबतचा विचार केला आहे. श्रमप्रतिष्ठा या मूल्याची रुजवण करण्यासाठी मार्गदर्शक ठरणारा हा लेख.*

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – २०२३ अंतर्गत संपूर्ण देशासाठी शालेय शिक्षणाचा आराखडा नुकताच प्रकाशित करण्यात आलेला आहे. यामध्ये अभ्यासक्रमविषयक दृष्टिकोन, शालेय विषय, महत्त्वाच्या संकल्पना, शालेय संस्कृती आणि कार्यप्रणाली व शालेय शिक्षणासाठी आधारभूत परिसंस्था निर्मिती यांबाबत विस्तृतपणे मार्गदर्शन करण्यात आले आहे. शालेय विषयांमध्ये भाषा, गणित, विज्ञान, सामाजिकशास्त्र, कला, आंतरविद्याशाखीय क्षेत्रे, शारीरिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण यांबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

व्यवसाय शिक्षण हे विविध प्रकारची कामे करण्यासाठीचे विशिष्ट ज्ञान, क्षमता आणि वृत्ती निर्माण करते. व्यवसाय शिक्षण हे स्वतंत्रपणे तसेच भाषा, गणित, विज्ञान व सामाजिकशास्त्र या विषयांतून शिकवले जाते. व्यवसाय शिक्षणात पायाभूत व प्रारंभिक शिक्षणाच्या स्तरावर व्यवसायपूर्व कौशल्य विकसनावर भर देण्यात यावा. माध्यमिक स्तरावर व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यात यावीत, तर उच्च माध्यमिक स्तरावर अर्थार्जनासह रोजगार मिळवण्यासाठीची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी असा दृष्टिकोन ठेवण्यात आलेला आहे.

## व्यवसाय शिक्षणाची ध्येये :

**(अ) निरनिराळ्या क्षेत्रांतील कार्यविषयक समज व क्षमता विकसन :**

विद्यार्थ्यांना निरनिराळ्या व्यवसायांबाबत समज येईल आणि त्यातून ते स्वतःची कामे स्वतः करतील, तसेच याद्वारे व्यवसाय निर्मितीसाठी पुढाकार घेतील व समाजातील विविध व्यवसायांच्या संधींची ओळख करून घेतील.

**(ब) विशिष्ट व्यवसायांची पूर्वतयारी :**

विद्यार्थी त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत एक किंवा अधिक व्यवसायांबाबतच्या क्षमता विकसित करतील.

**(क) श्रम आणि इतर व्यवसायांना आदर व प्रतिष्ठा :**

विद्यार्थी श्रमप्रतिष्ठा मूल्यप्राप्तीतून कार्य व कार्यस्थळांविषयी आदर विकसित करतील.

**(ड) कार्यविषयक मूल्ये व वृत्ती विकसन :**

विद्यार्थ्यांमध्ये चिकाटी व अवधान, कुतूहल व नवनिर्मिती, समानानुभूती आणि संवेदनशीलता, साहचर्य आणि संघवृत्ती विकसित करतील.

## व्यवसायांचे स्वरूप व क्षेत्रे :

कृषी, वस्त्र, व्यावसायिक कला, उत्पादन व सेवा या क्षेत्रांतील उद्योगांना प्राधान्य देण्यात यावे. जीवन आणि निसर्गाशी सहसंबंध निर्माण करणाऱ्या क्षेत्रांची निवड करण्यात यावी. व्यावसायिक साधने व यंत्रे

यांच्याशी संबंधित क्षेत्रांवर भर देण्यात यावा. व्यवसाय शिक्षणामध्ये मानवामानवात योग्य प्रकारचा अनुबंध निर्माण होणारी क्षेत्रे समाविष्ट करावीत असे सुचवण्यात आले आहे.

शालेय शिक्षणाच्या पायाभूत व प्रारंभिक स्तरावर एकात्मिक दृष्टिकोनातून व्यवसाय शिक्षणपूर्व क्षमतांचा विकास करण्यात येईल, तर माध्यमिक स्तरावर प्रकल्पांच्या माध्यमातून व्यवसाय शिक्षणाची अनुभूती देण्यात येईल. उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षक व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध व्यवसाय कौशल्ये विकसनावर भर देण्यात यावा, असे सांगण्यात आले आहे.

**व्यवसाय शिक्षणासमोरील आव्हाने :**

सद्यःस्थितीत व्यवसाय शिक्षणात पुढील आव्हाने आहेत.

(१) समाज घटकांच्या मते, ज्या विद्यार्थ्यांकडे शिक्षण घेण्याची क्षमता नाही, त्यांनी व्यवसाय शिक्षण घ्यावे हा दृष्टिकोन बदलावा लागेल.

(२) व्यवसाय शिक्षण गेल्या दोन दशकांपासून शैक्षणिक व संसाधनात्मक अडचणींना सामोरे जात आहे.

(३) व्यावसायिक शिक्षणविषयक भौतिक साधने उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांचा सराव देता येत नाही.

(४) प्रात्यक्षिके व हँड्सऑन लर्निंगचे मूल्यमापन करण्याची समज नाही.

(५) शालेय व्यावसायिक शिक्षणाचा उद्योगजगताशी सहसंबंध नाही.

(६) व्यावसायिक शिक्षणासाठी शिक्षक शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध नाही.

या आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये पायाभूत, प्रारंभिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवरील उद्दिष्टे व अध्ययन क्षमता यांबाबत विस्तृतपणे विवेचन करण्यात आलेले आहे.

**व्यवसाय शिक्षणासाठी आशय निवड :**

व्यवसाय शिक्षणासाठी निवडण्यात येणारा आशय स्थानिक परिसराशी सुसंगत असावा.

विद्यार्थ्यांच्या आकांक्षा पूर्ण करणारा असावा, तसेच NSQF च्या अपेक्षांची परिपूर्ती करणारा असावा.

(१) विद्यार्थ्यांच्या वयानुरूप असावा.

(२) केवळ माहिती देणारा नसावा, तर तो रंजक व अर्थपूर्ण असावा.

(३) आशयातून व्यवसाय शिक्षणाची संधी निर्माण व्हावी.

(४) निवड केलेला आशय हा व्यावसायिक परिसंस्था सुदृढ करणारा असावा.

(५) व्यवसाय शिक्षणात विद्यार्थ्यांची अभिरुची वाढवणारा असावा.

(६) विविध व्यवसायविषयक कौशल्यांची अनुभूती घेण्याची संधी उपलब्ध करून देणारा असावा.

**व्यवसाय शिक्षण अध्ययन-अध्यापनाची तत्त्वे :**

शालेय विषयांचे अध्ययन-अध्यापन व व्यवसाय शिक्षणाचे अध्ययन-अध्यापन एकाच प्रकारे करण्यात येऊ नये. विद्यार्थ्यांत व्यावसायिक कौशल्ये विकसित होणाऱ्या कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा. व्यवसाय शिक्षणाच्या वर्गाध्यापनात पुढील तत्त्वांचा वापर करावा.

(१) व्यवसाय शिक्षणाचा दृष्टिकोन मिश्र असावा. त्यात पुढच्या अनुभवात्मक, हँड्सऑन, गटकार्य, सूचना व प्रात्यक्षिके यांचा समावेश असावा.

**(पृष्ठ क्र. ३२ वर )**

# निपुण भारत : निपुण महाराष्ट्र

**रूपाली कस्तुरे**
केंद्रीय प्राथमिक शाळा गदाना,
ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद.

*निपुण भारत मिशन अंतर्गत विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यासाठी, कोरोना काळात शिक्षणात पडलेला खंड लक्षात, घेता इयत्ता पहिली ते तिसरीतील माता-पालकांचे गट करून त्यांच्याद्वारे मुलांच्या अध्ययनातील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. या राष्ट्रीय स्तरावरच्या उपक्रमाचा आपल्या भागात कसा उपयोग झाला याची माहिती देणारा लेख.*

केंद्र सरकारचा 'निपुण भारत मिशन' हा कार्यक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंतर्गत सुरू झाला. २३ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार 'निपुण भारत अभियान' सुरू झाले.

यास अनुसरून महाराष्ट्र शासनाने २७ ऑक्टोबर, २०२१ व २९ जून, २०२२ च्या आदेशान्वये निपुण भारत मिशन (FLN) अंतर्गत माता-पालक गट स्थापन करण्याचे सूचित केले.

माता-पालक गटांचा उद्देश, रचना त्याचप्रमाणे शिक्षक म्हणून या गटांचा शाळेला काय फायदा झाला यांविषयी आपण चर्चा करूया.

कोरोना काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले, हे आपण जाणतोच. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या २७ ऑक्टोबर, २०२१ व २९ जून, २०२२ च्या आदेशान्वये इयत्ता पहिली ते तिसरीतील विद्यार्थ्यांच्या मातांचे गट स्थापन करावयाचे सूचित केले.

### माता-पालक गट :

बालकांची शाळापूर्व तयारी न झाल्यामुळे बालकांना शाळेतील वातावरण, श्रवण, भाषण, लेखन, वाचन व गणनक्रिया करताना अडचणींना सामोरे जावे लागते. यासाठी मायेने, प्रेमाने व बालकांचा हात धरून त्यांना जर कोणी तेथपर्यंत पोहोचवू शकत असेल, तर त्या 'माता' आहेत. त्याचबरोबर आपल्या बालकांच्या सूक्ष्म क्षमतांच्या विकासात मातांचाही सहभाग राहील व त्यांच्या मदतीने बालकांच्या औपचारिक क्षमतांचा विकास होईल.

### रचना :

यात इयत्ता पहिली ते तिसरीतील विद्यार्थ्यांच्या मातांचा सहभाग आहे. जे विद्यार्थी जवळ राहतात, अशा विद्यार्थ्यांचे गट करण्यास प्राधान्य देण्यात आले. ४ ते ६ मातांचा एक गट करण्यात आला. ज्या माता उत्साही आहेत व गटप्रमुख म्हणून काम करू शकतात, अशा मातांना 'लीडर माता' म्हणून निवडले गेले. अशा प्रकारे गटाची रचना करण्यात आली.

### कार्य :

शिक्षकांच्या माध्यमातून 'निपुण भारत' (FLN) अंतर्गत दर सोमवारी १० ते १५ मिनिटांचे व्हिडिओ येतात. ते लीडर मातांच्या मोबाईलवर पाठवले जातात. व्हिडिओत सांगितलेले खेळ, कृती, उपक्रम लीडर मातेने आपल्या गटातील मातांकडून त्यांच्या गटातील सर्व मातांच्या वेळेनुसार करून घ्यायचे आहेत. त्यानंतर प्रत्येक मातेने तो खेळ, उपक्रम व कृती आपापल्या

मुलांकडून करवून घ्यायच्या आहेत. त्याचबरोबर महिलांना मोबाईल वापरासंबंधीची माहितीही त्या व्हिडिओमध्ये प्रात्यक्षिकासह दाखवलेली आहे. उदा., व्हॉट्सॲप कसे वापरावे, मेसेज पाठवणे, आलेले मेसेज पाहणे, फोटो पाठवणे इत्यादी अत्यंत उपयुक्त माहिती देण्यात येते. याचा महिलांना खूप फायदा झाला व या माध्यमातून मोबाईल हाताळण्याचेही प्रशिक्षण होत आहे. त्या मोबाईल हाताळत आहेत.

दर सोमवारी हा व्हिडिओ (FLN) तालुका स्तरावरील ग्रुपवर येतो व शिक्षकांच्या माध्यमातून तो सर्व लीडर मातांना पाठवला जातो. त्यात मागील आठवड्याचा आढावा घेऊन पुढील कृती घेण्यात येतात.

अत्यंत साध्या–सोप्या कृती, उपक्रम आहेत जे भांडी, डाळी इत्यादी घरातील वस्तू, साधने वापरून करता येतात. माता या औपचारिक शिक्षणाचा भाग बनत आहेत.

अत्यंत उपयुक्त असा हा उपक्रम आहे. याचा फायदा शाळा स्तरावर शिक्षक म्हणून असा जाणवला, की मातांना या छोट्या कृती करताना गटामध्ये एकत्र येण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर यातील खेळ, उपक्रम करताना त्यांनीही यातून आनंद अनुभवला.

उदा., बादलीत चेंडू टाकणे, रंग ओळखणे, आकार ओळखणे, साधे चित्र काढणे, चिकटकाम करणे, पुस्तक डोक्यावर ठेवून चालणे, आवाज ओळखणे, डाळी ओळखणे इत्यादी सर्व कृती माता अत्यंत उत्साहाने व आनंदाने करत आहेत व लीडर मातांच्या ग्रुपवर याविषयीच्या माहितीचे व्हिडिओ पाठवत आहेत.

याची पुढची अपेक्षित कृती, म्हणजे मातांनी या कृती आपल्या बालकांकडून करून घेणे आहे. याबाबत माझा अनुभव खूपच सकारात्मक आहे. माता आपापल्या बालकांकडून या कृती करवून घेत आहेत.

महिन्याच्या शेवटी लीडर माता व इतर सर्व मातांची बैठक घेण्यात येते. त्यात असे जाणवले, की प्रत्येक मातेला आपले मूल शिकण्याच्या कोणत्या पायरीवर आहे, हे समजले. त्याला वारंवार सरावाची गरज आहे, की ते लगेच लक्षात ठेवून उपक्रम, कृती करत आहे याचा अनुभव मातेने स्वतः घेतल्यामुळे, तसेच बालकांच्या औपचारिक शिक्षणाचे थोडेसे ज्ञान झाल्यामुळे आणि त्यात स्वतः सहभागी असल्याने मुलांच्या विकासाची क्षमता मातांच्या लक्षात आली व त्या स्वतःच सांगू लागल्या, आमच्या मुलांना खूप वेळा सांगितल्यावर कृती जमतात किंवा ती लगेच करू शकतात.

वर्गात अध्ययन–अध्यापन करताना याचा निश्चितच खूप फायदा झाला. जे विद्यार्थी अध्ययनात थोडे मागे होते ते विद्यार्थी गणन, संख्याज्ञान, अक्षरवाचन यांत प्रगत होताना दिसू लागले.

याचा सगळ्यात महत्त्वाचा फायदा असा झाला, की मातापालक या शाळेशी जोडल्या गेल्या. त्यांना शिक्षणप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाल्यामुळे शाळेबद्दल आपलेपणा वाढला व आपले मूल प्रगत करणे ही आपली पण जबाबदारी आहे, असे त्यांना वाटू लागले. दर महिन्याला होणारी बैठक, वर्गशिक्षकांशी व्हिडिओ, कृती, फोटो यांबाबत वारंवार होणारा संवाद याचा शिक्षक म्हणून खूपच उपयोग झाला. ज्या माता शाळेत येत नव्हत्या त्यासुद्धा बैठकीत उत्साहाने सहभागी होऊन बालकांच्या प्रगतीविषयी चर्चा करू लागल्या.

६ ते ९ वर्षे या वयोगटातील विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन, जर त्यांच्या अडचणी सोडवल्या, तर निश्चितच शाळेतही ते मोकळेपणाने वावरतात. कारण शाळेत शिकवलेल्या बाबी ते घरी स्वतः करून बघतात. आपली आईच आपल्याशी खेळत आहे. ती पण आपल्यासारखेच आकार काढत आहे, चित्र रंगवत

आहे व आपल्याला पण त्यात सहभागी करत आहे, या अनुभवांमुळे बालकांचा आत्मविश्वास वाढत आहे. आनंददायी वातावरणात व उत्साहात ती कृतींमध्ये रममाण होत आहेत. अंगणवाडी, बालवाडी, शाळापूर्व तयारी यात राहून गेलेला सूक्ष्म क्षमतांचा विकास मातेच्या माध्यमातून बालकांच्या कळत नकळत होत आहे.

सूक्ष्म क्षमतांचा पाया भक्कम झाल्यामुळे बालकांची शाळेची भीती दूर होण्यास मदत होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या श्रवण, भाषण, संभाषण, संख्याज्ञान, गणन, गणनक्रिया या मूलभूत क्रिया विकसित व दृढ झाल्यामुळे त्यांचा पुढील शिक्षणाचा पाया निश्चितच भक्कम होत आहे.

**(पृष्ठ क्र. २७ वरून)**

(८) वाद्य संगीतावर आधारित या गीताची वाद्यधून पोलीस बँडमार्फत वाजवता येईल.

(९) राज्य शालेय शिक्षण मंडळाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये या राज्यगीताचा समावेश पुढील शैक्षणिक वर्षापासून करण्यात यावा.

अशा मार्गदर्शक सूचना 'जय जय महाराष्ट्र' या गीताला राज्यगीत म्हणून मान्यता देताना शासनाने दिल्या आहेत. त्यांचे सर्वांनी पालन करणे गरजेचे आहे व आपल्या राष्ट्रगीताप्रमाणेच राज्यगीताचाही सन्मान आणि औचित्य ठेवणे महत्त्वाचे आहे. देशाबरोबरच आपल्या राज्याचा स्वाभिमान जागृत करणारे आपले हे राज्यगीत आहे. ते सर्वांचे स्फूर्तिस्थान, प्रेरणास्थान आहे. यातून महाराष्ट्राचा, महाराष्ट्र संस्कृतीचा, महाराष्ट्र परंपरेचा आपण जयजयकार करीत आहोत. त्याचा संस्कार शालेय वयात होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**(पृष्ठ क्र. २९ वरून )**

(२) तात्त्विक व प्रात्यक्षिकांचा समावेश असावा.

(३) व्यवसाय शिक्षण हे वास्तविक जीवनाशी संबंधित असावे.

(४) वर्गअध्यापन–अध्ययनात क्षेत्रभेट व अनुधावन, कार्यशाळा यांचा समावेश असावा.

(५) सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना न्याय देणारा असावा म्हणजेच अध्ययन–अध्यापनात समावेशित दृष्टिकोन असावा.

(६) विद्यार्थ्यांना आंतरवासिता करण्याची संधी देण्यात यावी.

(७) उमेदवारांना शिकाऊ शिक्षणाची व्यवस्था असावी.

शालेय शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ मध्ये व्यवसाय शिक्षणविषयक दृष्टिकोन, अध्ययन–अध्यापनाची प्रणाली, आशय निवड, व्यवसाय शिक्षणाची क्षेत्रे यांबाबत यथायोग्य मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. शालेय अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके तयार करत असताना हे दस्तऐवज उपयोगी ठरणारे आहेत. व्यावसायिक शिक्षणाचे मूल्यमापन करताना सर्व समावेशक दृष्टिकोन असावा. आकारिक व संकलित या दोन्ही पद्धतीने मूल्यमापन करण्यात यावे, असे सुचविण्यात आले आहे. व्यवसाय शिक्षणासाठी शालेय वेळापत्रकात प्रत्येक आठवड्यात घड्याळी अडीच तासिकांची शिफारस करण्यात आलेली आहे.

# बोलक्या भिंतींची बोलकी शाळा, लाविते ज्ञानाचा लळा...

**डॉ. उत्तम तानवडे**
जि. प. प्राथ. शाळा घोटगे–वायंगणतड,
ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.
**भ्रमणध्वनी :** ९४२३१६७२४२

*कर्नाटक आणि गोवा राज्याच्या सीमेलगत, सह्याद्रीच्या दुर्गम भागात असलेल्या, एका छोट्या एकशिक्षकी शाळेत लोकसहभागातून केलेला बदल आणि बोलक्या भिंती, रंगरंगोटी या कामाचा अनुभव व्यक्त करणारा हा लेख.*

*'शाळेतच होते सुजाण नागरिकांची पायाभरणी,*
*शाळेचा विकास हाच ध्यास असावा समाजाच्या मनी,*
*समाजाच्या सहभागातूनच दूर होतील सर्व अडचणी,*
*लोकसहभागातूनच शाळेला मिळावी नवसंजीवनी.'*

कोणत्याही गावाचा, समाजाचा आधारवड असते ती शाळा; कारण शाळेतूनच नैतिक मूल्यांची, संस्कारांची रुजवण केली जाते. शाळेतच उद्याच्या ज्ञानी, सुजाण, सुशिक्षित नागरिकांची मजबूत पायाभरणी केली जाते. त्यामुळेच मला वाटते, की शाळा हा त्या गावाचा कणा असतो. शाळा जेव्हा समस्येच्या विळख्यात सापडते, तेव्हा समाजाने, गावाने पुढे येऊन शाळेला समस्येच्या विळख्यातून बाहेर काढले पाहिजे.

प्रत्येक पालकाला आपल्या पाल्याची शैक्षणिक गुणवत्ता हवी असते. पालकांना आपल्या पाल्यांच्या गुणवत्तेत झालेला अपेक्षित बदल दिसायला लागला, की पालकांची पावले समाधानाने आपोआप शाळेकडे वळतात. पालकांचे हात शाळेसाठी काम करतात. पालकांना शाळेच्या सर्वांगीण विकासाची स्वप्ने झोपू देत नाहीत. मग हेच पालक, पैसा, वेळ, अंतर याचा विचार न करता शाळेसाठी अविरत धडपडतात. याचा प्रत्यक्ष सुखद अनुभव मी स्वत: एक शिक्षक म्हणून घेतला आहे.




सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गोवा व कर्नाटक राज्यांच्या सीमेवर वसलेला दोडामार्ग तालुका. अतिदुर्गम व सह्याद्रीच्या कडेकपारीत वसलेल्या दोडामार्ग तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथ. शाळा, घोटगे–वायंगणतड ही १० पटसंख्या असलेली इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतची एकशिक्षकी शाळा होय. या शाळेत १४ वर्षे काम केल्यानंतर, यावर्षी बदली होणार हे निश्चित होते. दरम्यानच्या काळात शाळेला बोलकी करायचे हे मनाने ठरवले होते; पण हे फक्त शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून शक्य नव्हते. त्यासाठी लोकवर्गणी, लोकसहभाग महत्त्वाचा होता. याबाबत शाळा व्यवस्थापन समितीकडे मत मांडले. मग शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष व सर्व सदस्यांनी, अध्यक्षांनी गावातील मुंबई व गोवास्थित असणाऱ्या दानशूर व्यक्तींचे मोबाईल क्रमांक संपर्कासाठी उपलब्ध करून दिले. त्यांच्याशी संपर्क करत राहिलो आणि उदंड असा प्रतिसाद मिळत गेला व त्यातून दीड लाख रुपयांपर्यंत रक्कम जमा झाली. लोकसहभागातून

शाळेला नवसंजीवनी देण्याच्या माझ्या स्वप्नाने प्रत्यक्ष सत्यात उतरून भरारी घेतली होती.

*केवळ 'अशक्य' वाटणाऱ्या गोष्टीला मूर्तरूप आले. शाळेला नवसंजीवनी मिळाली.*

*'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' हे ब्रीद खरे ठरले.*

शाळा रंगरंगोटीने सजली. मेहनत व ध्यास कामी आला. केवळ दोन ते तीन महिन्यांत शाळेचे रंगरूपच बदलले. तीन महिन्यांत शाळेची इमारत व भिंती रंगकामाने जिवंत, सजीव वाटू लागल्या. भिंतींवर झळकलेली आशयचित्रे नावीन्यपूर्ण व विद्यार्थ्यांना ज्ञानाचा लळा लावणारी, अशी आकर्षक व मनमोहक होती. सूर्यमाला, भारत, महाराष्ट्र, सिंधुदुर्ग, शिवकालीन इतिहास, पाढे, इंग्रजी विरुद्धार्थी शब्द, गडकिल्ले, राज्य–राजधान्या व सिंधुदुर्गातील किल्ले, तालुके, महाराष्ट्रातील जिल्हे, खंड हे सर्व अभ्यासक्रमातील भाग चित्रस्वरूपात भिंतींवर रेखाटून शाळेच्या भिंती बोलक्या केल्या. प्रत्येक वर्गाच्या बोलक्या व आकर्षक चारही भिंती ज्ञानदात्या बनल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनाची गोडी लागली. ज्ञान मिळवण्याची भूकही माहिती वाचून भागली.




**फलनिष्पत्ती :**

समाजाप्रति असलेले आपले उत्तरदायित्व आणि शाळेमुळे गावाचा वाढलेला नावलौकिक यांमुळे माझी ओळख नसतानाही, माझी व त्यांची यापूर्वी प्रत्यक्ष भेट झाली नसतानाही, एका फोनवरून केलेल्या संपर्काद्वारे शाळेला १० हजार ते १५ हजार रुपयांपर्यंत सढळ हाताने मदत करणारे दाते मिळाले आणि शाळा बोलकी झाली. बोलक्या भिंतींची बोलकी शाळा, शाळेतील विद्यार्थ्यांना आकर्षित करू लागली. त्याचा परिणाम इतका छान होता, की दुसरी ते चौथीपर्यंतच्या आठही विद्यार्थ्यांना जगातील सात खंड, भारतातील राज्ये, महाराष्ट्रातील जिल्हे, गडकिल्ले यांची संपूर्ण माहिती मिळाली. शिवाजीराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांचे ज्ञान झाले. इयत्ता दुसरीमधील विद्यार्थीही जगातील सात खंडांची नावे अचूक सांगू लागले. हे मोठे फलित होते. मला शिक्षक म्हणून शाळेच्या आवारात प्रवेश करताना लाखमोलाचे समाधान मिळत होते. शाळेत प्रवेश करताना मन प्रसन्न व प्रफुल्लित होत होते. ग्रामस्थ व पालकांनाही शाळेची ओढ लागली होती, शाळेच्या भिंती बोलक्या झाल्यामुळे शाळा ज्ञानसमृद्ध व ज्ञानश्रीमंत वाटू लागली. याचा मला विलक्षण आनंद होत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी या बोलक्या भिंतींचा लक्षणीय असा उपयोग झाला. विविध स्पर्धापरीक्षा व प्रश्नमंजूषेच्या परिपूर्ण तयारीसाठी या बोलक्या भिंती खूपच लाभदायक ठरल्या. स्वतःची मुले शाळेत शिकत नसतानाही, आपल्या घामाच्या पैशाने मुंबई, गोवास्थित सधन व मनाने श्रीमंत असणाऱ्या देणगीदारांनी गावासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेली गुंतवणूक फलदायी ठरली. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी या कार्यासाठी बळ दिले; विश्वास दिला. त्यामुळे शाळा बोलक्या भिंतींची बनली व विद्यार्थ्यांना शिकण्याची गोडी वाटू लागली.

# फिरते वाचनालय

**भीमराव शिंदे**
जि. प. प्राथ. शाळा बालवडी,
ता. भोर, जि. पुणे
**भ्रमणध्वनी :** ९८२२८८६२६२

*अलीकडे वाचनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. मुलांना वाचनाची गोडी लागावी या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्याची गरज भासते आहे. या पार्श्वभूमीवर वाचन संस्कार रुजविण्यासाठी व वाचन संस्कार जोपासण्यासाठी, शाळेच्या आवारात कोठेही बसून वाचन करता येईल असे फिरते वाचनालय कसे सुरू केले, त्याविषयीचे अनुभव कथन.*

आजकालच्या काळात इंटरनेटवर सर्व काही उपलब्ध असले, तरी त्यातून प्रत्यक्ष अनुभव मिळत नाहीत. ते अनुभव मुलांना पुस्तक वाचनातूनच मिळतात. कोणत्याही विषयासंदर्भात सखोल विचार करायचा असेल; तर त्यासाठी वाचन आवश्यक आहे. वाचनाने विचार विकसित होऊन बुद्धीची मशागत होते व जीवन फुलते. माणूस समृद्ध होतो.

मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यात आज समाज अडकत चालला आहे. त्यामुळे वाचनसंस्कृती दिवसेंदिवस नष्ट होत चालली आहे. 'वाचाल तर वाचाल' ही उक्ती लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शाळेने फिरते वाचनालय सुरू केले.

'फिरते वाचनालय' या नावातच गंमत वाटत असल्याने विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना या वाचनालयाविषयी कुतूहल वाटू लागले. उत्सुकतेने वाचनालयाकडे वळलेली मुले वाचनात केव्हा रमायला लागली, हे त्यांचे त्यांनाही कळले नाही.




फिरते वाचनालय सुरू करण्याचे ठरताच कार्यवाहीला सुरुवात झाली. लोकसहभागातून छत्र्या, टेबल, स्टूल, ट्रे आणि पुस्तके खरेदी केली. शाळेच्या वेळेतच विद्यार्थी स्वत: त्यांच्या आवडीच्या ठिकाणी, चार भिंतींच्या बाहेर, मोकळ्या मैदानावर वाचनालय उभारून गोष्टींच्या पुस्तकांचे वाचन करू लागले. जोडवर्गासाठी हे वाचनालय फारच उपयुक्त ठरले. आज बहुतेक शाळांमध्ये एका शिक्षकाकडे दोन वर्ग अशी परिस्थिती आहे. अशा वेळी एका वर्गावर अध्यापन करत असताना दुसऱ्या वर्गातील मुलांना या वाचनालयातील पुस्तके वाचण्यात गुंतवून ठेवता येते. फिरते वाचनालय सुरू केल्यामुळे एक विद्यार्थी महिन्याला सरासरी १५ गोष्टींची पुस्तके वाचू लागला. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली. त्यांच्या ज्ञानात भर पडू लागली, त्यामुळे विद्यार्थ्यांचे मन शांत राहून एकाग्रता वाढली. ग्रहणशक्ती, निरीक्षण आणि विश्लेषण करण्याची सवय लागली. शब्दसंग्रह वाढला. लिखाण व विचारशैली सुधारली. आत्मविश्वास वाढला आणि जिद्दीने काम करण्यासाठी नवीन प्रेरणा मिळाली.


# रानातली शाळा

**विजय उरकुडे**
जि. प. केंद्र शाळा ताडगाव,
ता. भामरागड, जि. गडचिरोली.

*गडचिरोली जिल्ह्यातील ताडवृक्षांनी बहरलेले ताडगाव. या गावातील स्थानिक परिस्थिती, उपलब्ध नैसर्गिक साधने यांचा अध्यापनासाठी वापर करत मुलांची माडिया भाषा अवगत करून त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देणाऱ्या शिक्षकांचे अनुभव कथन.*

गडचिरोली जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातील अगदी टोकावर असलेला भामरागड तालुका आणि त्या तालुक्यातील माझी शाळा म्हणजे ताडगाव. अगदी नावाप्रमाणेच ताडवृक्षांनी बहरलेले गाव.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा, ताडगाव येथे जेव्हा बदली झाली, तेव्हा थोडा नाराजच झालो; कारण यापूर्वी केवळ शहरी विभागातच मी अध्ययन–अध्यापन केले होते. भामरागड परिसर संपूर्णतः आदिवासी. तेथील बोलीभाषा माडिया. तिथे जाणे म्हणजे जगाशी संपर्क कमी. वर्तमानपत्र नाही, मोबाईल कव्हरेज कमी. संपूर्ण परिसर जंगलमय. या वातावरणाला कसे सामोरे जाणार? असा विचार करतच शाळा गाठली.



ताडगाव येथील शाळेत रुजू झालो. नवे शिक्षक, नवे विद्यार्थी, नवा परिसर या सर्वांनी माझे स्वागत केले. शिक्षक व मुलांशी चर्चा करताना असे जाणवले, की मी अध्यापनासोबतच अध्ययनही करायला आलो आहे. तिथे मी एक नवागत विद्यार्थीच होतो. दोन स्थानिक शिक्षक व इतर दोघांना त्यांची बोलीभाषा यायची. मी मात्र या क्षेत्रात नवखा होतो. त्यांच्यासोबत राहून त्यांचे राहणीमान आणि संवाद साधण्यासाठी पर्यायाने जवळीक साधण्यासाठी एकमेव साधन होते, ते म्हणजे त्यांची माडिया ही बोलीभाषा शिकून घेणे. काही दिवसांतच मला जाणवले, की सर्व विद्यार्थी वर्गाव्यतिरिक्त अनौपचारिक चर्चा ही बोलीभाषेतूनच करायचे. तेव्हाच मी ठरवले, की माडिया भाषा शिकण्यास सुरुवात करायची. शासनाने द्विभाषिक पुस्तके, अध्ययन साहित्य पुरवले आहेच. प्रत्यक्ष कृतीतून जसे पूर्वप्राथमिक किंवा प्राथमिक शिक्षण दिले जाते, तसे हसत–खेळत शिक्षणाला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांसाठी जसे दैनिक टाचण काढले जाते, तसे माझे स्वतः साठी टाचण काढणे सुरू झाले. अभ्यास अगदी काळजीपूर्वक सुरू झाला; परंतु भीतीही वाटत होती. एखादा शब्द उच्चारला आणि त्याचा बोलीभाषेत वेगळाच अर्थ निघाला तर, म्हणून काळजी घेणे गरजेचे

**(पृष्ठ क्र. ३९ वर)**

# असा साधला संवाद

**दीपाली शेडगे**
जि. प. प्राथ. शाळा बुदगुडे वस्ती,
(भाबवडी), ता. भोर, जि. पुणे.
**भ्रमणध्वनी :** ७७७५९८०६४६

*अबोल मुलांना बोलते करणे, त्यांना शिक्षण प्रक्रियेत सामावून घेणे हे काम शिक्षकांना कौशल्याने करावे लागते. त्यांच्याशी प्रेमाने संवाद साधावा लागतो. अशा संवादातून आपलेपणा वाटू लागला, की ती मुले इतरांच्यात आणि वर्गकार्यात रमतात. अशाच प्रकारचा अनुभव कथन करणारा लेख.*

*'जो जगी शिकवी जगाला,*
*धन्य त्याचा जन्म आहे,*
*ज्ञानज्योत तेवत ठेवा,*
*जिथे–जिथे अज्ञान आहे!'*

वरील ओळी वाचल्या की, आपल्या समोर विद्यार्थी व शिक्षक यांचे एक अनोखे नाते उलगडत जाते. शिक्षक म्हणून काम करत असताना विद्यार्थ्यांशी आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, माया यांचे एक घट्ट नाते निर्माण होते. समाजातील विविध स्तरांमधून आलेले विद्यार्थी, त्यांची कौटुंबिक व सामाजिक स्थिती हे पाहता त्यांनी शैक्षणिक वातावरणाशी एकरूप व्हावे यासाठी प्रयत्न करताना शिक्षकांना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा नंदादीप तेवत ठेवण्यासाठी, ज्ञानरूपी वसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी प्रत्येक शिक्षक धडपडत असतो. हे करत असताना विभिन्न परिस्थितीतील विद्यार्थ्यांशी त्यांना संवाद साधावा लागतो.



मी माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांशी कसा संवाद साधला ते पाहूया.

भोर तालुक्यात तालुक्याच्या गावापासून अगदी जवळ ३ कि.मी. अंतरावर असलेली माझी शाळा बुदगुडेवस्ती (भाबवडी). शाळेचा सुसज्ज परिसर, खाजगी इमारत, गुणवत्तापूर्ण शिक्षण, तसेच विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, यांमुळे विविध ठिकाणांहून विद्यार्थी शाळेत प्रवेश घेत असतात. एके दिवशी माझ्या सहकारी मॅडम आणि मी दुपारी विद्यार्थ्यांना खेळायला बाहेर क्रीडांगणावर घेऊन गेलो होतो. त्या वेळी लाजराबुजरा स्वराज व त्याची बहीण आईबरोबर शाळेत आले. आम्ही चौकशी केली असता समजले, की त्याला वडील नव्हते. शाळेजवळच्या एक मोठ्या हॉटेलमध्ये त्यांची आई काम करत होती. त्यामुळे परगावाहून आलेला स्वराज व त्याची बहीण आमच्या शाळेत दाखल झाले होते.

त्यांची कौटुंबिक परिस्थिती अगदी बेताची होती. शाळेजवळ एक भाड्याची खोली घेऊन ते तिथे राहायला आले होते. आम्हांलाही आनंद झाला. लाजरा स्वराज आम्हा शिक्षिकांशी अजिबातच बोलत नव्हता. शाळेत येणे, शांत बसणे आणि शाळा सुटल्यावर निघून जाणे, काही दिवस असेच चालू होते. आम्ही गेल्यावर त्यांचा गणवेश, वह्या, पुस्तके, पाटी–पेन्सिल या सगळ्यांची सोय केली; परंतु त्यांचे

मानसिक स्वास्थ्य अजूनही चांगले नव्हते. कौटुंबिक परिस्थिती, गरिबी, एकटेपणा, बिनधास्तपणा यामुळे स्वराज खूपच हट्टी झाला होता. इयत्ता पहिलीमध्ये आम्ही त्याला दाखल केले, वैयक्तिक मार्गदर्शन केले. त्याच्या जवळ बसून विविध विषयांचे आकलन होईपर्यंत त्याला शिकवले. कोणती गोष्ट जमत नसेल, तर वैयक्तिक मार्गदर्शन केले. कधी ओरडलो तर तो एक तासभर दरवाजा बाहेर तासन्तास उभा राहत असे. पण आम्ही प्रयत्न सोडले नाहीत या स्वराजला गोड बोलून आम्ही शिक्षणाची गोडी लावली.

माझे विद्यार्थी व आम्ही सर्व जण त्याच्याशी सतत बोलत राहिलो. त्याचे मत विचारात घेऊन, तो म्हणेल तसे सर्व विषय शिकवू लागलो. विविध उपक्रम, गाणी–गोष्टी यांमध्ये सामावून घेऊ लागलो. विविध खेळ, गटात अभ्यास, गटात रेखाटन हे तो करू लागला. कधी–कधी तो दुपारी घरी गेला, की शाळेत येत नसे. मग आम्ही सर्वजण दुपारी त्याच्यासोबत जेवण करू लागलो. वेगवेगळे पदार्थ त्याला आवडीने देऊ लागलो. तो कधी घरी गेलाच, तर आम्हीही त्याच्या घरी जायचो.

वेळोवेळी त्याच्याशी प्रेमाने, मायेने, गोड बोलून विविध विषयांचा अभ्यास व बेसिक क्रिया त्याला शिकवल्या. त्याचे विचार मांडण्याची त्याला संधी दिली. कधी परिपाठाचेवेळी त्याला मॉनिटर केले, हस्तलिखित करून घेतले. विविध पक्षी, प्राण्यांची चित्रे चिकटवणे, बागेत झाडे लावणे, परसबाग स्वच्छता, विविध कार्यानुभव, वस्तू निर्मिती, स्वाध्यायपुस्तिकांचा वापर, नैसर्गिक सहलींचे आयोजन, मैदानी खेळ, विविध गोष्टींच्या पुस्तिकांचे वाचन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करून त्यात त्याला सहभागी करून घेतले. हळूहळू अबोल स्वराज वर्गात निर्भीडपणे बोलू लागला. विविध प्रश्नांची उत्तरे देऊ लागला. आनंदाने रोज शाळेत येऊ लागला.

अंकज्ञान, मराठी/इंग्रजी वाचन–लेखन यात प्रगती दिसून येऊ लागली. गाणी छान म्हणून लागला. सर्वांशी तो मिळूनमिसळून वागू लागला, समजूतदारपणाने शाळेत येऊ लागला. मन लावून अभ्यास करू लागला. आम्हांला घरी घडलेल्या गमतीजमती सांगू लागला. गाव, परिसरातील प्राणी–पक्षी, शाळेत घडलेल्या गमतीजमती सांगू लागला. संवादातून आपलेपणा वाढला. तो आमच्या शाळेशी, मुलांशी, शिक्षकांशी एकरूप झाला. त्याची सर्वांशी घट्ट मैत्री झाली आणि या मैत्रीतूनच त्याचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल झाले.

इंग्रजी व गणित पेटीचा वापर, मराठी वाचन–लेखन, कौटुंबिक चर्चा, सहकारी वृत्ती, कृतियुक्त अध्यापन, विविध खेळ व नावीन्यपूर्ण उपक्रम, वैयक्तिक मार्गदर्शन, आपुलकीने विचारपूस करणे, स्वाध्याय व गटकार्य करणे, क्रीडांगणावरील विविध खेळांचे आयोजन, बालसभा, विविध प्रोत्साहनपर योजनांचा लाभ, अभ्यासाचे मार्गदर्शन अशा विविध गोष्टींमुळे विद्यार्थ्यांना शाळेत टिकविणे, त्याला शाळेची गोडी लावणे सहज शक्य होते हेच खरे.

**संवादातील परिणामकारकता :**

(१) मनमोकळेपणाने संवाद साधल्याने स्वराजच्या वैयक्तिक अडचणी समजल्या.

(२) त्याच्या कलाने घेतल्याने तो विविध कृती, उपक्रम आवडीने करू लागला.

(३) विविध क्षमता प्राप्त होण्यास मदत झाली.

(४) शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली.

(५) स्वतःच्या कल्पनाशक्तीचा, जिज्ञासू वृत्तीचा वापर करून तो शिक्षण घेऊ लागला.

(६) इतर मुलांशी आनंदाने, मोकळेपणाने संवाद साधू लागला.

(७) निर्भीडपणे बोलू लागला.

(८) शाळेत वेळेवर येऊ लागला.

(९) त्याच्यात अभ्यासाची आवड निर्माण झाली.

लहान मुले घडत असतात. त्यांच्या घडण्यात शिक्षकांनी हातभार लावावा. एक शिक्षक म्हणून मुलांच्या भावविश्वाशी आपण एकरूप झालो, त्यांच्याशी सुसंवाद साधला, तर मुले नक्कीच सुसंस्कारी, सुजाण नागरिक म्हणून घडत जातात. त्यासाठी विद्यार्थ्यांबरोबर पालकांशीही सुसंवाद राखणे अत्यंत गरजेचे आहे.

**(पृष्ठ क्र. ३६ वरून)**

होते; तरीही सातत्याने प्रयत्न सुरू केला. जास्त नाही, पण केवळ श्रवण करणे आणि भाषण कौशल्य अवगत करणे, एवढीच अध्ययननिष्पत्ती ठरविली.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत माझेही शिक्षण सुरू झाले. विद्यार्थ्यांचा अभ्यास घेताना, येथील विद्यार्थ्यांमध्ये जिद्द, चिकाटी, आत्मनिर्भरता, व्यवहारज्ञान, धीटपणा व इतरही गुण प्रामुख्याने आढळले. स्वावलंबीपणा जणू काही जन्मापासूनच लाभला आहे, असे दिसले. अगदी लहानपणापासूनच जंगलात जाणे, शेतीच्या कामात आई–वडिलांना हातभार लावणे, गुरे राखणे, जंगलातून मोहफूल, सरपणासाठी लाकडे, रानमेवा गोळा करणे, अशा प्रकारे अनौपचारिक शिक्षणासोबत, शाळेतील औपचारिक शिक्षणही हे विद्यार्थी घेत होते.

शाळेत अध्ययन–अध्यापन प्रक्रिया करताना विविध शैक्षणिक साहित्य वापरले जाते. शासनाने तसे भरपूर पुरवलेही आहे; पण त्यापेक्षा अध्ययनास पूरक अशी परिसरातील भरपूर शैक्षणिक साहित्य, साधने यांची येथे रेलचेल आहे. विषयांचा विचार केला असता द्विभाषिक अभ्यासक्रमातून भाषा विषय घेणे आंतरक्रियेद्वारे सोपे जाते. लेखन, वाचनासाठी कालावधी जास्त लागतो. गणिताचे अध्यापन साहित्य भरपूर. चिंचोके, टोरी (मोहफळ), विविध प्रकारचे खडे, गोटे, जंगल परिसरातील विविध वनस्पती, प्राणी, पाण्याचे उगमस्रोत, डोंगरदऱ्या यांतील विविध घटक, माती, खडक इत्यादी. सांगू तितके कमी!

आज येथील संस्कृती, वनवैभव हे खरोखरच वाखाणण्यासारखे या भागातील प्रसिद्ध 'रेला नृत्य', गोटूल. सामाजिक बांधिलकी विलोभनीय आहे. रोजच्या धावपळीच्या जीवनात शांततेची, निवांततेची गरज असते आणि ती शांतता मिळते. येथे लोक पर्यटनासाठी वेगवेगळ्या देशांत जातात; परंतु खरी जीवन जगण्याची कला प्राप्त होते ती या आदिवासी लोकजीवनातून. प्रदूषण विरहित माझी रानातली शाळा. या शाळेतील शिक्षक असल्याचा मला खरोखरच अभिमान आहे.

येथील अगदी निरागस, स्वच्छंदी बालके, पालक, नागरिक शहराच्या बटबटीतपणापासून दूर आहेत. येथे बाबा आमटे यांनी शिक्षण व आरोग्यासाठी उभारलेले लोकबिरादरी प्रकल्प, त्रिवेणी संगम, वनराई, अभयारण्य यांतून जीवन शिक्षण मिळत आहे, मग अधिक काय हवे आहे!

# प्रत्ययान्त किंवा प्रत्ययघटित शब्दांचे लेखन


**सलिल वाघमारे**
पुणे.
भ्रमणध्वनी : ९८२०४४१५१३

**(मराठी प्रमाणलेखन नियम : लेख – ६)**

कोणत्याही भाषेमध्ये सिद्ध व साधित अशा दोन प्रकारचे शब्द असतात. सिद्ध शब्द इतर शब्दांपासून तयार झालेले नसून, ते मूलतः सिद्ध झालेले असतात. म्हणजेच इतर कोणत्याही शब्दांच्या साहाय्याशिवाय स्वतः तयार झालेले असतात. उदा., नगर, खर्च, कुल यांना 'सिद्ध शब्द' असे म्हणतात. मूळ शब्दांना विविध प्रत्यय लावून, शब्दांपूर्वी उपसर्ग जोडून विविध अर्थांचे, विविध प्रकारचे शब्द तयार होतात, त्यांना 'साधित शब्द' असे म्हणतात.

उदा., नगर – नागरिक, खर्च – खर्चीक, कुल – कुलीन.

सिद्ध व साधित शब्द सर्वच शब्दजातींमध्ये आढळून येतात. शब्द कसे तयार झाले आहेत, याची माहिती असल्यावर त्यांचे लेखन करणे सुलभ होते. तसेच शब्द असेच का लिहायचे याचेही उत्तर मिळते. प्रत्ययघटित शब्दांमधील अक्षरांचे ऱ्हस्व–दीर्घ लिखाण, 'त्' चे द्वित्त करणे न करणे, कधी 'ऊन' तर कधी 'वून' वापरणे, उपान्त्य अक्षरे ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहिणे या बाबी अचूक लिखाणासाठी महत्त्वाच्या आहेत.




### (अ) धातूला लागणारे 'ऊ' व 'ऊन' प्रत्यय :

धातूला प्रत्यय लागून काही क्रियावाचक शब्द तयार होतात. हे जरी क्रियावाचक शब्द असले, तरी ते वाक्याचा अर्थ पूर्ण करू शकत नाहीत. व्याकरणिक भाषेत यांना धातुसाधिते असे म्हणतात. यामधील 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्ययान्त धातुसाधित शब्दांचे लेखन कसे होते ते आपण पाहू.

खाऊ, जाऊ, खाऊन, जाऊन, घेऊन, पिऊन.

ठेवू, जेवू, पाठवू, ठेवून, जेवून, पाठवून.

वरील प्रत्ययान्त धातु–साधित शब्दांचे निरीक्षण केले असता असे लक्षात येईल, की काही शब्दांचा शेवट 'ऊ' किंवा 'ऊन' यांनी तर, काही शब्दांचा शेवट 'वू' किंवा 'वून' यांनी झालेला आहे. धातुसाधिताच्या शेवटी 'ऊ', 'ऊन' कधी, तर 'वू' किंवा 'वून' कधी येतो, हे आपण पाहू.

> *कोणत्याही भाषेत सिद्ध व साधित असे दोन प्रकारचे शब्द असतात. मूळ शब्दांपूर्वी उपसर्ग लावून, शब्दांपुढे प्रत्यय जोडून किंवा समास होऊन, संधी होऊन साधित शब्द तयार होतात. एका सिद्ध शब्दापासून अनेक साधित शब्द तयार होतात. सर्वच साधित शब्दांचा उल्लेख करणे येथे शक्य नाही. बऱ्याच साधित शब्दांच्या रूपात फारसा फरक होत नाही. मात्र काही साधित शब्दांमध्ये लिखाणात विशिष्ट बदल होतात, असे शब्द योग्य पद्धतीने लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या प्रत्ययघटित शब्दांचे लेखन विशिष्ट पद्धतीने करणे आवश्यक आहे, अशा काही प्रत्ययघटित शब्दांच्या लिखाणाबाबत या लेखात चर्चा करण्यात आली आहे.*

(१) एकाक्षरी धातूंना 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लागून धातुसाधित शब्द तयार होतात. उदाहरणार्थ :

खा + ऊ = खाऊ, खा + ऊन = खाऊन,

जा + ऊ = जाऊ, जा + ऊन = जाऊन

(२) पी, धू, भी अशा एकाक्षरी दीर्घान्त धातूंना 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लागताना मूळ एकाक्षरी धातूमधील 'ई' किंवा 'ऊ' ऱ्हस्व म्हणजेच 'इ' किंवा 'उ' होतात.

**उदाहरणार्थ :**

पी + ऊ = पिऊ, पी + ऊन = पिऊन,

धू +ऊ = धुऊ, धू + ऊन = धुऊन,

भी + ऊ = भिऊ, भी + ऊन = भिऊन

(३) वरील एकाक्षरी धातूंप्रमाणेच शीर, चीर, पूर, ऊठ अशा अकारान्त धातूंना 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लागताना धातूंमधील उपान्त्य दीर्घ अक्षरे ऱ्हस्व होतात.

**उदाहरणार्थ :**

ऊठ + ऊ = उठू, ऊठ + ऊन = उठून,

चीर + ऊ = चिरू, चीर + ऊन = चिरून,

पूर + ऊ = पुरू, पूर + ऊन = पुरून,

फीर + ऊ = फिरू, फीर + ऊन = फिरून,

शीर + ऊ = शिरू, शीर + ऊन = शिरून.

ज्या धातूंमध्ये मुळातच 'व' आहे, अशा धातूंना ऊ/ऊन प्रत्यय लागून त्यांची अन्त्याक्षरे 'वू' किंवा 'वून' अशी होतात. वास्तविक पाहता या धातूंनाही 'ऊ' किंवा 'ऊन' हेच प्रत्यय लागतात, मात्र ते 'व' ला जोडले जाऊन 'व' चा 'वू' किंवा 'वून' होतो. त्यामुळे अशा प्रत्ययान्त धातुसाधितांच्या शेवटी 'वू' किंवा 'वून' असे लेखन होते.

थोडक्यात धातूच्या शेवटच्या अक्षराला 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लागून धातुसाधितांचे लेखन होते. धातूचे शेवटचे अक्षर कोणतेही असू शकते. त्या शेवटच्या अक्षराला 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लागतो. उदा., करप + ऊ = करपू, करप + ऊन = करपून, कर + ऊ करू, कर + ऊन = करून इत्यादी. अशा प्रकारच्या धातुसांधितांची उदाहरणे खाली दिली आहेत.

**उदाहरणार्थ :**

ठेव + ऊ = ठेवू, ठेव + ऊन = ठेवून,

जेव + ऊ = जेवू, जेव + ऊन = जेवून,

ऐक + ऊ = ऐकू, ऐक + ऊन = ऐकून,

अजमाव + ऊ = अजमावू,

अजमाव + ऊन = अजमावून,

कुजव+ऊ=कुजवू, कुजव+ऊन=कुजवून,

ऐकव + ऊ = ऐकवू, ऐकव + ऊन = ऐकवून,

उमल + ऊ = उमलू, उमल + ऊन = उमलून,

दडप + ऊ = दडपू, दडप + ऊन = दडपून,

### (आ) 'इक' प्रत्यय लागून तयार होणारी विशेषणे :

दिन + इक = दैनिक, लोक + इक = लौकिक,
वेद + इक = वैदिक, नगर + इक = नागरिक.

वरील दिन, लोक, वेद, नगर या नामांना 'इक' हा प्रत्यय लागून त्यांपासून दैनिक, लौकिक, वैदिक, नागरिक अशी विशेषणे तयार झाली आहेत. नामाला 'इक' लागताना विशेषणामध्ये पुढीलप्रमाणे दोन बदल होतात.

(१) नामातील पहिल्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होते. स्वराची वृद्धी म्हणजे काय ते समजून घेऊ. (नगर–नागरिक येथे नगर मधील 'न' चा 'ना' झाले आहे म्हणजेच 'न' मधील 'अ' या स्वराची वृद्धी 'आ' मध्ये होऊन ना असे झाले आहे.)

| मूळ स्वर | | वृद्धी |
|---|---|---|
| १) अ, आ | – | आ (नगर : नागरिक) |

२) इ, ई, ए – ऐ (इच्छा : ऐच्छिक, नीती: नैतिक, वेद : वैदिक)

३) उ, ऊ, ओ – औ (उद्योग : औद्योगिक, भूगोल : भौगोलिक, लोक : लौकिक)

(२) मूळ शब्दातील शेवटचा स्वर लोप पावतो. याचाच अर्थ शेवटच्या अक्षरातील मूळ स्वर निघून गेल्यामुळे ते व्यंजनान्त होते आणि त्या शेवटच्या व्यंजनाला 'इक' प्रत्यय लागतो. यालाच पररूप संधी असे म्हणतात. उदा., नगर + इक = नागर् + 'ईक' = नागरिक.

**उदाहरणार्थ :** 'नगर' मधील शेवटच्या अक्षरातील ('र') मधील मूळ स्वर निघून जातो, म्हणजेच 'र' अर्धा ('र्') होतो, आणि या 'र्' पुढे 'इक' प्रत्यय लागून नागरिक असा शब्द तयार होतो.

'इक' हा प्रत्यय नामांना जोडून खालीलप्रमाणे : विविध अर्थाचे शब्द तयार होतात.

(क) विशिष्ट कालावधीसाठी : दैनिक, साप्ताहिक, मासिक, वार्षिक.

(ख) ठिकाण दर्शवण्यासाठी : स्थानिक, नागरिक, शारीरिक.

(ग) एखाद्या कलेत निपुणता : नाविक, लेखनिक.

(घ) त्या संबंधीचा : औद्योगिक, ऐतिहासिक, भौगोलिक.

(३) 'इक' प्रत्यय लागून स्वामित्वदर्शक किंवा युक्तार्थी शब्द तयार होताना मूळ शब्दातील पहिल्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होत नाही. तथापि शेवटच्या अक्षरातील स्वराचा लोप होतो. उदा., रस : रसिक, क्षण : क्षणिक, धन : धनिक, श्रम : श्रमिक, क्रम : क्रमिक, सुवास : सुवासिक.

(४) परंपरा + इक = पारंपरिक हे रूप योग्य आहे. 'परंपरा' या नामातील पहिल्या 'प' चे 'पा' होऊन आणि शेवटच्या अक्षरातील 'आ' हा स्वर लोप पावून 'पारंपरा + इक' = 'पारंपरिक' हे रूप होते; परंतु बऱ्याच वेळा 'पारंपारिक' असे चुकीचे रूप वापरण्यात येते. येथे वरील पहिल्या अक्षराच्या वृद्धीबाबतच्या नियमाचा चुकीचा अर्थ काढल्यामुळे ही चूक होते.

'परंपरा' या शब्दातील पहिले अक्षर 'प' आहे. त्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होऊन 'पा' असे होणे आवश्यक आहे. मात्र या शब्दात दोन वेळा प असल्यामुळे पहिल्या व तिसऱ्या अशा दोन्ही 'प' च्या स्वरांची वृद्धी करून 'पारंपारिक' असे चुकीचे रूप केले जाते. 'पारंपरिक' हेच रूप योग्य होय.

## (इ) 'अक' आणि 'ईक' प्रत्ययान्त शब्द :

### (१) 'अक' प्रत्ययान्त शब्द

कल्पक, वाचक, भाषक, बाधक, सेवक, याचक, लेखक, प्रसारक, शासक, साधक.

मूळ धातूला 'अक' हा प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे विशेषणे तयार होतात. या विशेषणांचा अर्थ त्या मूळ धातूने दर्शवलेली क्रिया करणारा असा होतो.

कल्पक : कल्पना करणारा, वाचक : वाचन करणारा, भाषक : भाषा बोलणारा, बाधक : बाधा करणारे, सेवक : सेवा करणारा, याचक : याचना/विनवणी करणारा, लेखक : लेखन करणारा, प्रसारक : प्रसार करणारा, शासक : शासन करणारा, साधक : साधना करणारा, प्रेषक : पाठवणारा, प्रचारक : प्रचार करणारा

**'अक' आणि 'इक' प्रत्ययान्त विशेषणांच्या अर्थातील फरक**

'भाष्' या मूळ संस्कृत धातूचा अर्थ बोलणे

असा आहे, या धातूस 'अक' प्रत्यय लागून भाष् + अक = 'भाषक' असे विशेषण तयार होते. 'भाषक' या विशेषणाचा अर्थ बोलणारा असा आहे. भाष् + इक = भाषिक असेही विशेषण होते. 'भाषिक' याचा अर्थ भाषेविषयी असा आहे. 'इक' आणि 'अक' प्रत्यय जोडून तयार होणाऱ्या विशेषणांच्या अर्थामध्ये खूप फरक आहे.

**भाषक :** बोलणारा, मराठी भाषक : मराठी भाषा बोलणारा/बोलणारे.

उदा., महाराष्ट्रामध्ये मराठी 'भाषक' लोक राहतात.

**भाषिक :** भाषेविषयी, मराठी भाषिक : मराठी भाषेविषयी.

उदा., श्रवण हेसुद्धा एक 'भाषिक' कौशल्य आहे. त्यामुळे 'इक' आणि 'अक' प्रत्ययान्त विशेषणांचे लिखाण वाक्यातील अर्थ लक्षात घेऊन योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे.

**(२) 'ईक' प्रत्ययान्त शब्द**

आगळीक, खर्चीक, ठरावीक, मोकळीक, पडीक, जवळीक, सोशीक, लाडीक.

'ईक' हा प्रत्यय अकारान्त धातूंना लागून विशेषणे तयार होतात.

वरील सर्व शब्द मराठी शब्दांना 'ईक' हा प्रत्यय लागून तयार झालेली विशेषणे, भाववाचक नामे किंवा धातुसाधित विशेषणे आहेत. हे शब्द संस्कृत नसून मराठी आहेत, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

आगळीक : मर्यादेच्या बाहेर जाणे/अपराध.

खर्चीक : सढळ हाताने खर्च करणारा.

ठरावीक : ठरवून दिलेले.

पडीक : विनावापर असलेली जमीन/जागा.

जवळीक : निकटपणा, जवळ असणारे.

सोशीक : सहनशील.

लाडीक : लडिवाळपणा, एखादे काम करून घेण्यासाठी गोड बोलणे.

**टीप :** 'ईक' प्रत्यय लागून फार कमी मराठी शब्द तयार होतात. त्यामध्ये 'ठरावीक' हा शब्द येतो. 'इक' हा संस्कृत प्रत्यय लागून अनेक शब्द तयार होतात. उदा., आर्थिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी. त्यामुळे 'ठरावीक' शब्दही 'इक' प्रत्यय लागून तयार झाला आहे, असे वाटल्यामुळे तो 'ठराविक' असा चुकीचा लिहिला जातो. वास्तविक तो 'ठराव' + ईक = ठरावीक असा होतो. 'ठराव' मधील 'व' आणि 'ईक' मधील 'ई' यांचा पररूप संधी होऊन 'वी' होऊन 'ठरावीक' असा शब्द तयार झालेला आहे, तो असाच लिहावा.

## (ई) ईय, इत, ईत, ईन प्रत्ययान्त शब्द :

**(१) 'ईय' प्रत्यय**

भारतीय, कुटुंबीय, स्वीय, परकीय, राष्ट्रीय, शास्त्रीय, वर्गीय, स्वर्गीय, स्वकीय, शासकीय, राजकीय.

संस्कृत तत्सम नामांना 'ईय' हा प्रत्यय लागून काही विशेषणे तयार होतात. साधारणतः तेथील, त्या ठिकाणचा किंवा त्याच्याशी संबंधित अशा अर्थाची ती विशेषणे असतात.

भारतीय : भारतात राहणारे, भारतातील.

कुटुंबीय : कुटुंबातील सदस्य.

स्वीय : स्वतःचा.

परकीय : परक्या देशातील, आपला नसलेला.

राष्ट्रीय : राष्ट्राशी संबंधित.

शास्त्रीय : शास्त्रासंबंधी, शास्त्रानुसार.

धातूला 'अनीय' हा संस्कृत प्रत्यय जोडून योग्यतादर्शक विशेषणे तयार होतात.

उदाहरणार्थ, पूज : पूजनीय, वर्ण : वर्णनीय, शोच : शोचनीय, स्पृह : स्पृहणीय, मन : मननीय, रम : रमणीय, वंद : वंदनीय.

**(२) 'इत' प्रत्यय**

अखंडित, अपेक्षित, अनपेक्षित, अगणित, आनंदित, इच्छित, उत्कंठित, उपेक्षित, कल्पित, गणित, गुपित, घटित, चकित, जीवित, त्वरित, दलित, दुःखित, निर्मित, पीडित, प्रकाशित, भूषित, मुद्रित, मूर्च्छित, मर्यादित, रचित, विवाहित, शिक्षित, संपादित, सुधारित, सहित

अखंड + इत = अखंडित, अपेक्षा + इत = अपेक्षित, अनपेक्षा + इत = अनपेक्षित, अगण + इत = अगणित, आनंद + इत = आनंदित, इच्छा + इत = इच्छित, उपेक्षा + इत = उपेक्षित, कल्पना + इत = कल्पित, गणन + इत = गणित.

वरीलप्रमाणे 'इत' हा संस्कृत प्रत्यय जोडून विशेषणे तयार होतात. हे शब्द युक्तार्थ दर्शवतात. 'इत' प्रत्यय लागून तयार झालेल्या शब्दातील पहिल्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होत नाही, ही बाब लक्षात घ्यावी. मात्र मूळ शब्दातील शेवटच्या अक्षरातील स्वर लोप पावतो आणि त्याला 'इत' प्रत्यय लागून त्या शब्दाचे उपान्त्य अक्षर ऱ्हस्व इकारान्त होते.

**टीप :** निर्णीत, संगृहीत, विपरीत, प्रणीत, गृहीत हे शब्द –इत प्रत्यय लागून तयार झालेली शब्दसाधिते नसून ती संस्कृत भूतकालवाचक धातुसाधिते आहेत. यामधील उपान्त्य अक्षरे मुळातच दीर्घ आहेत; त्यामुळे या शब्दांतील उपान्त्य अक्षरे दीर्घच लिहावीत.

**(३) 'ईत' प्रत्यय**

करकरीत, कुरकुरीत, गुळगुळीत, चकचकीत, सुटसुटीत.

'ईत' हा प्रत्यय मराठी शब्दांना लागतो. हा प्रत्यय लागून विशेषणे तयार होतात. हा प्रत्यय लागताना 'पररूप' संधी होतो. 'ईत' या प्रत्ययामधील 'ई' हे अक्षर दीर्घ असल्यामुळे हा प्रत्यय जोडून तयार होणारे विशेषणातील उपान्त्य अक्षर दीर्घ होते. मात्र 'संग्रह' + इत = संग्रहित असे विशेषण तयार होते, त्यामधील उपान्त्य अक्षर ऱ्हस्व इकारान्त आहे, ही बाब लक्षात घ्यावी.

**(४) 'ईन' प्रत्यय**

कुल + ईन = कुलीन, नव + ईन = नवीन, शाला + ईन = शालीन, काल + ईन = कालीन.

काही संस्कृत नामांना 'ईन' हा प्रत्यय लागून विशेषणे तयार होतात. यामधील 'ईन' या प्रत्ययातील 'ई' हा दीर्घ असल्यामुळे हा प्रत्यय जोडून तयार होणाऱ्या विशेषणातील उपान्त्य अक्षर दीर्घ होते.

**(५) 'य', 'त्य', आणि 'त्व' प्रत्यय लागून तयार होणारी भाववाचक नामे.**

**(६) 'य' प्रत्यय**

पवित्र + य = पावित्र्य, विशिष्ट + य = वैशिष्ट्य

अतिथी + य = आतिथ्य, उचित + औचित्य
निपुण + य = नैपुण्य, कुशल + य = कौशल्य
गंभीर + य = गांभीर्य

वरील शब्दांना 'य' हा प्रत्यय लागताना मूळ शब्दांमध्ये दोन महत्त्वपूर्ण बदल होतात.

(१) प्रत्यय लागताना शेवटच्या अक्षरातील स्वर लोप पावला आहे, म्हणजेच निघून गेला आहे. स्वर लोप पावल्यामुळे ते अक्षर अर्धे होते व या अर्ध्या अक्षरापुढे 'य' प्रत्यय जोडल्यामुळे ते शेवटचे अक्षर 'य' ला जोडले जाते. (उदा., पवित्र : पावित्र्य, त्र् + य = त्र्य, विशिष्ट : वैशिष्ट्य, ष्ट् + य = ष्ट्य, गंभीर : गांभीर्य, र् + य = र्य)

(२) तसेच मूळ शब्दांतील पहिल्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होते. (उदा., पवित्र : पावित्र्य 'प' या पहिल्या अक्षरातील 'अ' या स्वराची वृद्धी 'आ' अशी होऊन ते 'प' ऐवजी 'पा' असे झाले आहे.

**मूळ स्वर** **वृद्धी**

१) अ – आ (पवित्र : पावित्र्य)

२) इ – ऐ (विशिष्ट : वैशिष्ट्य)

३) उ – औ (कुशल : कौशल्य)

**(१) 'त्य' प्रत्यय**

दक्षिणा + त्य = दाक्षिणात्य, पूर्वा + त्य = पौर्वात्य, पश्चात् + त्य = पाश्चात्त्य.

'त्य' हा संस्कृत प्रत्यय तत्सम धातूंखेरीज इतर शब्दांना लागून विशेषणे तयार होतात. 'त्य' हा प्रत्यय लागतानासुद्धा मूळ शब्दातील पहिल्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होते आणि या शब्दांना 'त्य' हा प्रत्यय लागतो. (उदाहरणार्थ, दक्षिणा + त्य = दाक्षिणात्य)

वरील विशेषणांमध्ये अन्त्याक्षरात काही ठिकाणी 'त्य' आहे तर काही ठिकाणी 'त्त्य' असल्याचे दिसून येते. याबाबत खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

(१) पूर्वा या शब्दाच्या शेवटी 'र्वा' हे अक्षर आहे. त्यापुढे 'त्य' हा प्रत्यय जोडला आहे. त्यामुळे या शब्दातील पहिल्या अक्षरातील स्वराची वृद्धी होऊन 'त्य' हा प्रत्यय जोडला आहे. त्यामुळे 'त्य' असा शेवट झालेला आहे. (पूर्वा + त्य = पौर्वात्य)

(२) 'पश्चात्' या शब्दाच्या शेवटी मुळातच 'त्' हे व्यंजन आहे. त्यामुळे या शब्दाला 'त्य' हा प्रत्यय लागताना पूर्वीचा 'त्' आणि त्यानंतर लागलेला 'त्य' प्रत्यय मिळून 'त्त्य' असे 'त' चे द्वित्त झाले आहे. 'पाश्चात्त्य' या विशेषणातील अन्त्याक्षर 'त्य' नसून 'त्त्य' असे आहे.

**(२) त्व प्रत्यय**

गुरु + त्व = गुरुत्व

लघु + त्व = लघुत्व

प्राचीन + त्व = प्राचीनत्व

मृदू + त्व = मृदुत्व

नृप + त्व = नृपत्व

महत् + त्व = महत्त्व

सत् + त्व = सत्त्व.

काही संस्कृत नामांना 'त्व' हा प्रत्यय लागून भाववाचक नामे तयार होतात, याबाबत खालील बाबी लक्षात ठेवाव्यात.

(१) 'त्व' हा प्रत्यय लागताना शब्दातील पहिल्या अक्षराच्या स्वरात कोणताही बदल होत नाही. म्हणजे स्वराची वृद्धी होत नाही. (लघु + त्व = लघुत्व)

(२) ज्या शब्दांच्या शेवटी 'त्' नाही त्या शब्दांना 'त्व' प्रत्यय जोडताना अन्त्याक्षर 'त्व' असे नृपत्व) राहते. (नृप + त्व = नृपत्व)

(३) ज्या शब्दातील अन्त्याक्षर 'त्' असेल अशा शब्दांना 'त्व' हा प्रत्यय जोडताना 'त' चे द्वित्त होते. (महत् + त्व = महत्त्व)

(४) ज्या मूळ संस्कृत ऱ्हस्वान्त शब्दांना 'त्व' हा प्रत्यय लागला आहे, त्या मूळ ऱ्हस्वान्त शब्दातील अन्त्याक्षरे 'त्व' प्रत्यय लागल्यानंतरही मुळाप्रमाणे ऱ्हस्वच राहिली आहेत. (गुरु + त्व = गुरुत्व, लघु + त्व = लघुत्व)

# संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्पाचे अनुभवामृत

**भारती देशमुख**
जि. प. प्राथ. शाळा खर्डे पाटोळे,
ता. राहता, जि. अहमदनगर

*प्राथमिक स्तरावर इंग्रजी विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नसल्याने, इंग्रजी हा विषय शिक्षकांना व विद्यार्थ्यांनाही अवघड वाटतो. इंग्रजीत संभाषण करणे सहजासहजी शक्य होत नाही. ही इंग्रजीची भीती दूर करण्यासाठी व मुलांना प्रोत्साहन देऊन इंग्रजी अध्ययनाची आणि अध्यापनाचीही गोडी वाढविण्याचा उपक्रम राहता तालुक्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रेरणेमुळे यशस्वी ठरला. त्याविषयीचे अनुभव कथन.*

शाळेचे नियमित कामकाज चालू असताना एके दिवशी विस्ताराधिकारी संजीवन दिवे साहेब हे शाळा भेटीसाठी आले. मुख्याध्यापकांनी त्यांचे स्वागत केले. नेहमीप्रमाणे अधिकारी तपासणीसाठी शालेय दप्तराची मागणी करतात व विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहतात. त्याचप्रमाणे ही भेट असेल असे आम्हा शिक्षकांच्या मनात होते; परंतु त्या दिवशीची शाळा भेट ही दिवे साहेबांच्या रूपाने गुणवत्तेचा मंगल कलश घेऊन आली होती. त्यांनी नियमित पाहणी करून आम्हां शिक्षकांना विचारले, की तुमच्या शाळेत जे जे चांगले आहे, ते मला सांगा. शक्य असल्यास त्याचे सादरीकरण करा. मी माझा गणिताचा नवोपक्रम साहेबांपुढे सादर केला. मुख्याध्यापकांनी शाळेतील विद्यार्थी मराठी विषयाचे अचूकपणे शुद्धलेखन कसे करतात याचे सादरीकरण केले.



त्यानंतर साहेबांनी इंग्रजीबद्दल वेगळे काही करता का? असा प्रश्न विचारला. टॅग इंग्रजी प्रशिक्षणात होणाऱ्या ॲक्टिव्हिटीज आम्ही राबवतो, असे आम्ही साहेबांना सांगितले. त्यानंतर मला विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन पाहायचे आहे, असे साहेबांनी आम्हांला सांगितले. काही मुलांनी अतिशय छान वाचन केले, तर काहींनी अडखळत वाचन केले. काही विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव होता; याचे कारणही तसेच होते; मागील एक-दीड वर्षांत कोरोना काळात इंग्रजी वाचनही मागे पडले होते. विद्यार्थ्याला जवळ घेऊन प्रत्येक शब्दावर बोट ठेवून चुकांची दुरुस्ती करून घेत वाचन करून घेण्यास ऑनलाईन पद्धतीत मर्यादा येत होत्या. त्यामुळे वाचनाच्या सरावास मर्यादा आल्या होत्या. त्याचे प्रतिबिंब आजच्या वाचनात दिसत होते. आमच्या मनाची अस्वस्थता साहेबांनी ओळखली. ते म्हणाले, सर्वप्रथम मनातील अपराधी भावना काढून टाका. थोडे सकारात्मक होऊन या समस्येकडे आपण पाहूया! आपल्याला ज्योतीने ज्योत लावत दीपमाळ प्रज्वलित करायची आहे.

You are lamp, students are also lamp, but Matchbox is in your hand !

इंग्रजी वाचण्यासाठी प्रबलन हे कौशल्य वापरून तुम्ही अपेक्षित ध्येयापर्यंत पोहोचू शकता, असे साहेबांनी आम्हांला सांगितले. साहेबांनी इयत्ता तिसरीच्या मुलांना टेबलाभोवती अर्धवर्तुळाकार उभे केले. त्या प्रत्येकाला

इंग्रजीचे पुस्तक हातात घ्यायला लावले. कॉन्व्हर्सेशन हा घटक घेऊन प्रथम मोठ्या आवाजात त्यांनी वाचन केले. मुले व आम्ही शिक्षक लक्षपूर्वक ऐकत होतो. अधिकारी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतात, याच्याशी आम्ही सुपरिचित होतो; परंतु अधिकारी अध्यापन करतात हे पाहून आम्हांला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. त्यांनी प्रथम विद्यार्थ्यांना स्वतः वाचून दाखवले. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या पाठीमागे वाचायला लावले. त्यातील चांगल्या प्रकारे वाचन करणाऱ्या विद्यार्थिनीस पुन्हा वाचायला लावले. यावरून साहेबांनी आम्हांस एक अफलातून कल्पना दिली. या विद्यार्थिनीचा वाचनाचा व्हिडिओ बनवा व तुमच्या स्टेटसला व्हॉट्सॲपवर ठेवा. त्यानंतर आम्ही त्यांच्या सूचनेप्रमाणे कृती केली. समुद्राला भरती यावी, त्याप्रमाणे स्टेटसवर प्रतिक्रियांचा पाऊस सुरू झाला. अनेक पालकांकडे आमचा मोबाईल नंबर होता. त्यांनी ते स्टेटस पाहून समाधानकारक प्रोत्साहनपर प्रतिक्रिया दिल्या. त्या प्रतिक्रिया पाहून आम्ही सुखावलो. संबंधित विद्यार्थिनीच्या पालकांनी दुसऱ्या दिवशी शाळेत येऊन शिक्षकांचे तोंड भरून कौतुक केले. मुले स्वतःहून विचारू लागली, की माझा व्हिडिओ स्टेटसला कधी ठेवणार? वाचनाबद्दल मुलांच्यात स्पर्धा सुरू झाली. अडखळत वाचणारी मुले एकाच उताऱ्याचे अनेक वेळा वाचन करून आम्हीही स्पष्टपणे वाचू शकतो हे दाखविण्यासाठी धडपडू लागली. जरी सुरुवातीला परिचित उताऱ्याचे वारंवार वाचन करत असले, तरी त्यांचा सराव व आत्मविश्वास प्रचंड वाढला होता. त्यांच्यात सुरू झालेली चढाओढ आमच्या मनाला आनंद देणारी होती. महत्त्वाचे म्हणजे आमच्या प्रयत्नाचे फलित पालकांपर्यंत, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचू लागले होते. समाजात शाळेबद्दल आपुलकी वाढत असलेली दिसून येऊ लागली. विद्यार्थी स्वतःहून म्हणू लागले, की आज आमचे वाचन घ्या, आमचा व्हिडिओ बनवा. कौतुक कोणाला आवडत नाही? आपला व्हिडिओ शिक्षकांच्या स्टेटसला पाहून या चिमुकल्यांना आकाश ठेंगणे वाटू लागले. पालकही मोठ्या कौतुकाने मुलांचे इंग्रजी वाचनाचे व्हिडिओ त्यांच्या स्टेटसवर ठेवू लागले. साहेबांनी सांगितलेल्या 'ज्योत से ज्योत जलाते चलो, ज्ञान की गंगा बहाते चलो' या मंत्राची प्रचीती आम्हांस येऊ लागली.

ज्यांच्या ज्यांच्याकडे आमचा मोबाईल नंबर आहे, अशा सर्व सहकारी शिक्षकांकडे स्टेटसद्‌वारे असे व्हिडिओ पोहोचू लागले. तालुक्याबाहेरील अनेक सहकारी शिक्षकांचे प्रतिसाद स्टेटसवर मिळू लागले. अगदी जिल्ह्याबाहेरील आमच्या ओळखीतील व्यक्ती, अधिकारी, पदाधिकारी यांनी या स्टेटसवर प्रतिक्रिया दिल्या. यामध्ये सिंधुदुर्गचे अतिरिक्त जिल्हाधिकारी, नाशिकचे अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक, शहादा धुळे येथे कार्यरत असणारे तहसीलदार तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. स्टेटसवर 'अतिशय छान', 'कीप इट अप', 'मराठी शाळांचे उज्ज्वल भवितव्य'... अशा अनेक प्रतिक्रिया आल्या. शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक मीटिंगमध्येही या उपक्रमाची चर्चा होऊन विस्ताराधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. संजीवन साहेबांचा प्रकल्प असे म्हणत म्हणत या उपक्रमाचे 'संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प' असे बारसे कधी झाले ते कोणाच्या लक्षातही आले नाही. परीसस्पर्शाने जसे लोखंडाचे सोने होते, तसा हा परीसरूपी प्रकल्प शिक्षकांना सापडून विद्यार्थ्यांच्या अज्ञानरूपी लोखंडाचे सोने होऊ लागले. सर्व शिक्षकांना याद्‌वारे मी आवाहन करू इच्छिते, की एकदा हा प्रयोग अवश्य करून पाहा! पहिले इस्तमाल करो, फिर विश्वास करो!'

# छोटे प्रयोगकर्ते

**लता गवळी**
जि. प. प्रा. व उच्च प्राथ. शाळा वडाळा
बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ९९२११५०४२३

*विज्ञान विषयात प्रत्यक्ष कृती आणि प्रयोगांना महत्त्व असते. मुलांना योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिल्यास विज्ञान अभ्यासाला साहाय्यभूत होतील अशा अनेक प्रतिकृती (मॉडेल्स) विद्यार्थी तयार करतात. मुलांमधील जिज्ञासा आणि त्यातून निर्माण झालेले साहित्य सर्वांनाच उपयुक्त ठरणारे असते. वडाळा येथील शाळेने यशस्वी केलेल्या अशा उपक्रमाची माहिती देणारा लेख.*

सध्याचे युग हे विज्ञानाचे युग आहे. दैनंदिन जीवनात विज्ञानाला महत्त्वाचे स्थान आहे. विज्ञान म्हणजे मानवाच्या असामान्य कर्तृत्वाची महान निर्मिती आहे. जगातील सर्व राष्ट्रांची प्रगती झाली, ती त्यांनी विज्ञानाची कास धरल्यामुळे. राष्ट्राची प्रगती ही विज्ञानाच्या प्रगतीवर अवलंबून असते आणि राष्ट्राची खरी संपत्ती ही मुले असतात आणि म्हणूनच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याची आज गरज आहे. शालेय अभ्यासक्रमामध्ये इतर विषयांबरोबर विज्ञान हा एक विषय असतो. इयत्ता पहिली–दुसरीमध्ये विज्ञान विषय भाषा व गणित या विषयांबरोबर नकळत शिकवला जातो; तर तिसरी ते पाचवीमध्ये विज्ञान विषय परिसर अभ्यासाच्या रूपात अभ्यासला जातो. इयत्ता सहावी–सातवीमध्ये विज्ञान विषय 'सामान्य विज्ञान' म्हणून अभ्यासला जातो.



विज्ञान विषय एक असा विषय आहे; जो आव्हानात्मक असून जिवंत आणि सर्जनात्मक आनंद देणारा आहे. प्राथमिक स्तरावर सभोवतालचे जीवन व विज्ञान यांची सांगड घालावी लागते. त्यासाठी गप्पांच्या, चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आनंददायी रूपात नेता येते. हे करताना त्यात निरीक्षण, आकलन, कृती, माहिती संकलन, अनुमान, निष्कर्ष व सोपे प्रयोग इत्यादींचा समावेश होतो. दैनंदिन जीवनातील अनेक घटना या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विज्ञानाशी संबंधित असतात. जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाचे जन्मतःच हवा, पाणी आणि अन्नाच्या रूपाने विज्ञानाशी अतूट नाते जोडलेले असते.

विज्ञान शिकताना अनेक नवीन गोष्टींची माहिती होते, तथ्ये समजतात. ज्या ज्या गोष्टींबद्दल कुतूहल वाटते. त्या त्या सर्वांचा तर्कनिष्ठ व विवेकबुद्धीने विचार करत आत्मविश्वासाने व आनंदाने जीवन जगता यावे, हे खरे विज्ञान शिकण्याचे उद्दिष्ट होय.



उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थी जेव्हा स्वतः कृती करेल, प्रयोग करेल, तेव्हा तो खऱ्या अर्थाने छोटा प्रयोगकर्ता होईल आणि असे छोटे प्रयोगकर्ते तयार करण्याचे काम आम्ही आमच्या शाळेत

केले. तंत्रज्ञान, विज्ञान केंद्र यांच्या साहाय्याने प्रथम त्यांना विविध प्रयोग दाखवले. प्रयोग दाखवताना प्रयोगाला लागणारे साहित्य, केलेली कृती आणि त्याचे प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात होणारे उपयोग विद्यार्थ्यांना स्पष्ट केले. विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगाची आवड निर्माण व्हावी हे ध्यानात ठेवले. दैनंदिन जीवनातील सोपे प्रयोग करण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित केले. प्रयोगासाठी लागणाऱ्या मॉडेल्सबद्दल माहिती दिली व प्रत्येक विद्यार्थ्याला गुगल, यू–ट्यूबच्या साहाय्याने विज्ञानाचे प्रयोग पाहण्यास सांगितले, तसेच स्वतः घरी मोठे बहीण–भाऊ किंवा पालक यांच्या सहकार्याने ते प्रयोग करण्यास सांगितले. सर्व विद्यार्थ्यांना प्रयोग करण्यासाठी पंधरा दिवसांचा कालावधी दिला. प्रत्येकाला घरी मॉडेल तयार करण्यास सांगितले. मॉडेल तयार झाल्यावर प्रत्येकाने आपल्या घरून व्हिडिओ तयार करून आणून प्रयोग सादर करायचा असे सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पनाशक्तीने वेगवेगळे प्रयोग केले व त्याचे सादरीकरण व्हिडिओद्वारे केले. विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती अफाट असते. प्रत्येकाने आपल्या परीने टाकाऊपासून टिकाऊ, सोपे प्रयोग, कोणी अवघड प्रयोग, कोणी सुबक प्रयोग इत्यादींची मॉडेल्स घरी तयार केली. मॉडेल तयार झाल्यावर त्याचे प्रात्यक्षिक, सादरीकरण घरूनच केले. त्यासाठी व्हिडिओ तयार करून वर्गाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर पाठविले.



नैसर्गिक घटनांमागे काही मोजके, पण व्यापक नियम आहेत हे मानून वैज्ञानिक पुढे पाऊल टाकतो. तसेच आमच्या छोट्या प्रयोगकर्त्यांनी विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग करून पाहिले. जसे : मुसळधार पावसात प्रथम वीज दिसते, नंतर ढगांचा गडगडाट होतो. सूर्य व सूर्यमाला यांतील गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव, समुद्राची भरती–ओहोटी याचा वीज निर्मितीसाठी उपयोग, पवनचक्कीच्या साहाय्याने वीजनिर्मिती, पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन व उपयोजन, चुंबकाचे प्रयोग व उपयोग, आपत्ती व आपत्ती व्यवस्थापन प्रयोग, मानवी इंद्रिय संस्था, अन्नभेसळ, मानवी आहार व आहाराबद्दल जागरूकता, मातीचे प्रकार, हवा व हवेतील घटक, घरातील विविध यंत्रे व त्यांची निगा, शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन, सौर ऊर्जेचा विविध ठिकाणी उपयोग, हवेचा दाब, पाणी शुद्ध करण्याची सोपी पद्धत, छोटे ग्रास कटर, सोडा, लिंबू, हळद, कोलगेट यांचे रासायनिक बदल, वाफेवर चालणारे इंजीन, विविध उपकरणे जोडून चालणारी छोटी गाडी, पुठ्ठ्यापासून बनवलेले बोअरिंगचे मशीन, दोरीवर चालणारा फुगा इत्यादी नवनवीन प्रयोग विद्यार्थ्यांनी सादर केले. ते सादर करताना त्यांची मेहनत, चिकाटी विविध साहित्य मिळविण्यासाठी केलेली धडपड, काही प्रयोगांसाठी केलेली ऑनलाईन साहित्याची मागणी, त्याचबरोबर त्यात त्यांना मिळालेली पालकांची–भावंडांची किंवा मित्रांची मोलाची साथ हे सगळेच विशेष होते.



प्रयोग ही अशी अविरत चालणारी प्रक्रिया आहे. प्रयोगातून दिसणाऱ्या परिणामांची कारणमीमांसा करून नवीन भाकिते, सिद्धांत मांडायचे असतात. विद्यार्थ्यांचा

वयोगट पाहता ही गोष्ट त्यांच्या आवाक्यातली नाही; परंतु आपण काहीतरी जे आपल्याला येत नव्हते ते तयार करून त्याबद्दल स्वतः मत मांडण्याचा प्रयत्न करत आहोत हे कळत होते व स्वयं-अध्ययनासाठी प्रेरणा मिळत होती. झालेले प्रयोग स्वतः करणे, थोड्या वेगळ्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करणे, आपण पाहिलेले प्रयोग व आपण सादर केलेले प्रयोग यांतील साम्यभेद व निष्कर्ष पडताळून पाहण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये निर्माण झाले, हेही नसे थोडके!

ज्या विद्यार्थ्यांची प्रयोग मांडणी चुकत होती त्यांना त्याची जाणीव होत होती. नंतर त्यावर ते प्रश्न विचारत होते. असे का झाले? असे का झाले नाही? इत्यादी. चुकांमधून ते शिकले. हेच विज्ञान आहे व पुढील वेळेस चूक टाळण्यासाठी काय करावे लागेल हे त्यांना समजावून सांगितले. भाकरीचा तुकडा बंद डब्यात ठेवून त्यावर निर्माण होणारी बुरशी दोन-तीन दिवसांनी पाहणे, सूक्ष्मजीव आणि गाईच्या शेणाचे केलेले विघटन आठवडाभर निरीक्षण करून नोंद करायला लावण्याचा प्रयोग यशस्वी ठरला व सृष्टीतील सूक्ष्मजीव विघटनासाठी किती महत्त्वाचे आहेत हे विद्यार्थ्यांना कळले. या सर्व प्रयोगांतून, छोट्या छोट्या गोष्टींतून विद्यार्थी खूप काही शिकत होते. विज्ञान विषय अवघड न वाटता आपण स्वतः करून पाहू शकतो, शोध लावू शकतो, नवीन मांडणी करू शकतो हे त्यांना समजत होते आणि आवडतही होते.

असे म्हणतात, जे आपल्याला शिकवलेले असते, जे आपण समजून घेतो, जाणून घेतो, त्याच्यावरच आपण प्रेम करतो आणि ज्याच्यावर आपले प्रेम असते, ते अधिक चांगल्या पद्धतीने आपल्याला मांडता येते.

ᲕᲕᲕ

**(पृष्ठ क्र. २४ वरून)**

२२९ तालुके समाविष्ट करण्यात आले. मुंबई पुनर्रचना कायदा अमलात येण्याची चिन्हे महाराष्ट्रीयन जनतेला दिसू लागली.

२७ एप्रिल ते १ मे, १९६० पर्यंत विविध कार्यक्रम महाराष्ट्रात चालले. शिवनेरीवर शिवजयंतीचा उत्सव २७ एप्रिलला झाला. तेथील छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केले. सचिवालयातील महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण रांगोळीबद्ध करण्यात आले होते. पुरंदरे स्टेडियमवर डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे भाषण झाले. पंडित नेहरू यांच्या दोन प्रचंड सभा झाल्या. जनतेने त्यांचे स्वागत केले. मुंबईच्या राजभवनच्या दरबार हॉलमध्ये पंतप्रधानांनी विजेचे बटण दाबताच महाराष्ट्राचा नकाशा झळकू लागला. सर्वत्र दिवाळी साजरी होत होती. १ मे, १९६० रोजी दुपारी नव महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला आणि एका भव्य स्वप्नाची पूर्तता झाली.

लोकसभेत वरील विधेयक २८ मार्च, १९६० रोजी मांडले गेले. महाराष्ट्र नावाला संमती मिळून विधेयक चिकित्सा समितीकडे गेले. चर्चा, सूचना हे सोपस्कार संपल्यावर २१ व २३ एप्रिल १९६० रोजी लोकसभा व राज्यसभेत विधेयक मंजूर झाल्याबराबेर १ मे, १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली. मुंबईला राजधानीचा मान मिळाला.

राज्यात पूर्व मुंबई राज्याचे १३ जिल्हे, मराठवाडा, विदर्भ हा भाग समाविष्ट झाला. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद हे चार प्रमुख विभाग व २६ जिल्ह्यांचा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र झाला.

ᲕᲕᲕ

# चित्रवाचन


**प्रमोद धायगुडे**
जि. प. प्राथ. शाळा खळद,
ता. पुरंदर, जि. पुणे.
भ्रमणध्वनी : ९४२१२१४०८३

*पाठ्यपुस्तकात आकर्षक चित्रे असतात. मुलांनी त्यांचे निरीक्षण करावे, वाचन करावे असे अपेक्षित असते. काही चित्रे मुद्दाम चित्रवाचनासाठी दिलेली असतात. चित्रवाचनात कसे करावे याचे, चित्राचे निरीक्षण करणे, चित्राचे तोंडी वर्णन करणे, चित्रावरून लेखन करणे असे अनेक टप्पे आहेत. चित्रवाचनाविषयी अधिक माहिती देणारा, लहान वर्गासाठी उपयुक्त ठरणारा लेख.*

चित्रात मोठा आशय सामावलेला असतो. हा आशय समजण्यासाठी कोणत्याही लिपीचे बंधन नसते. चित्राची स्वतःची भाषा असते. ही भाषा विश्वव्यापी असते. गोष्टी आणि चित्रांची मुलांना उपजत आवड असते. कोणतेही पुस्तक हातात घेतले, की मुलांचे लक्ष अगोदर त्यातील चित्रांकडेच जाते. ही चित्रे एक प्रकारची लिपीच असते. या चित्रलिपीचा अर्थ प्रत्येक मूल वेगवेगळा घेते. मुलांच्या मौखिक अभिव्यक्तीसाठी ही चित्रे उपयुक्त ठरतात. या चित्राकडे प्रत्येक मूल स्वतःच्या कल्पकतेने, अनुभूतीने पाहत असते. चित्राचे निरीक्षण करून त्यातील बारकावे टिपून स्वतःच्या भाषेत व्यक्त करण्याची क्षमता चित्रवाचनामुळे मुलांमध्ये विकसित होते.

मूल स्वतःचे मर्यादित अनुभव घेऊन शाळेत येत असते. या अनुभवांचे प्रकटीकरण जसे औपचारिक–अनौपचारिक गप्पागोष्टींतून होते; तसेच ते चित्रवाचनातूनदेखील होत असते. चित्रातील आशयासोबत मूल स्वतः सांगड घालत असते.

प्रसंगचित्रे, चित्रकथा हे घटक मुलांसाठी जिव्हाळ्याचे असतात. वाचनाच्या प्रारंभिक टप्प्यावर मुलांसाठी चित्रवाचन महत्त्वपूर्ण ठरत असते.



### चित्रवाचन आणि प्रारंभिक वाचन :

वाचनपूर्व अवस्थेत कोणतेही अक्षर हे मुलांसाठी केवळ एका विशिष्ट आकाराचा लिपीबद्ध सांगाडा असतो. या आकारासाठी निश्चित असणारा ध्वनी समजला, की मग या अक्षराला अर्थप्राप्ती होते. वाचन स्तरावर अक्षरांची व त्यासाठी योजलेल्या ध्वनींची ओळख करून देण्यासाठी चित्रांचाच वापर केला जातो. उदाहरणार्थ 'क' हे अक्षर शिकवताना कप, कपाट, कणीस अशी मुलांना परिचित असलेली चित्रे दाखवून त्याच्या ध्वनींचे दृढीकरण केले जाते. सुरुवातीला अपरिचित असणारी ही अक्षरे चित्रांच्या मदतीने मुलांच्या परिचयाची होतात. प्रारंभिक वाचनाची सुरुवातच चित्रवाचनाने होते. थोडक्यात एकूणच भाषा आणि चित्रवाचन हा महत्त्वपूर्ण घटक आहे.

चित्रवाचन म्हणजे चित्राचे वर्णन करणे. हे वर्णन तोंडी आणि लेखी अशा दोन्ही पद्धतीने करता येते. सुरुवातीला तोंडी पद्धतीने हे वर्णन केल्यानंतर मुलांमध्ये

आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होते. मुलांच्या या बोलण्यातून त्यांच्या भाषिक जाणिवा समृद्ध व्हाव्यात यासाठी चित्रवाचन गरजेचे आहे.

चित्रवाचनामध्ये समर्पक शब्दांची योजना आणि तपशिलानुसार वर्णन करावे लागते. चित्रात प्रत्यक्ष न दिसणारा, मात्र चित्राशी संबंधित असलेला आशय कल्पनाविस्तार करून सरावाने सांगता येतो.

## कोणती चित्रे निवडावीत?

मुलांच्या भावविश्वाचे प्रतिबिंब असणारी कोणतीही चित्रे मुलांना आपलीशी वाटतात. क्रमिक पाठ्यपुस्तके, मुलांसाठीची मासिके तसेच विविध वृत्तपत्रांमधील मुलांच्या वयोगटाला साजेशी असणारी चित्रे निवडता येतात. पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ चित्रवाचनासाठीचे उत्कृष्ट साधन असते. मुलांनी व शिक्षकांनी स्वतः काढलेली चित्रे यांचाही चित्रवाचनासाठी उपयोग होतो. भाषापेटीत चित्रवाचनासाठी संच दिलेला आहे. चित्रे रंगीत असतील, तर ती मुलांना जास्त आवडतात. चित्रे रंगीत असोत किंवा ब्लॅक अँड व्हाईट असोत, ती स्पष्ट दिसणारी असावीत. त्यातून एखाद्या प्रसंगाचा किंवा दृश्यस्वरूप अजैविक घटकाचा बोध व्हावा.

चित्राची निवड केल्यावर त्याचे 'वाचन' नेमके कसे करायचे याचा विचार करावा लागेल. निरीक्षण, आकलन व अभिव्यक्ती या क्रमाने चित्राची वाचनप्रक्रिया घडत असते.

खालील टप्पे योजले, तर त्यातून मुलांची चित्राची वाचनप्रक्रिया अधिक सुलभतेने होण्यास मदत होते.

## चित्रवाचनाचे टप्पे :

**टप्पा १ : चित्रात दिसणाऱ्या वस्तूंची नावे सांगणे.**

उदा., डोंगर, झाड, पक्षी अशी चित्रात दिसणाऱ्या विविध वस्तूंची नावे मुले सांगतील.

चित्रातील काही गोष्टी मुलांच्या निरीक्षणातून सुटू शकतील. अशा वेळी शिक्षक मुलांना जाणीवपूर्वक निरीक्षण करण्यासाठी प्रेरित करतील.

**टप्पा २ : चित्रात दिसलेल्या वस्तूंविषयी वाक्य सांगणे.**

चित्रात दिसणाऱ्या वस्तू/व्यक्ती, त्यांचे वैशिष्ट्य तसेच कोणती क्रिया चालू आहे याबाबत वाक्य सांगणे अभिप्रेत आहे.

सुरुवातीच्या टप्प्यातील एका शब्दाचा विस्तार आता वाक्यापर्यंत होतो. शब्दापासून नेमके वाक्य कसे तयार करावे, याची उदाहरणे शिक्षक मुलांना दाखवतील. मूल चित्रात दिसलेल्या घटकांना क्रियादर्शक आणि विशेषणात्मक शब्द वा वाक्यरूप देऊ लागते.

उदा., डोंगर मोठा आहे. पक्षी उडत आहे.

**टप्पा ३ : चित्रातील वस्तूंची, पात्रांची संवादी स्वरूपात मांडणी करणे.**

पहिल्या टप्प्यात चित्रातील विविध घटकांची नावे मुलाने सांगितलेली असतात. दुसऱ्या टप्प्यावर या वस्तू/घटकांविषयी तो एक-दोन वाक्यांत बोलतो. तिसरा टप्पा यात संवादाची भर टाकण्याचा आहे. चित्रातील जैविक अथवा अजैविक घटकांना संवादाचे स्वरूप देऊन चित्रगप्पा फुलवता येतात.

उदा.,

पक्षी झाडाला म्हणाला,

''मी बसू का तुझ्या फांदीवर?''

झाड म्हणाले,

''हो, बस माझ्या फांदीवर.''

तेवढ्यात डोंगर हसू लागला.

पक्षी डोंगराला म्हणाला.

''डोंगरदादा, तू का हसतोस?

डोंगर म्हणाला,

''या झाडाने मला गुदगुल्या केल्या, म्हणून मला हसू आले.''

मुलांना अभिव्यक्त होण्यासाठी चित्रे उपयोगी ठरतात. शिक्षकांनी चित्रांच्या संवादी मांडणीचे प्रात्यक्षिक करून दाखवल्यानंतर, मुलेदेखील अशी मांडणी करू

लागतात. हा संवाद साचेबद्ध नाही. मुलांच्या बोलण्याला मुक्त अवकाश मिळाले, की मुले कल्पकतेने संवाद मांडतात. भाषा शिकण्यातील मुलांचा आत्मविश्वास आपोआप वाढू लागतो.

प्रत्येक मुलानुसार या टप्प्यांचा कालावधी वेगवेगळा असू शकतो. चित्रवाचनासाठी वापरले जाणारे हे टप्पे मुलांमध्ये वाचनक्षमता विकसित झाल्यानंतर लेखन अभिव्यक्तीसाठी देखील वापरता येतात.

## चित्रकथा :

चित्रकथेमध्ये एका कथेवर आधारित काही घटनाचित्रे दिली जातात. या घटनाचित्रांचा क्रम निश्चित करून त्यांतील घटना मुलाने स्वतःच्या शब्दांत सांगणे अपेक्षित असते. चित्रकथेतील शेवटचे घटनाचित्र रिकामे ठेवलेले असते. जेणेकरून या कथेचा शेवट मुलाने स्वतः करावा असे अपेक्षित असते. घटनाचित्रांचा परस्परांशी असलेला सहसंबंध व क्रम मुले निरीक्षणातून समजून घेतात व स्वतःला जे उमगले ते सांगतात.

वर्गातील भिन्न स्तरावरील मुलांचा चित्रकथांच्या आकलनाचा व सांगण्याचा वेग वेगवेगळा असतो. प्रत्येक मुलाच्या या वेगाचा आदर करून प्रत्येकालाच चित्रवाचन, चित्रगप्पा करण्याची व चित्रकथा सांगण्याची संधी मिळाली, तर सर्व मुले चित्रातील गोष्टीपर्यंत पोहोचतात.

## मुलांची चित्रे आणि मुलांच्या गोष्टी :

एखाद्या विषयावर अथवा प्रसंगावर मुले स्वतः चित्र रेखाटतात. स्वतः रेखाटलेल्या चित्रावर मुले आत्मीयतेने गप्पागोष्टी करतात. चित्र रेखाटताना एखादा विचार, कल्पना मुले चित्राद्वारे मांडत असतात. या रेखाटनात आकारांच्या प्रमाणबद्धतेची अपेक्षा नसते.

उदा., माझे घर या विषयावर चित्र रेखाटताना मूल कधी कल्पनेतील किंवा वास्तवातील घर रेखाटते. या रेखाटनाविषयी ते सहजपणे गप्पागोष्टी करते. चित्रवाचन करताना, मुलांना व्यक्त होण्यास अधिक वेळा संधी मिळाली, सराव झाला, तर सरावातून मग एकाच चित्रातून मूल अनेक गोष्टी सांगू लागते, मौखिक अभिव्यक्ती घडत राहते.

## चित्रवाचनातून पुढील गोष्टी साध्य होतात :

(१) भाषा शिकण्यातील आत्मविश्वास चित्रवाचनातून वाढीस लागतो.
(२) चित्राचे जाणीवपूर्वक निरीक्षण केल्यामुळे मुलांची निरीक्षण क्षमता वाढीस लागते.
(३) चित्रे मुलांना विचार करायला भाग पाडतात, चित्राविषयी स्वतःला जाणवलेले विचार, भावना मुले मांडत असतात.
(४) चित्रांच्या अनुषंगाने विविध परिचित, अपरिचित शब्दांशी मुलांचा संबंध येत असतो. यातून मुलांच्या शब्दसंग्रहात वाढ होते.
(५) मुलांची वाचनक्षमता विकसित होते.

## मुलांच्या मांडणीचा स्वीकार :

चित्राबद्दल मुले जे जे विचार अथवा कल्पना मांडतील, त्याचा स्वीकार आणि आदर होणे महत्त्वाचे आहे. या मांडणीत मुले स्वतःला जाणवलेल्या अथवा सुचलेल्या बाबी मांडत असतात. या मांडणीचा स्वीकार करून मुलांचे कौतुक केले, तर मुले चित्रवाचनात आनंदाने रममाण होतात. दिलेल्या चित्राचे पुन्हापुन्हा सूक्ष्मपणे निरीक्षण करून त्याविषयी आनंदाने बोलू लागतात.

मुलांना आकलनासह योग्य त्या गतीने वाचन करता येण्याची अनिवार्यता नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाने व्यक्त केली आहे.


चित्रवाचनातून वाचन आणि अभिव्यक्तीची सुरुवात होते. चित्राच्या गोष्टीची गंमतच न्यारी असते. विविध चित्रांचे नमुने आणि त्यांची मुलांनी केलेली मांडणी हा एक आनंददायी अनुभव असतो.

# शिकण्यासाठी साधने

**मंगेश जाधव**
प्राचार्य, श्रीसाईनाथ हायस्कूल अळकुटी,
ता. पारनेर. जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९८९०४८५८९६

*स्वयंलेखनामध्ये मुलांकडून निबंधलेखन करवून घेतले जाते. निबंधाचा विषय मुलांच्या अनुभवविश्वातील असेल आणि त्यावर मुलांनाच प्रश्न विचारून त्यांना उत्तरे शोधायला लावली आणि त्या उत्तरांच्या आधारे निबंधलेखन केले, तर निबंधलेखन अवघड न वाटता रंजक वाटते. मुलांना सायकल चालवायला आवडते. सायकल चालवताना मुले कधी धडपडतात. त्यामुळे छोटे-मोठे अपघातही होऊ शकतात. याच विषयाचा आधार घेऊन शिक्षकांनी निबंधलेखनाचा केलेला प्रयोग विचार करायला लावणारा आहे.*

एखादी घटना खूप काही सांगून जाते, त्याचे हे उदाहरण. एका ऑफ तासाला एक शिक्षक मुलांना घेऊन पटांगणावर झाडाखाली बसले होते. वर्ग होता सातवीचा. क्रमाने एक एक मुलगा पुढे उभा राहून वर्तमानपत्र वाचत होता. काही मुले ऐकत होती, तर काही एकमेकांशी आपापसात बोलत होती, तर काहींचे एकमेकांना खडे मारणे, मागे ओढणे, गुद्गुल्या करणे चालू होते, तर काही शून्यात पाहत होती. अशा पद्धतीने कामकाज चालले होते. मी जवळून जात असताना एक विद्यार्थिनी बातमी वाचत असताना दिसली. बातमी अशी होती, 'इयत्ता तिसरीच्या वर्गातील एक मुलगी सायकलवरून तोल जाऊन पडली. तिच्या घशात सायकलच्या हॅण्डलचा नट घुसून तिचा मृत्यू झाला.' मी थांबलो, मुलांकडे गेलो, बातमी पुन्हा वाचायला सांगितली. सर्वांनी ऐकली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. सर्व जण गांभीर्याने पाहू लागले. पुन्हा चर्चा सुरू झाली, ती बातमीच्या अनुषंगाने. मी त्यांना पाच मिनिटे बोलू दिले. काहींनी गांभीर्याने घेतले, काही गोंधळ करायला लागले.




त्यावेळी त्यांना शांत बसायला सांगितले. पुन्हा ती बातमी वाचायला सांगितली, मुलांनी ऐकली. त्यांना ती बातमी तोंडी सांगायला सांगितली. त्यानंतर मुलांना विचारले,

(१) तिसरीच्या वर्गातील मुलगी किती वयाची असेल?

(२) तिचा तोल कशामुळे गेला असेल?

(३) तिला सायकल येत असेल, का नसेल?

मुले तर्क करायला लागली. बोलायला लागली. सर्व अंदाज बरोबर वाटत होते. मग एका मुलीला सायकल आणायला सांगितली आणि शिकणे सुरू झाले.

त्यांना विचारले, कुठला नट लागला असेल? दोन-तीन मुली लगेच उठल्या. सायकलजवळ येऊन दाखवू लागल्या. वेगवेगळे अंदाज येऊ लागले. शेवटी एक मुलगी पुढे येऊन म्हणाली, ''सर, मीसुद्धा अशीच एक दिवस पडले होते. त्या वेळी मला याच ठिकाणचा नट घशाला लागला होता. मी सायकल हळू चालवत होते; म्हणून मला जास्त लागले नाही.'' सर्वानुमते कुठला नट लागल्यामुळे इजा झाली, त्याचा अंदाज लावण्यात आला. अनुभव सांगणाऱ्या मुलीला मोठी जखम कशामुळे झाली नसावी? त्याचाही अंदाज आला.

चर्चेत मुले उत्साहाने सहभागी झाली. न बोलणारी पण पुढे आली. आता रांगा राहिल्या नाहीत, मोठे वर्तुळ झाले.

मग विचारले, सायकलच्या आणखी कोणकोणत्या बाबी धोकादायक ठरू शकतात?

चेन कव्हर नसणे, ब्रेक कार्यरत नसणे, मडगार्ड नसणे, टायरट्यूब व्यवस्थित नसणे, तेल–पाणी नसणे, पायडलला रबरी कांड्या नसणे, नट बोल्ट तपासणी न करणे इत्यादी. त्या वेळी एका विद्यार्थिनीने सांगितले, 'माझी ओढणी चेनमध्ये अडकून मी पडले होते व माझा हात मोडला होता.' एका मुलाने सांगितले, 'पायडलला रबरी कांड्या नसल्याने माझ्या पायाला मोठी जखम झाली होती.' असे अनुभव विद्यार्थी सांगायला लागले; अगदी कधीही न बोलणारेसुद्धा.

तेवढ्यात त्याच वर्गातील दोन मुली आल्या. एकीच्या डोक्याला जखम झाली होती. त्यावर पट्टी बांधली होती. नाकाला, गालाला, हाताला खरचटले होते. तिच्या बरोबरच्या मुलीने सांगितले, 'सर, ही सायकलवरून पडली.' पुन्हा मुले अंदाज करू लागली? काय झाले असावे? एकाने सांगितले, 'कधी कधी दुसऱ्याच्या चुकीनेही असे होते' आणि त्या मुलीच्या बाबतीतही तेच कारण ठरले. रस्त्याने दोन मुले सायकलवर गप्पा मारत चालली होती. एकमेकांचा धक्का लागून ते दोघेही पडले. ही मुलगी त्यांना जाऊन धडकली. बरोबर अंदाज लावणारे भलतेच खूश झाले. यातून एक गोष्ट कळली असेल, की सुरक्षित अंतर ठेवून वाहन चालवणे.

तिच्या बरोबर असणाऱ्या मुलीने आणखी सांगितले, ''ती घाबरली होती. मी तिला उठवले. बाटलीतील पाणी दिले, शांत केले, डॉक्टरांकडे नेले. त्यांनी मलमपट्टी केली आणि हसून सांगितले, की घाबरू नको. जखम मोठी नाही. आपली काळजी घेऊन प्रवास करीत जा. त्यांनी पैसेसुद्धा घेतले नाहीत.''

घंटा झाली. मुले वर्गात पळत नाही, तर चर्चा करत करत गेली.

दुसऱ्या दिवशी शनिवार. (दप्तरमुक्त शाळा उपक्रम असतो.) त्यांना त्या तिसरीच्या मुलीचा जो अपघात झाला; तो तुम्ही पाहिला आहे असे समजून त्याविषयी सांगा.

- तुम्ही कोठे चालला होता?
- अपघात कोठे झाला?
- कसा झाला? (घटनाक्रम)
- त्यावर काय झाले? (त्या ठिकाणच्या बाबींचे वर्णन तिला बघणारे, व्हिडिओ काढणारे, बघून निघून जाणारे)
- तिला कोणी व कशी मदत केली?
- तुम्ही त्या वेळी काय मदत केली?
- तुम्हांला त्या वेळी कोणी काय करावे असे वाटले?
- पुढे तिचे काय झाले?
- तुम्हांला या अपघाताची काय कारणे आहेत असे वाटते?
- पुन्हा असा अपघात होऊ नये म्हणून काय करावे असे वाटते?
- या घटनेतून काय शिकलात?

या प्रश्नांच्या अनुषंगाने चर्चेत प्रत्येकाचा सहभाग होता. प्रश्न लिहून दिले. मग त्यांना सांगितले, 'हे आता तुम्ही जे सांगत आहात ते लिहून आणा.' सोमवारी पहिले तीन तास सर्वांचे सादरीकरण झाले. हे जे लिहिले आहे, त्याला एक शीर्षक द्या असे सांगितले.

- असा झाला अपघात
- मी पाहिलेला अपघात
- अति घाई संकटात नेई.
- चूक कोणाची?
- अपघात झाला असता काय करावे?
- अपघाताची कारणे?
- अपघात प्रसंगी माझी भूमिका

अशा प्रकारची अनेक शीर्षके सांगितली गेली.

यावर एक मुलगी म्हणाली, ''सर, मी पाहिलेला अपघात हा निबंध होईल का?'' मी म्हणालो, ''हो.'' ती म्हणाली, ''मी आता खूप मोठा व चांगला निबंध लिहिते.''

सर्वानुमते 'मी पाहिलेला अपघात' हे शीर्षक द्यायचे ठरले.

**त्यावर त्यात आणखी काम करायचे ठरवले ते असे :**

(१) त्यात वाक्प्रचार वापरता येतील का?

(२) काही शब्दांना पर्यायी शब्द देता येतील का?

(३) त्यात एखादी काव्यपंक्ती, सुभाषित किंवा एखादी उपमा देता येईल का?

**माझ्या निदर्शनास आलेल्या बाबी :**

(१) काय लिहायला हवे होते? काय नको होते? यावर मुले बोलत होती.

(२) जे कधीही बोलत नव्हते, ते विद्यार्थी बोलू लागले.

(३) गटचर्चा झाली.

(४) स्वतःचे मूल्यमापन केले. मी काय लिहायला हवे होते? कोणी चांगले लिहिले?

''आता आम्हांला समजले निबंध कसा असतो? त्याची तयारी कशी करतात? आम्हांला परीक्षेत निबंध लिहायला आल्यावर आता खूप भारी लिहू,'' एक मुलगा म्हणाला. ''मी तर पाठ करून लिहायचो'', दुसरा हसत हसत म्हणाला.

**या उपक्रमाची निष्पत्ती :**

- निबंधलेखन कार्यशाळा झाली.
- अनुभवातून शिक्षण झाले.
- आशय निर्मिती झाली.
- प्रश्नकौशल्य प्राप्त झाले.
- आत्मविश्वास निर्माण झाला.
- चिकित्सक विचारास चालना मिळाली.

एकमेकांना मदत करण्याची वृत्ती निर्माण झाली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे; शिकायचे कसे हे समजले.

**विद्यार्थ्यांमध्ये झालेले वर्तन परिवर्तन :**

- धोके ओळखायला शिकले.
- दुसऱ्या मुलांना धोक्याबाबत सांगू लागले.
- आई-वडिलांची काळजी कमी झाली.
- शाळेत शिस्तीला सहकार्य होऊ लागले.
- छोटी-मोठी सुट्टी किंवा शाळा भरण्यापूर्वी बेशिस्त विद्यार्थ्यांबाबत शिक्षकांना माहिती देऊ लागले.
- प्रत्येक बाबतीत माझी भूमिका काय? हे समजून वागू लागले.

**मी काय शिकलो?**

नुसते शिकवायचे नाही, तर शिकायचे कसे? हे कौशल्य मुलांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे, त्याकरिता शिकण्यासाठी साधनांची ओळख करून देणे व वापराबाबत दिशा दाखवणे.

**रुजलेली जीवनकौशल्ये :**

- निबंधलेखन
- प्रभावी संप्रेषण
- स्वजागृती
- समस्या निराकरण
- समानुभूती
- निर्णय घेणे
- आंतरव्यक्ती संबंध
- चिकित्सक विचार प्रक्रिया,
- सर्जनशील विचार प्रक्रिया,
- भावनांचे समायोजन,
- ताणतणावांचे समायोजन

कोणी कोणाला शिकवत नसतो, ज्याचा तो शिकत असतो. पुस्तकाच्या बाहेर जाऊया. शिकण्याची कौशल्ये रुजवूया. आपण मार्गदर्शक होऊन, जगण्याचे शिक्षण देऊया.

# शालेय शिक्षणात उद्योजकता : काळाची गरज

**डॉ. संतोष आगरकर**
राळेगाव, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९३७३७७८२१०

> *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२०च्या अनुषंगाने व्यावसायिक कौशल्यांचा विकास करणे ही अत्यावश्यक बाब असून, शालेय स्तरापासून त्याची सुरुवात व्हायला हवी. प्रत्येक विषयासोबत उद्योजकतेची सांगड कशी घालावी याचा ऊहापोह या लेखात केला आहे.*

शिक्षणाच्या विविध व्याख्या केल्या आहेत. त्यांपैकी सर्वांत समावेशक व्याख्या म्हणजे 'ज्या प्रक्रियेतून व्यक्तीचा सर्वांगीण विकास केला जातो ते शिक्षण' ही होय. सर्वांगीण विकासामध्ये प्रामुख्याने व्यक्तीचा बौद्धिक, शारीरिक व कौशल्य विकास यांचा समावेश आहे. शालेय अभ्यासक्रमातील विविध विषय, अभ्यासक्रम–पूरक उपक्रम, खेळ–क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींच्या माध्यमांतून यासाठी प्रयत्न केले जातात. व्यक्तीच्या या तिन्ही अंगांचा समतोल विकास करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे साध्य करण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात जीवनाच्या विविध क्षेत्रांतील बाबींचा समावेश असणे क्रमप्राप्त आहे. सध्याच्या शालेय शिक्षणात तसा प्रयत्न होत आहे.



शालेय शिक्षणात जीवनातील विविध घटकांचा व क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. समाजाच्या सद्य:स्थितीतील गरजा, आवश्यकता व समस्या लक्षात घेऊन अभ्यासक्रमात बदल करणे महत्त्वाचे होते. त्या अनुषंगाने वाढती लोकसंख्या, शिक्षणाचे प्रमाण, नैसर्गिक उपलब्ध साधनसंपत्ती, मनुष्यबळ, मूलभूत गरजा, आरोग्यविषयक सुविधा, जीवनमानाचा दर्जा, आवडी–निवडीनुसार क्षेत्र निवडण्याची संधी इत्यादी गोष्टींचा विचार करणेही आवश्यक आहे. त्यांपैकी एक महत्त्वाची बाब म्हणजे 'उद्योजकता' होय. वाढत्या लोकसंख्येच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सर्व क्षेत्रांतील उत्पादन क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ व तंत्रज्ञानाची गरज आहे, हे ओळखून शालेय अभ्यासक्रमात विशेषत: माध्यमिक स्तरावर उद्योजकता संकल्पनेचा विविध विषयांच्या माध्यमांतून समावेश केला पाहिजे. देशाच्या सर्व क्षेत्रांतील समतोल विकासासाठी तज्ज्ञ, अधिकारी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, वैद्य, सैनिक, शिक्षक, खेळाडू, प्रशिक्षक इत्यादींप्रमाणेच उद्योजकांची नितांत गरज आहे. त्यासाठी शालेय शिक्षणाच्या स्तरावरून उद्योजकतेसंबंधी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव–जागृती व आवड निर्माण केल्यास मोठ्या प्रमाणात चांगले उद्योजक आपल्या देशात घडू शकतात. या उद्देशाने हा लेख मी आपल्यापर्यंत पोहोचवीत आहे.

माध्यमिक स्तरावर गणित विषयाच्या अभ्यासक्रमात विविध उदाहरणे देऊन अध्यापन करताना, आपण जर उद्योगक्षेत्रातील उदाहरणांचा समावेश केला, तर ते फायदेशीर, होऊ शकते. विज्ञान अभ्यासक्रमात

उद्योग, कारखाने, व्यवसाय इत्यादीमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती समाविष्ट करून स्थानिक उद्योग-व्यवसायांची तोंडओळख करून दिल्यास, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी अभिरुची निर्माण होईल. विविध उद्योग-व्यवसायांसंबंधी आढावा, स्थानिक व जागतिक पातळीवरील यशस्वी उद्योजक यांच्याविषयीच्या माहितीचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळू शकते. भूगोल विषयात कोणकोणत्या भागात कोणकोणते उद्योग-व्यवसाय विकसित झालेले आहेत, त्याची कारणे, नकाशाद्वारे अभ्यास इत्यादींचा समावेश उद्योजकतेला पोषक वातावरण निर्माण करू शकतो.

कार्यानुभव विषयाच्या माध्यमातून स्टार्टअप्स (STARTUPS) संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये शालेय स्तरावर रुजवू शकतो. अभ्यासक्रमेतर उपक्रमांद्वारे शिक्षकांच्या कल्पकतेतून व स्थानिक उद्योजकांच्या मदतीने शालेय स्तरावर उद्योजकतेची बिजे नवीन पिढीच्या मनात रुजवू शकतो.

शालेय शिक्षणात सहलीला महत्त्व दिले जाते. त्याचाच एक भाग म्हणून स्थानिक उद्योग-व्यवसाय, कारखाने इत्यादींना भेटी, सहली आयोजित केल्यास विद्यार्थ्यांमध्ये याविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊ शकतो.

सर्व शाळांत शाळा समितीची स्थापना केली जाते. यात थोडा बदल करून स्थानिक यशस्वी उद्योजकाला सदस्य म्हणून या समितीत स्थान दिल्यास, उद्योजकतेला चालना मिळू शकते.

विविध कार्यक्रम जसे उद्योजकतेवर आधारित निबंध स्पर्धा, भाषणे, व्याख्याने, मेळावे, प्रदर्शन, मुलाखती, चित्रफिती इत्यादींच्या माध्यमातून माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेसंबधी आवड निर्माण केली जाऊ शकते. यासाठी शालेय शिक्षणातील प्रत्येक घटकाने प्रयत्न करावेत असे मला वाटते.

शालेय शिक्षणात इयत्ता आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी इनक्युबेशन केन्द्राची शाळेत स्थापना केल्यास विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी जागृती होऊन उद्योगक्षेत्राविषयी आवड निर्माण होऊ शकते. हे केंद्र म्हणजे उद्योजकतेची उबवण निर्माण करून नवउद्योजक घडवणारे दालन होऊ शकते. उद्योजकतेसाठी पोषक वातावरण व सुविधा विकसित करण्यासाठी शाळा शासकीय योजना, खाजगीसंस्था, औद्योगिक क्षेत्रातील संस्था, सेवाभावी संस्था इत्यादींची मदत घेऊ शकते. या प्रक्रियेला वेग देण्यासाठी शाळेतील काही शिक्षकांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. या केंद्रांद्वारे सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांसाठी लागणारे मार्गदर्शन, संधी, तज्ज्ञ, इत्यादी सुविधा शाळा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊ शकतात.

प्रत्येक शाळेत सर्वच आवश्यक सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत, त्यामुळे परिसरातील शैक्षणिक संस्थांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या भौतिक व इतर सुविधा आपल्या भागातील इतर संस्थांसोबत देवाणघेवाण करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्याव्यात. यासाठी शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करणे आवश्यक आहे. विविध संस्थांमध्ये शैक्षणिक, प्रशासकीय, संशोधन व इतर उपक्रमांसाठी सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्यामध्ये सामंजस्य करार करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी मोठ्या संस्थांनी पुढाकार घ्यावा असे अपेक्षित आहे.

शालेय वातावरणात उद्योजकता रुजविण्यासाठी अभ्यासक्रमात समावेश, सामंजस्य करार, इनक्युबेशन केंद्राची स्थापना, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, औद्योगिक

**(पृष्ठ क्र. ६१ वर)**

# दृष्टीचे रक्षण करूया, सृष्टीचा आनंद घेऊया...

**प्रतिभा नवले**
जि. प. प्राथ. शाळा केदार वस्ती,
(उपळाई खु.) ता. माढा, जि. सोलापूर.
भ्रमणध्वनी : ७२७६४२४४३०

संपूर्ण जग कोरोनाच्या विळख्यात सापडलेले असताना मानवी जनजीवन ठप्प झाले होते. नाइलाजाने शाळाही बंद कराव्या लागल्या होत्या. मुले शिक्षण प्रवाहात राहिली पाहिजेत, यासाठी शासनाकडून 'शाळा बंद, पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये ऑनलाईन शिक्षण घेण्याविषयी सूचना देण्यात आल्या. त्यामुळे मुलांना मोबाईल वापरू देणे गरजेचे ठरले.

मोबाईल, संगणक, टीव्ही यांसारख्या इलेक्ट्रॉनिक साधनांच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये दृष्टिदोषासारखे आजार दिसून येऊ लागले. त्यासाठी शासनाला 'चला जाऊया उजेडाकडे' यांसारखे उपक्रम राबवावे लागताना आपण पाहत आहोत.

शिक्षण हे परिवर्तनाचे माध्यम असून, विद्यार्थी हीच देशाची संपत्ती आहे. उद्याची भावी पिढी जर उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण बनवायची असेल, तर ती अगोदर आरोग्यसंपन्न असायला हवी. त्यासाठी त्यांना आरोग्याचे धडे देणे गरजेचे झाले आहे. यासाठी आम्ही शाळेत 'दृष्टीचे रक्षण करूया, सृष्टीचा आनंद घेऊ या' या नवोपक्रमाची अंमलबजावणी सुरू केली आणि मुलांमध्ये सकारात्मक बदल जाणवायला सुरुवात झाली.

### नवोपक्रमाचे महत्त्व आणि गरज :

विद्यार्थ्यांनी मोबाईल, संगणक, टीव्ही यांसारख्या साधनांचा गरजेपुरता वापर केला, तरी दृष्टीस हानी पोहोचणार आहे, हे निश्चित. त्यामुळे त्यांचे भविष्य दृष्टिहीन होऊ नये म्हणून डोळ्यांची निगा राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता डोळ्यांचे संरक्षण

> *मोबाईल अथवा टीव्ही पाहण्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. तो ताण कमी करण्यासाठी डोळ्यांच्या विविध हालचाली आणि मर्यादित व आवश्यक तेवढा वेळ त्यासाठी देणे योग्य ठरेल हे या नवोपक्रमातून मांडले आहे. मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त माहिती यातून मिळणार आहे.*

करणाऱ्या अशा उपायांविषयी शालेय विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती करणे आवश्यक आहे.

### नवोपक्रमाची उद्दिष्टे :

(१) मुलांना स्वतःहून डोळ्यांची निगा राखण्यास प्रवृत्त करणे.
(२) डोळ्यांचे व्यायाम प्रकार करण्यास प्रवृत्त करणे.
(३) मुलांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करणे.
(४) आरोग्यसंपन्न जीवनशैलीचा अंगीकार करणे.
(५) योग्य व सकस आहाराविषयी जागृती निर्माण करणे.
(६) मोबाईल, संगणक, टीव्ही यांसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा अतिवापर टाळणे.
(७) पुरेशी विश्रांती घेणे.

### नवोपक्रमाचे नियोजन :

शालेय स्तरावर, वर्ग पातळीवर 'दृष्टीचे रक्षण करूया, सृष्टीचा आनंद घेऊया' हा उपक्रम इयत्ता पहिलीपासून आपण राबवू शकतो. शाळा स्तरावर आठवड्यातून दोन दिवस परिपाठानंतर दहा ते पंधरा मिनिटे या उपक्रमासाठी वेळ देऊ शकतो. तसेच वर्ग स्तरावर शारीरिक शिक्षणाच्या तासाला हा उपक्रम घेऊ शकतो.

तसेच ही कृती दररोज घरी पालकांसोबत किंवा सुट्टीच्या दिवशीदेखील करू शकतात.

**डोळ्यांचे व्यायाम प्रकार**




## नवोपक्रमाची कार्यपद्धती :

शाळा स्तरावर, वर्ग स्तरावर गुरुवार, शनिवार हे वार निश्चित करून परिपाठानंतर हा उपक्रम घेण्याचे नियोजन झाले. यामध्ये डोळ्यांच्या व्यायाम प्रकारांच्या कृती घेण्यात आल्या.

**कृती १ : दृष्टी डाव्या-उजव्या बाजूला/वर-खाली स्थिर करणे :** योग्य स्थितीत बसून दीर्घ श्वास घेणे. मान स्थिर ठेवून, मान न हलवता दृष्टी डाव्या बाजूला स्थिर ठेवा. या ठिकाणी दृष्टीला दोन ते तीन सेकंद स्थिर ठेवा. पुन्हा तुमच्या उजव्या बाजूला दृष्टीला स्थिर करा या ठिकाणी दृष्टी दोन ते तीन सेकंद स्थिर ठेवा. ही कृती पाच वेळा करा.

याचप्रमाणे दृष्टी वर व खाली स्थिर ठेवायची. ही कृती पाच वेळा करायची आहे.

**कृती २ : डोळे गोलाकार फिरवणे :** सरळ बसून समोर नजर स्थिर ठेवा. खांद्यांना आरामदायी ठेवा. तुमच्या उजव्या बाजूला पाहून डोळे वरच्या बाजूला वळवा नंतर डाव्या बाजूला पाहून जमिनीच्या दिशेने पाहा. याप्रमाणे वर्तुळाकृती डोळ्यांची हालचाल पाच वेळा करा. हीच कृती उलट बाजूनेही करा.

**कृती ३ : डोळ्यांनी काल्पनिक इंग्रजी '8' आकडा गिरविणे :** तुमच्या समोरील अंदाजे दहा फूट दूर अशा भिंतीवर किंवा जमिनीवर नजर स्थिर ठेवा. काल्पनिक इंग्रजी '8' हा आकडा आठवून तो डोळ्यांनी काढण्याचा प्रयत्न करा हीच कृती उलट दिशेनेही करा. तुम्ही तुमच्या हाताच्या अंगठ्याने इंग्रजी '8' हा अंक हवेत काढून दृष्टीला स्थिर करू शकता. फक्त तुमचा हात सरळ राहील याची काळजी घ्या.

**कृती ४ : जवळ-लांब दृष्टिकेंद्रीकरण करणे :** नजरे-समोर अंदाजे दहा इंच अंतरावर तुमच्या हाताचा अंगठा धरा व त्यावर पंधरा सेकंद दृष्टी स्थिर ठेवा. त्यानंतर दहा फूट दूर अशा एखाद्या वस्तूवर पंधरा सेकंद दृष्टी स्थिर करा. परत तुमच्या अंगठ्याकडे नजर वळवा. ही कृती पाच वेळा करा. त्यामुळे डोळ्यांचे स्नायू मजबूत होतात व पर्यायाने आपल्या दृष्टीत सुधारणा होते.

**कृती ५ : हातांनी डोळ्यांना उब देणे :** योग्य स्थितीत बसून दोन्ही डोळे बंद करा. दोन्ही तळहातांनी एकमेकांवर पंधरा सेकंद घर्षण करा. मग त्यांना अलगद डोळ्यांवर ठेवा. डोळ्यांवर हाताचा अजिबात दाब देऊ नका. हाताची

उष्णता तुमच्या डोळ्यांना मिळेल. त्यामुळे डोळ्यांना आराम वाटेल. हातांची उष्णता पूर्णपणे कमी होईपर्यंत हात डोळ्यांवरच ठेवा. ही कृती पाच वेळा करा.

**कृती ६ : आराम करणे :** अत्यंत महत्त्वाचे म्हणजे रात्रीची विश्रांती. ही डोळ्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. पुरेशी विश्रांती घ्या आणि डोळ्यांना आरोग्य द्या.

यांसारखे डोळ्यांचे व्यायामप्रकार दररोज किंवा आपल्या वेळेनुसार केल्याने आपल्या दृष्टीमध्ये निश्चितपणे सुधारणा घडते.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

(१) मुले हसतखेळत आनंदाने कृतीत सहभागी झाली.
(२) व्यायामाविषयी आवड निर्माण झाली.
(३) मुलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागला.
(४) वर्गातील वातावरण आनंददायी झाले.
(५) आनंदाचे व उत्साहाचे वातावरण तयार झाले.
(६) डोळ्यांची काळजी घेण्याविषयी मुले सजग झाली.
(७) डोळ्यांची काळजी घेण्यासाठी वेगवेगळ्या व्यायामांचा शोध नव्याने घेऊ लागली.
(८) घरीही पालकांसोबत मुले व्यायाम करू लागली.
(९) मोबाईल, संगणक, टीव्ही यांसारख्या वस्तूंच्या वापराविषयी जागरूकता निर्माण झाली.
(१०) रात्रीच्या झोपेचे महत्त्व जाणू लागली.

**समारोप :**

या उपक्रमामुळे माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीविषयी असणाऱ्या तक्रारी दूर झाल्या आहेत. वर्गात आनंदाने व उत्साहाने कृती करण्यास मुले तयार होऊ लागली. जीवनशैली व आरोग्य यांची सांगड योग्य पद्धतीने घालता येऊ लागली.



**कृती स्पष्टीकरण**



**दृष्टी वर-खाली करणे, दृष्टी डावी-उजवीकडे स्थिर करणे.**

**(पृष्ठ क्र. ५८ वरून)**

क्षेत्रांना भेटी, यशस्वी उद्योजकांच्या मुलाखती व व्याख्याने, शिक्षकांचे प्रशिक्षण, उद्योजकता जागृतीपर उपक्रम व कार्यक्रमांचे विविध स्तरांवर आयोजन इत्यादी माध्यमांचा प्रभावीपणे वापर करणे काळाची गरज आहे. यामुळे नोकरीच्या प्रतिक्षेत न राहता नव युवक-युवती उद्योजकतेकडे वळल्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊन सामाजिक स्वास्थ्य चांगले राहू शकते. यासाठी शैक्षणिक संस्थांनी व औद्योगिक क्षेत्रातील संस्थांनी एकत्रित प्रयत्न करावेत ही अपेक्षा व्यक्त करतो.

# सुट्टी, अभ्यास आणि मौजमस्ती

**उर्मिला लंबे**
श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व
कनिष्ठ महाविद्यालय, जि. सोलापूर.
भ्रमणध्वनी : ८८८८९९७११७

*मे महिन्यात मुलांना उन्हाळ्याची सुट्टी असते. सुट्टीत मुलांनी खेळाबरोबर थोडा अभ्यासही करावा अशी अपेक्षा असते. मुलांना नेहमीच्या पद्धतीचे लेखन न देता त्यांच्या आवडीचे, खेळाशी सुसंगत लेखन दिले, खेळातून, गमतीजमतीतून अभ्यास झाला, तर ते मुलांसाठी आनंददायी ठरते. अशाच काही गमतीशीर अभ्यासाचा समावेश असणारा लेख.*

सुट्टीत नेहमीच्या दिनक्रमापासून सुटका हवी, खेळायला मिळायला हवे आणि मजा यायला हवी, तरच सुट्टीची खरी मौज आहे. सुट्टीतला अभ्यास प्लॅन करताना स्वतः मुलांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्याही हे ध्यानात असणे फार महत्त्वाचे आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या आता लवकरच सुरू होतील. काहींच्या परीक्षा संपल्या असतील, काहींच्या या महिन्यात संपतील. सुट्टीत काय करायचे, या गोष्टीचे प्लॅनिंग सर्वांनी केलेले असते.

दररोजची शाळा, क्लास, तोच तोच अभ्यास या चक्रात अडकलेल्या मुलांना जराही इकडेतिकडे करायला वाव नसतो. त्यांनाही निवांतपणा, मोकळा वेळ, स्वातंत्र्य हवे असते. सुट्टीच्या निमित्ताने अशी संधी मुलांना मिळते.




'अ' अभ्यासाचा म्हटले, की मुलांना कंटाळा येतो. मुलांना अभ्यास हा आपला वाटला पाहिजे. याबद्दल आपण वारंवार बोलतो, ऐकतो. एखादी गोष्ट करताना मुलांना मजा आली, तर ती त्यांना पुन्हा स्वत:हून करावीशी वाटते, ही साधी बाब आहे; पण महत्त्वाची आहे.

आपण अगदी रोजच्या शुद्धलेखनापासून सुरुवात करूया. मुलांना शुद्धलेखन लिहिताना मजा वाटायला हवी. रोज एखाद्या पुस्तकात पाहून उतारा लिहिला पाहिजे, याऐवजी आपल्याला वेगळे काही करता येईल; जेणेकरून मुले आनंदाने लिहितील.

- छोट्या मुलांना कार्टून कॅरेक्टर्स आवडतात. मुले त्यांच्या लकबी, हावभाव, हुबेहूब करून दाखवतात. अशा पात्रांच्या तोंडचे संवाद मुलांना अगदी तोंडपाठ असतात, तेच शुद्धलेखन म्हणून त्यांच्याकडून लिहून घेता येईल.
- संभाषणाच्या स्वरूपातील लेखन. मग ते दोन मित्रांमधील असेल, आजी-आजोबा व नातवंडांमधील संवाद किंवा चौकशी, भांडण अशा कोणत्याही स्वरूपाचे असेल यात खूप मजा करता येणे शक्य आहे. मुळात हे संभाषण मुलांच्या स्वतःच्या अनुभवविश्वाशी निगडित असल्यामुळे प्रत्येकाकडे त्यात सांगण्यासारखे काहीतरी नक्कीच असते. यामुळे अशा पद्धतीचे संवादलेखन मुले निश्चितपणे करू शकतात.
- शब्दकोड्यांसाठी शब्दांची यादी तयार करणे किंवा वर्तमानपत्रातील शब्दकोडी सोडवणे.

- एखादा सिनेमा किंवा नाटकातला प्रसंग लिहिता आला; तोही स्वतःच्या शब्दांत, तर यात अनेक गोष्टी साध्य होऊन जातात.

शुद्धलेखनासारखा प्रकार पाढ्यांच्या बाबतीतही होतो. रोज पाढे लिहिले तर पाहिजेत, नुसती पाने भरत राहण्यात काही अर्थ नाही, ते पाठही व्हायला हवेत; त्यासाठी काय करता येईल ते पाहूया.

- पाढे म्हणताना मधला एक टप्पा गाळून म्हणायचे म्हणजे सात एके सात, सात त्रिक एकवीस,...अशा पद्धतीने.
- कधी संख्यांच्या चिठ्ठ्या तयार करता येतील आणि रोज कोणत्याही पाच चिठ्ठ्या उचलायच्या आणि त्यात येईल त्या संख्येचा पाढा लिहायचा असेही करता येईल.
- मोजके पैसे घेऊन बाजारातून अर्धा किलो भाजी, अर्धा डझन फळे आणणे किंवा दिलेल्या यादीनुसार सामान आणणे. अशा पद्धतीने गणिताचा अभ्यास सुट्टीत करता येईल.

भूगोलातील नकाशे अनेकांना आवाक्याबाहेरचे वाटतात. एखादा नकाशा ओळखीचा झाला, की भूगोल, भूगोलातल्या खूपशा गोष्टींची भीती वाटणे कमी होत जाते, मात्र यासाठी वेळ द्यावा लागतो. असा वेळ सुट्टीशिवाय कोठून मिळणार? तेव्हा असे नकाशे अभ्यासायला सुट्टीत खूप मजा येते.

अनेकदा विज्ञानाच्या पुस्तकात मुलांनी करून पाहावे असे साधे साधे प्रयोग व कृती दिलेल्या असतात. त्यातल्या बऱ्याच कृती घरी उपलब्ध असलेल्या साहित्यातून करता येण्यासारख्या असतात. त्या सगळ्याच कृती काही शाळा सुरू असताना करायला जमतात असे नाही. त्या करून पाहण्यातही वेगळी गंमत असते. मुलांना त्यात रस वाटतो. मुले अशा प्रयोगांमध्ये खूप रमतात.

एखादा विषय बऱ्याच वेळा मुलांना समजलेला नसतो. जसजसा मुलांचा अभ्यास वाढत जातो, तशा आधीच्या वर्गातल्या संकल्पना अधिक स्पष्ट व्हायला वावच राहत नाही आणि आधीच्या संकल्पना स्पष्ट नाहीत; म्हणून पुढच्या कळत नाहीत. अशा दुष्टचक्रात मुले अडकलेली असतात. मुळातच काही संकल्पनांवर काम करायचे राहिलेले असते. रोजच्या रहाटगाडग्यात आधीच्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नसतो; म्हणून सुट्टीत आधीच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वेळ देता येईल.

साधारणपणे सर्वांनाच पुढील इयत्तेत गेलो, की मागील इयत्तेचा अभ्यास सोपा वाटतो. पुढच्या वर्षी पुढच्या काही गोष्टी शिकल्या, की आधीच्या गोष्टींकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहता येते. त्यानेही खूप फरक पडतो आणि एकदा या अभ्यासक्रमावर आधारित असा पेपर लिहायचा नाही, हे मनात असले, की मग शिकणे परीक्षेसाठी राहत नाही, तर ते स्वतःसाठी होते. मग सगळी मानसिकताच बदलून जाते. अशा गोष्टी मुलांच्या मुलांना जाणवल्या तर उत्तमच, पण ज्यांना स्वतःहून ते कळत नाही अशा मुलांना आपण ते कसे सांगतो, हे फार महत्त्वाचे ठरते. अशा विद्यार्थ्यांसाठी ही सुट्टी खूप उपयोगी ठरते.

खूप मुले शाळा सुरू असताना खेळू शकत नाहीत, असे चित्र आता शहरातूनच काय; पण लहानलहान खेड्यातूनसुद्धा दिसत आहे. त्यामुळे सुट्टीत नेहमीच्या रुटीनपासून ब्रेक हवा, खेळायला वेळ मिळायला हवा आणि मजा यायला हवी, तरच सुट्टीची खरी मौज आहे. सुट्टीतला अभ्यास प्लॅन करताना हे स्वतः मुलांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्याही ध्यानात असणे फार महत्त्वाचे आहे; कारण खेळातून बराचसा अभ्यास होत असतो.


# पाहुण्यांची शाळेला अचानक भेट

**नवनाथ जाधव**
जि. प. प्राथ. शाळा पांडुरंगशेठ पडते,
पडतेवाडी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
भ्रमणध्वनी : ९४२१२६९७२३

*शाळांना शिक्षण विभागातील अधिकारी भेट देत असतात. वेळप्रसंगी स्थानिक पदाधिकारीही शाळेला भेट देतात, पण खेडेगावातील छोट्याशा शाळेला राष्ट्रीय स्तरावरच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. शाळेची पाहणी केली, तर ती नवलाचीच गोष्ट आहे. अशाच एका पडतेवाडीसारख्या छोट्याशा गावातील शाळेला केंद्र सरकारच्या समितीने भेट दिली. शाळेच्या दृष्टीने ही खूप मोठी बाब आहे. त्याविषयीचा वृत्तांतवजा लेख.*

जि. प. प्राथ. शाळा पडतेवाडी, येथील शाळेतील भेटीदरम्यान ''यहाँ आकर अतिप्रसन्नता हुई, शिक्षक अच्छा काम कर रहे है।'' असे गौरवोद्गार भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे संचालकांनी काढले. ते जलस्वराज्य अभियानांतर्गत कुडाळ येथील जिल्हा परिषदेच्या पडतेवाडी शाळेत आले होते.

राज्य शासन व केंद्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जलस्वराज्य अभियानांतर्गत अनेक योजना राबवल्या जातात. तसेच पाणी व त्याचे महत्त्व यांविषयी जनजागृती करण्यासाठी शाळांनी विविध कार्यक्रम राबवणे गरजेचे असते. त्याची पाहणी करणे आणि योजनांचा आढावा घेणे यासाठी मा. संचालक, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारची समिती सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर आली होती. त्यात अनेक शाळा व इतर विभागांचाही समावेश होता. त्यादरम्यान सदर समितीने पडतेवाडी शाळेला भेट दिली.



समिती येण्याअगोदर शिक्षणाधिकारी तसेच उपशिक्षणाधिकारी यांनी शाळेला भेट देऊन पूर्वतयारीचा आढावा घेतला. गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांनीही शाळेला भेट देऊन आढावा घेतला आणि मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापिकांनी योग्य नियोजन करून शिक्षकांना सोबत घेऊन पूर्वतयारी करून घेतली. शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी प्रयत्नरत होते. आठवडाभर सर्व जण मनापासून झटत होते.

इयत्ता चौथीच्या वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून 'जलव्यवस्थापन'संदर्भात विविध प्रकारच्या रांगोळ्या काढून घेतल्या. वक्तृत्व स्पर्धेची तयारी करून घेतली. या स्पर्धेचे मूल्यांकन केंद्रातील इतर शाळांतील शिक्षकांनी केले. इयत्ता तिसरीच्या वर्गशिक्षकांनीही आपल्या विद्यार्थ्यांकडून वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांची तयारी करून घेतली. इयत्ता दुसरीचे वर्गशिक्षक तसेच इयत्ता पहिलीचे वर्गशिक्षक यांनीही आपल्या विद्यार्थ्यांकडून चित्रकला स्पर्धेसह अन्य उपक्रमांची तयारी करून घेतली. तसेच सर्व शिक्षकांनी पूर्वतयारी करताना स्टेज तयारीपासून

चित्रकला प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा प्रदर्शन, फलकलेखन, स्वागताची रांगोळी इत्यादींसाठी मेहनत घेतली.

मा. संचालक आणि संपूर्ण समिती जेव्हा प्रत्यक्ष शाळेत येण्याची वेळ आली, तेव्हा सर्वांच्याच मनावर एक दडपण होते. समिती जेव्हा शाळेत आली, तेव्हा स्वतः मुख्याध्यापक आणि काही शिक्षक थोड्या विद्यार्थ्यांसह समितीच्या स्वागतासाठी शाळेच्या गेटवर हजर होते. समितीचे आगमन होताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात समितीचे स्वागत केले. मुख्याध्यापकांनी पुष्पगुच्छ आणि पुस्तके देऊन सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर शिक्षण मंत्रालयाचे संचालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. एका विद्यार्थिनीने पृथ्वीवरील पाण्याचे प्रमाण किती, या प्रश्नाचे उत्तर बरोबर दिल्याने मा. संचालक यांनी तिला पुस्तक भेट देऊन तिचे कौतुक केले. त्यानंतर सर्व मान्यवर रांगोळी प्रदर्शन पाहण्यासाठी आले. रांगोळी प्रदर्शन पाहताना, ज्या ज्या विद्यार्थ्यांनी रांगोळी काढली होती, त्या प्रत्येक विद्यार्थ्याशी मा. संचालक यांनी संवाद साधत कौतुक केले आणि शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.



रांगोळी प्रदर्शन पाहत असताना प्रत्येकाच्या रांगोळीचे वैशिष्ट्य काय आहे, ते पाहून त्या संदर्भात त्या त्या विद्यार्थ्याशी त्यांनी खूप चांगल्या प्रकारे संवाद साधला, विद्यार्थ्यांनी पण खूप चांगला प्रतिसाद दिला. एका विद्यार्थिनीने आपल्या रांगोळीत 'Every drop is important' हे वाक्य लिहिले होते. मा. संचालकांनी 'या वाक्याचा अर्थ काय? असे विचारले,' त्यावर तिने 'पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे.' असे सांगितले. तसेच 'हे वाक्य कोणी म्हटलेले आहे,' असे तिला विचारले, पण ते तिला सांगता आले नाही. त्यानंतर त्यांनी 'आपल्या देशाचे प्रधानमंत्री कोण आहेत' असे विचारले. यावर तिने मा. नरेंद्र मोदी असे उत्तर दिले, यावर खूश होत, संचालकांनी तिला शाबासकी दिली आणि हे वाक्य मा. नरेंद्र मोदी यांचे आहे, असे सांगितले. अतिशय उत्साहात रांगोळी प्रदर्शन पाहून सर्व जण बाहेर पडले.

त्यानंतर समिती चित्रकला प्रदर्शन पाहण्यासाठी आली. चित्रप्रदर्शन पाहून खूश होत, त्यांनी मुलांचे कौतुक केले. त्यानंतर व्हरांड्यामध्ये एकत्र बसवलेल्या मुलांसोबत त्यांनी संवाद साधला. ते मुलांना प्रश्न विचारत होते आणि मुले अतिशय दिलखुलासपणे उत्तरे देत होती. प्रश्न हिंदीत विचारले जात होते, ज्या प्रश्नांचा मुलांना अर्थ समजत नव्हता, त्याचे मराठीत भाषांतर करून मुख्याध्यापिका सांगत होत्या. त्यावर मुले दिलखुलासपणे उत्तरे देत होती. गोष्टींची कोणती पुस्तके वाचली, असे संचालकांनी विचारले, त्यावर मुलांनी पुस्तकांची नावे सांगितली. तसेच तुम्हांला शाळेत काय आवडते? तीन गोष्टी सांगा. यावर मुलांनी पहिली गोष्ट सांगितली अभ्यास, दुसरी गोष्ट शिक्षकांचा ऊर भरून येईल अशी सांगितली, ती म्हणजे शिक्षक आणि तिसरी गोष्ट सांगितली शाळेतील मित्र; यावर मा. संचालक अतिशय प्रभावित झाले आणि जाता जाता ते म्हणाले, 'यहाँ आकर अतिप्रसन्नता हुई, शिक्षक अच्छा काम कर रहे हैं।' त्यांचे हे वाक्य शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे ठरले.

# पत्रलेखन

**डॉ. कैलास दौंड**
जि. प. प्राथ. शाळा हंडाळवाडी,
पो. ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११

*पत्रलेखन ही एक कला आहे. आपल्या आप्तांशी संवाद साधण्यासाठी पत्रलेखन उपयुक्त ठरत असे. शासकीय कामकाजासाठी देखील पत्रं लिहिली जातात. मात्र आजकालच्या काळात व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम यांच्या वापरामुळे संवाद साधणे सोपे झाले असले, तरी लेखनातील शिस्तबद्धता पाळली जातेच असे नाही. पत्रलेखनात लेखनपद्धती, मांडणी, औपचारिकता यालाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासाठी शालेय पातळीवर पत्रलेखन शिकवले जाते, मात्र प्रत्यक्षात पत्र लिहिण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे पत्रलेखनाचा सराव आणि संधी मिळावी यासाठी पत्रलेखन हा उपक्रम घ्यायचे ठरवले. त्याविषयी...*

इयत्ता सहावी आणि सातवीच्या पाठ्यपुस्तकात दुसऱ्या सत्रात पत्रलेखन हा घटक आहे. पाठ शिकवतानाच हा उपक्रम घ्यायचे निश्चित केले. इयत्ता सहावीच्या 'बालभारती'च्या पाठ्यपुस्तकातील पाठ-२२ 'वडिलांस पत्र' हा आहे आणि इयत्ता सातवीच्या 'बालभारती'च्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ८३ वर 'आभारपत्र' आहे. विद्यार्थ्यांना हे घटक शिकवत असताना केवळ वहीतील पानांवर पत्रलेखन शिकवण्याऐवजी प्रत्यक्ष लेखनाचा अनुभव द्यावा असे ठरवले. पत्रलेखन या उपक्रमाची तयारी करताना दोन्ही वर्गाला आधी संबंधित घटक शिकवले. पत्ता, मायना, शेवट इत्यादी सर्व मुद्दे समजावून देऊन त्यांची उजळणी घेतली. वहीवर पत्रलेखनही करून घेतले.

### उपक्रमाची निवड :

पत्र लिहिणे म्हणजे अर्धी भेट घेणे असे पूर्वी म्हटले असे. आता पत्रलेखन कमी प्रमाणात होत असले, तरी पद्धतशीरपणे व्यक्त होण्याचा तो चांगला मार्ग आहे. त्यामुळे पत्रलेखन हे केवळ वहीत किंवा परीक्षेत लिहिण्यापुरतेच मर्यादित राहू नये; म्हणून विद्यार्थ्यांना पत्रलेखनाचा प्रत्यक्ष अनुभव द्यावा असे मला वाटले. कुणाला पत्र लिहावे? असा विचार मनात सुरू होता. तेव्हा २७ फेब्रुवारी, २०२३ हा दिवस जवळ आल्याने 'मराठी भाषा गौरव दिना' चे औचित्य साधून पाठ्यपुस्तकातील लेखक-कवींना विद्यार्थ्यांनी पत्रे पाठवावीत असे ठरवले. विद्यार्थ्यांना आपल्याला लेखक कवींना पत्रं पाठवायची आहेत, कोण-कोण पत्र लिहिणार आहेत? असे विचारल्यावर बहुतेक विद्यार्थ्यांनी हात वर केले. प्रत्यक्ष पत्रलेखनाचा अनुभव विद्यार्थ्यांना आनंददायी ठरेल याची खात्री पटली.






## पूर्वतयारी :

इयत्ता सहावी आणि सातवीच्या पाठ्यपुस्तकातील कोणकोणत्या लेखक, कवींचे पत्ते उपलब्ध होतील याची यादी तयार केली. त्यात बाबाराव मुसळे, संदीप हरी नाझरे, शंकर कसबे, अशोक मानकर, उत्तम कोळगावकर, चित्रा सोहोनी, सुभाष किन्होळकर, डॉ. संजय ढोले, सुनंदा भावसार, मृणालिनी कानिटकर–जोशी या अनुक्रमे 'बाकी वीस रुपयांचे काय?', 'पण थोडा उशीर झाला', 'गचकअंधारी', 'या काळाच्या भाळावरती', 'दुखणं बोटभर', 'नात्याबाहेरचं नातं', 'धोंडा', 'थेंब आज हा पाण्याचा', 'माझी मराठी' या गद्य व पद्य पाठांच्या मान्यवर लेखक–कवींचे पत्ते फोन करून व प्रकाशन विश्व पुस्तकात शोधून तसेच परिचितांकडून मिळवले. नंतर विद्यार्थ्यांना या कवी, लेखकांपैकी एकाला पत्र पाठवण्यासाठी वहीत पत्र लिहिण्याचा स्वाध्याय दिला. विद्यार्थ्यांनी तो अतिशय आनंदाने पूर्ण केला. विद्यार्थ्यांनी लिहिलेली पत्रे पाहून आता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पत्र लिहायला दिल्यास ते लिहू शकतात असे वाटले. अर्थातच आता वेळ होती ती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पत्रलेखनासाठी पत्र देण्याची.



## कार्यवाही :

'मराठी भाषा गौरव दिना'च्या दरम्यान ही पत्रे लेखक–कवींना मिळू शकतील असे वाटले. दिवस होता... २० फेब्रुवारी, २०२३. शाळेत जातानाच पोस्टातून पोस्टकार्डे घेऊन गेलो. परिपाठानंतर वर्गात जाताच विद्यार्थ्यांना दिलेला स्वाध्याय तपासला. काही चुका असतील, तर त्या दुरुस्त करण्यासाठी मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना एकेका पोस्टकार्डाचे वाटप केले. त्यात स्वतःचा पत्ता, दिनांक, मायना, शेवट या बाबींची जागा दाखवून दिली आणि त्यांना पत्रलेखन करण्यासाठी वेळ दिला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने पत्रलेखन केले. पत्र लिहून झाले, की विद्यार्थी ते दाखवत आणि मी त्यांना संबंधित लेखक, कवींचे नाव व पत्ता लिहिलेला कागद देत असे. तो पाहून विद्यार्थी योग्य जागी पत्ता, पिन कोड लिहीत होते. अशा प्रकारे विद्यार्थ्यांची पत्रे लिहून पूर्ण झाली. रिकाम्या राहिलेल्या थोड्या जागेत त्यांनी लहानशी चित्रे काढली. शेवटी सर्वांची पत्रे गोळा करून त्यांचे फोटो काढले. 'आता आपण ही पत्रे पोस्टाच्या पेटीत टाकणार आहोत' असे सांगितले. शाळा सुटल्यावर जाताना पोस्टाच्या पेटीत पत्रे टाकली.

## मान्यवर लेखक, कवींचा प्रतिसाद :

पत्रे पोस्टाच्या पेटीत टाकल्यावर ही पत्रे त्यांना कधी मिळतील आणि त्यांचा प्रतिसाद कसा असेल? याचे शिक्षक म्हणून मला व पत्र लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांनादेखील खूप उत्सुकता होती. दरम्यान प्रसिद्ध कवी उत्तम कोळगावकर यांनी कळवले, की 'कु. वैशाली आदिनाथ हंडाळ या विद्यार्थिनीचे पत्र मिळाले. छान लिहिले आहे! तिला आशीर्वाद सांगा!' आणि कवयित्री सुनंदा भावसार यांनीदेखील 'एका मुलीने पाठवलेले पत्र मिळाले सर, कु. धनश्री वाघमोडे नाव आहे तिचे. शाळा हंडाळवाडी, पो. पाथर्डी, जि. अहमदनगर. तिला कळवाल का? पत्र मिळाले व छान लिहिले आहे. तिच्या गावात पाऊस अतिशय कमी पडतो व उन्हाळा कडक असतो. कवितेत दिलेली 'पाणी जपून वापरा' ही शिकवण तिला मोलाची वाटते असे तिने कळवले आहे.' हा प्रतिसाद ऐकून, वाचून विद्यार्थ्यांना आनंद

(पृष्ठ क्र. ७१ वर)

# विज्ञानकोडे सोडवूया, शास्त्रज्ञ बनूया...

**करुणा गावंडे-जांभुळकर**
जि. प. उच्च प्राथ. शाळा आर्वी,
ता. राजुरा, जि. चंद्रपूर.

*अनेक शिक्षक आपल्या शाळांमध्ये नवनवीन उपक्रम राबवत असतात. आर्वीच्या शाळेने 'विज्ञानकोडे सोडवूया' हा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांना दररोज शास्त्रज्ञ आणि त्यांचे शोध यांबाबतचे एक कोडे घालायचे. मुलांनी उत्तरे शोधून कोडे सोडवायचे ही यामागची कल्पना. मुलांनी जिज्ञासेतून, माध्यमांचा वापर करून उत्तरे शोधली आणि त्यांच्यात विज्ञानविषयी गोडी वाढली. या उपक्रमाची माहिती देणारा हा लेख.*

विद्यार्थ्यांचा स्वभाव हा मुळातच जिज्ञासू असतो. प्रश्न विचारणे हा गुण प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी उपजतच असतो. सभोवतालच्या घटकांबद्दल असलेले अज्ञान दूर करावे अशी इच्छा प्रत्येकाचीच असते. उत्सुकतेमधून काही प्रश्न तयार होतात. हे असेच का? आणि ते तसेच का नाही? यांचा मागोवा घेत आपण शंकांचे निरसन करतो किंवा तसे करण्याचा आपल्या परीने प्रयत्न करतो. शंकांचे निरसन होत असतानाच विद्यार्थ्यांना नवीन माहिती मिळते.

आजचे मानवी जीवन पूर्णपणे विज्ञानाने व्यापले आहे. आज विज्ञान व तंत्रज्ञानाशिवाय आपण मानवी जीवनाची कल्पनाच करू शकत नाही. आज प्रत्येक देशात विज्ञान हीच जात, विज्ञान हाच धर्म व विज्ञान हीच संस्कृती बनलेली आहे, म्हणूनच विज्ञानाचा अभ्यास, वैज्ञानिक दृष्टिकोन ही काळाची गरज आहे. निरीक्षण, प्रयोग व निष्कर्ष या शिस्तबद्ध संशोधन पद्धतींमधून अनेक वैज्ञानिक सत्ये जगासमोर आली आहेत. विज्ञानाचा उगम मानवी जिज्ञासेतून झालेला आहे. वस्तुनिष्ठ सत्याचा शोध घेणे हे विज्ञानाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. एखाद्या विषयाचा व्यवस्थित रीतीने केलेला अभ्यास, विश्वातील घटना व घडामोडी यांचे बुद्धिनिष्ठ, कार्यकारणधिष्ठित असे आकलन होण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या क्रिया व त्याचे फलित म्हणजेच 'विज्ञान कोडे सोडवूया, शास्त्रज्ञ बनूया...' हा माझा उपक्रम...

### उपक्रमाचा उद्देश :

(१) विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होऊन विज्ञानाची आवड निर्माण करणे.

(२) विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढवणे.

(३) विद्यार्थ्यांची निरीक्षण शक्ती व चिकित्सक वृत्ती विकसित करणे.

(४) शिक्षण प्रक्रिया आनंददायी व फलदायी करणे.

### प्रत्यक्ष कार्यवाही :

मी हा उपक्रम माझ्या शाळेत जानेवारी २०२२ पासून इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांकरिता सुरू केलेला असून तो आजतागायत सुरू आहे. प्रथमतः मी या उपक्रमाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली व या उपक्रमातून आपण काय साध्य करणार आहोत याची पूर्वकल्पना दिली. सर्व विद्यार्थ्यांनी उपक्रमासाठी एक नोंदवही तयार केली. पालकांनासुद्धा या उपक्रमाची पूर्वकल्पना देण्यात आली.

या उपक्रमासाठी मी व्हरांड्यातील एक ठिकाण निश्चित केले. तिथे ग्रीन बोर्ड लावला. शाळा सुटण्याच्या एक तास अगोदर मी सर्व विद्यार्थ्यांना नियोजित ठिकाणी बसवून घेत होते. विद्यार्थ्यांची जागा निश्चित केली असल्याने जागेसाठी कोणीही गोंधळ घालत नव्हते. मी दररोज ग्रीन बोर्डवर एक विज्ञानकोडे लिहून देते व त्याचे लयीत आदर्श वाचनसुद्धा करून दाखवते. सर्व विद्यार्थी नोंदवहीत विज्ञानकोडे लिहितात. घरी गेल्यावर त्याचे

चिंतन, मनन करून उत्तर शोधतात. अडचण वाटल्यास पालकांशी, भावंडांशी चर्चा करतात व कोड्याचे उत्तर स्पष्टीकरणासह वहीत लिहून आणतात.




दुसऱ्या दिवशी मी सर्वांना एकत्र बसवून न बघता कोड्याचे उत्तर स्पष्टीकरणासह जो विद्यार्थी चांगल्या प्रकारे सांगेल, त्या विद्यार्थ्याला एका शास्त्रज्ञाचे नाव देते व त्यांनी लावलेला शोध व शास्त्रज्ञाचा परिचय करून देते. इतक्या महान शास्त्रज्ञाचे नाव आपल्याला मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकतो आणि ते आनंदाने मी अमुक–अमुक शास्त्रज्ञ आहे म्हणून गावात मिरवतात. त्यामुळे गावातील लोकांनासुद्धा अनेक शास्त्रज्ञांचा परिचय झालेला दिसून येत आहे. रोज वेगवेगळ्या विद्यार्थ्यांना उत्तर देण्याची संधी दिली जाते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शास्त्रज्ञांची नावे मिळाली आहेत. अर्ध्या झोपेतही एखाद्या विद्यार्थ्याला विचारले, की तू कोणता शास्त्रज्ञ आहेस? तर तो त्याला दिलेल्या शास्त्रज्ञाचे नाव व शोध कार्य सांगेल. प्रत्येकाला तीन ते चार वेळा शास्त्रज्ञ बनण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या ज्ञानात भर पडत आहे. खरे पाहता शास्त्रज्ञांची नावे वाचायला, सांगायला कठीण असतात, तरीही मुलांना ती नावे इतकी पक्की पाठ झाली आहेत, की ते कधीच विसरणार नाहीत.

मुले सुरुवातीला केवळ पाठांतर करून उत्तरे सांगायची, नंतर कोड्याचे उत्तर स्पष्टीकरणासह सांगायला लागली आणि त्या पुढचा टप्पा म्हणून मी विद्यार्थ्यांना शास्त्रज्ञांविषयी माहिती शोधून, लिहून आणायला सांगितले व सादरीकरणाच्या वेळी शास्त्रज्ञांचा परिचय देणे अनिवार्य केले. यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मी पुढील टप्प्याकडे वळले; ते म्हणजे विद्यार्थ्यांना स्वतः कोडे तयार करायला सांगितले आणि प्रत्येक विद्यार्थी आपापल्या कुवतीप्रमाणे स्वतः कोडी तयार करू लागले. मी बऱ्याच विद्यार्थ्यांचे विज्ञानकोडे सादरीकरणाचे व्हिडिओ तयार करून YouTube, facebook वर अपलोड केले. त्यामुळे पालकांनासुद्धा आपल्या पाल्याची प्रगती बघता येऊ लागली व विद्यार्थ्यांमध्ये आपला व्हिडिओ तयार करावा ही चुरस निर्माण होऊन ते उत्तमोत्तम तयारी करून येऊ लागले. हा उपक्रम मी इयत्ता सहावी व सातवीच्या वर्गासाठी वर्षभर राबवला आणि आता हा उपक्रम संपूर्ण शाळेसाठी परिपाठाच्या वेळी राबवत आहे.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

(१) रोज नवनवीन विज्ञानकोड्याचा उलगडा केल्यामुळे विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाला व विज्ञान शिकण्याची जिज्ञासा जागृत झाली. (२) दर दिवशी नवनवीन शास्त्रज्ञ व त्यांचे शोध कार्य तसेच शास्त्रज्ञांचा परिचय झाल्याने विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढण्यास मदत झाली. (३) विज्ञानकोड्याचे निरीक्षणात्मक वाचन करून त्यावर चिंतन, मनन करून उत्तर शोधल्याने त्यांच्यातील निरीक्षण शक्ती व चिकित्सक वृत्तीचा विकास झाला. (४) या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंद मिळत असल्याने शिक्षणप्रक्रिया आनंददायी व फलदायी होण्यास मदत झाली. (५) विद्यार्थी स्वतः कोडे तयार करू लागल्याने, तसेच विविध संशोधकाची माहिती संकलित केल्याने त्यांची संशोधक वृत्ती वाढीस लागली. (६) रोज सर्वांसमोर स्पष्टीकरणासह कोड्याचे सादरीकरण केल्यामुळे त्यांच्यात सभाधीटपणा येऊन वक्तृत्व शैलीचा विकास झाला. (७) विज्ञानकोड्याचे वर्णन विद्यार्थी रोज लिहीत असल्याने कोणत्याही विषयावर लेखन करण्याची क्षमता निर्माण झाली. (८) वेगवेगळ्या शास्त्रज्ञांची माहिती स्वतः शोधल्यामुळे त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या व सर्जनशीलतेचा विकास झाला.

# माझा वर्ग : माझा उपक्रम

**आरती पाटील**
माई बाल विद्यामंदिर इचलकरंजी,
जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९०९६६५७९९५

*इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकात भेळ नावाची कविता आहे. या कवितेत मुरमुऱ्याची भेळ बनविण्याची कृती दिली आहे. कवितेच्या आशयाला कृतीची जोड दिल्याने पाठात मुले मनापासून रमली. मुलांनी पालकांच्या मदतीने भेळ बनवावी असे अपेक्षित आहे. सदरच्या शाळेत पौष्टिक अशी कडधान्यांची भेळ बनविली. या उपक्रमाची माहिती देणारा हा लेख.*

मनोरंजनातून शिक्षण, कृतियुक्त शिक्षण व विद्यार्थिकेंद्रित शिक्षण हे गुणवत्तापूर्ण ठरू शकते याची प्रचीती 'कडधान्यांची भेळ तयार करणे' या उपक्रमातून आली.

इयत्ता दुसरीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकात मंदाकिनी गोडसे या कवयित्रीची 'भेळ' ही कविता आहे. या कवितेत चुरमुरे वापरून भेळ कशी तयार केली जाते याचे सुंदर वर्णन केले आहे. वर्गात ही कविता शिकवत असतानाच शाळेच्या मुख्याध्यापिकांनी भेळ या पाठ्यांशाला अनुसरून कडधान्यांची भेळ तयार करणे हा पूरक उपक्रम सुचविला. मग काय मी लगेच तयारीला लागले. विद्यार्थ्यांना सांगितले, की आपण वर्गात भेळ तयार करायची आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने घरातून एक वाटी मूग घेऊन यायचे अशी सूचना दिली. दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी आणलेले मूग गोळा केले व वर्गातील मुलांचीच मदत घेऊन ते स्वच्छ निवडून घेतले व ते मूग विद्यार्थ्यांसमोरच मोठ्या पातेल्यात पाणी घेऊन भिजत घातले. बुधवारी शाळेत आल्यावर ते पातेले वर्गात आणले व त्यातील सर्व मूग एका चाळणीत काढून घेतले. त्या मुगाला मोड येण्यासाठी एका स्वच्छ पांढऱ्या कापडात बांधले. कडधान्यांना मोड कसे येतात हे प्रात्यक्षिक पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना अनुभवता आली. त्यादिवशी संध्याकाळी



शाळा सुटण्याच्या वेळी विद्यार्थ्यांना एक कांदा, एक टोमॅटो, कोथिंबीर, शेव आणण्याची सूचना दिली. गुरुवारी शाळेत येताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आज वर्गात भेळ करायची याचा खूप आनंद दिसत होता.

परिपाठ झाल्याबरोबर लगेच मुले वर्गात आली. विद्यार्थ्यांनी घरातून आणलेला कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, शेव गोळा केली व मोड आलेले मूग सर्व विद्यार्थ्यांना दाखवले. 'आता आपण या मोड आलेल्या कडधान्याची म्हणजेच मुगाची चटपटीत भेळ तयार करणार आहोत,' असे सांगताच वर्गात एकच जल्लोष झाला.



विद्यार्थ्यांच्या मदतीने कांदा, टोमॅटो, कोथिंबीर

बारीक चिरून घेतले. मोठ्या पातेल्यात मोड आलेले मूग घेतले. त्यामध्ये बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो विद्यार्थ्यांनी स्वतः मिक्स केले. त्यात शेव घातली. विद्यार्थ्यांनी कोथिंबीर मिक्स केली. त्यानंतर या भेळेमध्ये तिखट, चाट मसाला व चवीनुसार मीठ, साखर घालून मिक्स केले. शेवटी चिंचगूळ असलेले पाणी घालून भेळ तयार केली. चटपटीत भेळेवर आदिती व प्रतीकने लिंबू पिळले व चटपटीत, पौष्टिक अशी भेळ तयार केली.

कडधान्यांपासून तयार केलेली भेळ, तसेच पौष्टिक अन्नपदार्थ खाल्ल्यामुळे शरीराला कसा फायदा होतो हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. भेळ तयार झाल्यावर



मुलांनी भेळ ही कविता तालासुरात म्हटली व भेळेचा आस्वाद घेतला.

भेळ खाताना मुले खूप खुश होती. स्वतः तयार केलेला पदार्थ स्वतःच खाण्यात मजा येते. भेळ 'चविष्ट व चटपटीत झाली आहे.' 'टीचर भेळ खूप छान झाली आहे' अशा प्रतिक्रिया देत होती. प्रत्येक घासाबरोबर स्वनिर्मितीचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. विद्यार्थ्यांचे घडणे यापेक्षा वेगळे काय असते; म्हणूनच विद्यार्थी आपोआपच गुणगुणतात,

*ही आवडते मज मनापासुनी शाळा,*
*लाविते लळा ही, जशी माउली बाळा.*

**माझ्या या छोट्या उपक्रमातून साध्य झालेल्या गोष्टी :**

(१) भेळ या कवितेला पूरक असा उपक्रम राबवता आला.

(२) कृतियुक्त अध्ययन–अध्यापन घडले.

(३) कौशल्य विकसनाने विद्यार्थी आनंदी झाले. नकळत जीवनविषयक गरजा पूर्ण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली.

(४) विद्यार्थ्यांना स्वनिर्मितीचा आनंद घेता आला.

(६) कडधान्यांची भेळ ही पौष्टिक असते हे विद्यार्थ्यांना समजल्यामुळे, विद्यार्थ्यांनी घरी पण अशी भेळ तयार करून खाल्ली. त्यामुळे विद्यार्थ्यांना पौष्टिक पदार्थ खाण्याची सवय लागली.

---

**(पृष्ठ क्र. ६७ वरून)**

झाला. आणखीही पत्रांची उत्तरे येण्याची विद्यार्थी वाट पाहत आहेत.

**फलश्रुती :**

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पत्र कसे लिहितात ते समजले. पत्रलेखनाचा अनुभव मिळाला. आपणही पत्र लिहू शकतो हा आत्मविश्वास आला. आज पत्र पाठवण्यासाठी ई–मेल, व्हॉट्सअ‍ॅप यांसारखी माध्यमे उपलब्ध झालेली आहेत. पत्राच्या नमुन्याप्रमाणे पत्र लिहून किंवा टाईप करून आपण ते पोस्टाने, कुरिअरने, ई–मेलद्वारे आणि व्हॉट्सअ‍ॅपने पाठवू शकतो, हे विद्यार्थ्यांना समजले. प्रत्यक्ष पत्रलेखन व पत्र पाठवण्याची माध्यमे यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. पत्रलेखन हेही अभिव्यक्तीचे एक साधन आहे हे समजले.

# विद्यार्थियों के मानसिक विकास में शिक्षक की भूमिका

**डॉ. पूनम शिंदे**
राजर्षी शाहुनगर म.न.पा. हिंदी शाला, मुंबई.
**भ्रमणध्वनी** : ९८६९८७१०७९

*विद्यार्थियों की रुची खेल में अधिक होती है। इसलिए हँसते-खेलते, सिखने और सिखाने में नये तरीके अपनाने के लिए ये लेख पढ़ना जरुरी है।*

आदर्श शिक्षक वही है जो विद्यार्थियों के चारित्रिक,नैतिक व मानसिक विकास में सहायक होते हैं। बच्चों के प्रारंभिक शिक्षक उनके माता-पिता होते हैं, वे बच्चों को अच्छे संस्कार, आचार और विचारों से अवगत कराते हैं, जब छात्र विद्यालय में आते हैं, उनके मानसिक विकास में शिक्षक की महत्वपूर्ण भूमिका होती है। शिक्षा का मुख्य उद्देश्य छात्रों के मानसिक स्वास्थ्य को उत्तम बनाए रखना है, क्योंकि अच्छे मानसिक स्वास्थ्य के बिना छात्रों की योग्यता का सही विकास सम्भव नहीं है। जिन बच्चों में डर, निराशा, चिंता, अवसाद तथा अन्य दोषों का विकास हो जाता है, उनका मन पढ़ने में कभी नहीं लगता और सीखने की प्रक्रियामे उन्नति नही कर पाते।



बालकों के प्रति शिक्षक का व्यवहार नम्र और सहानुभूतिपूर्ण होना चाहिए। एक शिक्षक का व्यवहार अपने सभी छात्रों से निष्पक्ष और बिना किसी भेदभाव के होना चाहिए। विद्यालय में अनुशासन रखने में विद्यालय के शिक्षकों का विशेष योगदान होता है। अतः शिक्षकों को चाहिए कि वे बालकों में स्वअनुशासन को प्रोत्साहित करें, इसके साथ ही बालकों को उत्तरदायित्वपूर्ण कार्य सौंपकर विद्यालय के प्रशासन में सहयोगी एवं भागीदार बनाएँ।

शिक्षक को चाहिए की वे उपयुक्त शिक्षण विधियों का प्रयोग करे, जिससे छात्रों के मानसिक स्वास्थ्यपर गहरा प्रभाव पडे। उचित शिक्षण विधियों के अभाव में बालकों में अनेक प्रकार की मानसिक विसंगतियाँ, बुराइयाँ, अवसाद, कुण्ठा जैसी बीमारियाँ घर कर लेती हैं। जिससे उनका भावी जीवन प्रभावित होने लगता है। कक्षा स्तर को ध्यान में रखते हुए उपयुक्त और अनुकूल शिक्षण सूत्रों, युक्तियों, प्रविधियों एवं विधियों का प्रयोग करना चाहिए।

कुछ शिक्षक प्रायः विद्यार्थियों को इतना अधिक गृहकार्य देते हैं कि, उसे समयपर पूर्ण करना उनके सामर्थ्य से परे होता है। बालकोंद्वारा गृहकार्य को समय से पूर्ण न कर पाने के कारण वे दण्ड के भय से चिन्ताग्रस्त हो जाते हैं। और उनके अन्दर मानसिक तनाव पैदा होने लगता है। अतः शिक्षकों को चाहिए कि छात्रों को केवल इतना ही गृहकार्य दें कि वे सरलता से बिना किसी मानसिक तनाव के कार्य पूर्ण कर सकें । ऐसी मानसिक स्थिति उनके मानसिक स्वास्थ्य के लिए निश्चित रूप से सकारात्मक और हितकर सिद्ध होगी।

विद्यालय में शिक्षण के साथ ही अन्य विविध प्रकार के पाठ्य सहगामी क्रियाओं जैसे योगा, व्यायाम, खेलकूद, नृत्य, संगीत, गायन, वादन, अभिनय, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता कार्यक्रम इत्यादि का

आयोजन नियमित रूप से समय पर अवश्य करें। इस तरह के कार्यक्रमों को नियमित रूप से योजनाबद्ध रूप से करने से विद्यार्थियों के जन्मजात नैसर्गिक क्षमताओं, उनकी विशिष्ट रुचियों, मूल प्रवृत्तियों को अभिव्यक्त करने से उनके मानसिक स्वास्थ्य सकारात्मक तरीके से विकसित होता है।

शाला में विविध शैक्षिक गतिविधियों के साथ-साथ निर्देशन एवं उचित परामर्श की भी व्यवस्था होनी चाहिए। विद्यार्थियों को आनेवाली समस्याओं का तत्काल निराकरण कर, उन्हें उचित मार्गदर्शन देना चाहिए। सही समय पर दिया गया परामर्श और मार्गदर्शन विद्यार्थियों को मानसिक अवसाद से बचा सकता है। इसके साथ ही शिक्षक अपने छात्रों की आवश्यकता को ध्यान में रखते हुए अन्य क्रियाकलापों का आयोजन कर सकते है।

- सह पाठक्रम गतिविधियों का आयोजन
- अभिव्यक्ती की स्वतंत्रता
- अभिभावक अध्यापक संमेलन का आयोजन
- विद्यालय में स्वास्थ्य मेलों का आयोजन

एक शिक्षक का अपने विद्यार्थियों से प्रेमपूर्व किया गया व्यवहार छात्रों के मानसिक विकास का प्रमुख कारक होता है। यदि शिक्षक बाल-मनोविज्ञान जानकर छात्रों के साथ प्रेम, सहानुभूतिपूर्वक व्यवहार तथा उचित शिक्षण विधियों का प्रयोग करता है, तो बालक का मानसिक विकास अच्छी तरह से होता है। प्रत्येक छात्र की रूचि में अंतर होता है क्योंकि व्यक्तिगत भिन्नता के कारण सभी छात्र शारीरिक और मानसिक पहलुओं पर एक दूसरे से अलग होते हैं। उनकी सीखने की अपनी अलग जरूरतें होती हैं। अच्छे मानसिक स्वास्थ्य के बिना छात्रों का उचित विकास संभव नहीं हैं।

विद्यालय का उत्साहवर्धक वातावरण विद्यार्थियों के मानसिक स्वास्थ्य पर भारी प्रभाव डालता है। यदि विद्यालय में छात्र सुरक्षित अनुभव नहीं करते हैं, तो उनके मन में मानसिक भय बना रहता हैं अतः उनके स्वास्थ्य पर बुरा प्रभाव पडता है।

दोषपूर्ण परीक्षा प्रणाली पर भी बालकों का मानसिक स्वास्थ्य निर्भर करता है। यदि परीक्षा प्रणाली ऐसी है, जिससे छात्रों की योग्यता का सही पता नहीं लगता। ऐसे वातावरण में छात्र अपने को समायोजित नहीं कर पाते, तो उनका मानसिक स्वास्थ्य बिगड़ने लगता है।

सारांश रूप में यह कह सकते है कि, आज की शिक्षाप्रणाली विद्यार्थिकेंद्रित है। आज के विद्यार्थियों को समझने और समझाने की एक चुनौतीपूर्ण जिम्मेदारी शिक्षकों पर है। शिक्षक हर युग में अपने छात्रों का मार्गदर्शन करते आये हैं और आगे भी करते रहेंगे। प्राचीन समय में जब गुरुकुल में विद्यार्थी शिक्षा ग्रहण करते थे, तब से लेकर आजतक जब करोना काल में छात्रों ने ऑनलाईन शिक्षा प्राप्त की है, प्रत्येक संक्रमण काल में शिक्षक ने परिस्थितियों से तालमेल बनाते हुए अपने छात्रों का मार्गदर्शन किया है। 'शिक्षक साधारण नहीं होता, प्रलय और विनाश उसकी गोदी में खेलते हैं।' चाणक्यद्वारा कहा गया यह वाक्य पूर्णतः हर युग के लिए सत्य है। वर्तमान समय की प्रत्येक घटनाओं का साक्षी है आज का विद्यार्थी। उनके मानसिक स्तर को समझते हुए उनके लिए क्या सही है, इस पर ध्यान देते हुए उनका योग्य तरह से विकास करना नितांत आवश्यक है। छात्रों के मानसिक स्वास्थ्य को संभालने की जिम्मेदारी एक शिक्षक की ही होती है। मेरी कक्षा का एक छात्र जो की बहुत ही होशियार था, वार्षिक परीक्षा में हमेशा ही प्रथम आता था, सभी शालेय उपक्रमों में सक्रिय भूमिका निभाता था और अचानक से उसने कक्षा

की किसी भी गतिविधि में भाग लेना बंद कर दिया। मुझे उस विद्‌यार्थी का ऐसा व्यवहार बड़ा आश्चर्यजनक था। मैंने उसके दोस्तों से जानने की कोशिश की तब भी कुछ पता नहीं चल पा रहा था। पालक से संपर्क करने पर पता चला की उसके पिता की आकस्मिक मृत्यू के कारण घर में आर्थिक तंगी का संकट चल रहा था। उसकी माँ दूसरों के घर में काम करने लगी थी, पर घर खर्च के लिए पर्याप्त पैसे न जुटा पाने के कारण घर का माहौल कलहपूर्ण हो गया था, और इन्ही समस्याओं के कारण छात्र के वर्तन में परिवर्तन दिखाई दे रहा था। स्वयंसेवी संस्थाओं की मदत से उसके खाने–पीने का अच्छा इंतजाम किया। शाला के मुख्याध्यापक और शिक्षकों की मदत से आर्थिक सहायता प्रदान कि गयी। रोज उस छात्र से व्यक्तिगत संपर्क बनाते हुए उसे निरंतर पढ़ने के लिए और खेलकूद में सहभाग देने के लिए प्रोत्साहित किया गया। धीरे–धीरे मैने पाया कि, छात्र का व्यवहार पहले की तरह सामान्य होने लगा है। वो अब फिर से घुलने–मिलने लगा है, अपने दोस्तों से और शिक्षकों से भी।

अगर समय रहते हम अपने निरीक्षणशक्ती का प्रयोग कर छात्रो में होनेवाले असामान्य व्यवहार को समझ पायें और उसे उचित मार्गदर्शन दे पायें तो बहुत से छात्रों को अवसाद ग्रस्त होनेसे बचा सकते हैं। हमें आनेवाली पीढ़ी के लिए बहुत सजग रहते हुए उचित मार्गदर्शन देने की आवश्यकता है।

### खेल–खेल में सीखें :

शिक्षा का मुख्य उद्‌देश्य विद्‌यार्थियों का सर्वांगीण विकास करना है। छात्र नियमित रूप से विद्‌यालय में आएँ, उनकी रूचि बनी रहे और सभी को सीखने का समान अवसर मिले। कक्षा में विद्‌यार्थी आनंद के साथ पढ़ाई करें; इस पर हमेशा शिक्षक का ध्यान रहता है। शिक्षण पद्‌धति अगर नीरस और उबाऊ हुई तो छात्र कुछ भी सिखना नहीं चाहते। जहाँ मेरी कक्षा के कुछ छात्र वाचन और लेखन बहुत ही उत्साह के साथ करते थे, तो वहीं कुछ छात्रों में वाचन, लेखन के प्रति उदासीनता भी मैंने महसूस की। शिक्षण प्रक्रिया प्रभावशाली तभी हो सकती है जब कक्षा का प्रत्येक छात्र उसमें सहभागी हो। इस विषय पर मैंने अपने अन्य शिक्षक सहयोगियों से भी चर्चा की तो पाया कि वे भी इसी तरह की समस्या पर चिंतन कर रहे हैं। हम सभी ने आपसी चर्चा के द्‌वारा कक्षा स्तर पर कुछ नाविन्यपूर्ण उपक्रमों को कार्यान्वित करने का प्रयास किया।

मेरी कक्षा (आठवीं) में मैने भाषाई कौशल्य विकसित करने के उद्‌देश्य से कुछ नये प्रयोग किए। बाल मानसशास्त्र के अनुसार भी छात्रों को हमेशा कुछ नया करना अच्छा लगता है।

### उद्‌देश्य :

- छात्र हँसते–खेलते सीखें।
- कक्षा में आनंददायी वातावरण की निर्मिति करना

### उपक्रम कि आवश्यकता :

- खेल–खेल में वाचन–लेखन क्षमता का विकास करना।
- छात्रों में रूचि के साथ सीखने का अभ्यास विकसित करना।
- मनोरंजन के साथ ज्ञानार्जन करना।
- छात्र स्वयं करके सीखें इस तरह का कौशल्य विकसित करना।
- कक्षा में सभी छात्रों का सहभाग हो ऐसे वातावरण का निर्माण करना।

### अलबम का निर्माण :

छात्रों में वाचन–लेखन क्षमता विकसित हो इसलिए मैंने एक अलबम बनाने का प्रस्ताव रखा। जिसमें अलग–

अलग लेखकों और कवियों के विषय में जानकारी तथा उनसे संबंधित तस्वीरों का संग्रह करने के लिए कहा गया। कक्षा के छात्रों को दस–दस के चार समूह में बाँट दिया गया। अब छात्र इंटरनेट से या किसी भी पुस्तकालय से जानकारी इकट्ठा करने लगे। जिन विद्यार्थियों को वाचन में रुचि थी उन्होंने विभिन्न साहित्यकारों के संबंध में जानकारी संग्रह की परंतु जिन्हें वाचन में रूचि कम थी या नहीं थी वे भी अन्य विद्यार्थियों को देखकर संग्रह कार्य में लग गये। जो छात्र जिस किसी भी लेखक, कवि से संबंधित जो कुछ भी जानकारी एकत्रित करके ले आता उसे कक्षा में सभी के सामने पढ़ कर सुनाने का अवसर दिया जाता। मैंने पाया कि कुछ ही दिनों में कक्षा का माहौल बदल गया। छात्र एक–दूसरे से चर्चा करने लगे। रोज नये–नये साहित्यकारों से संबंधित जानकारी से अवगत होने लगे। छात्र इस कार्य में अपने माता–पिता, भाई– बहनों की मदद लेने लगे। जो छात्र वाचन में कमजोर थे, वे भी पढ़ने का प्रयास करने लगे। मेरी कक्षा के विद्यार्थियों ने बहुत कम समय में ही एक सुंदर अलबम का निर्माण कर लिया।

## खेल और खिलाड़ी :

विद्यार्थियों की रुचि खेल में अधिक होती है। मैंने अक्सर देखा कि छात्र ज्यादातर कुछ गिने– चुने खेल ही खेलते हैं; जैसे– क्रिकेट, कबड्डी, खो–खो जैसे खेलों के अलावा दूसरे खेलों में उनकी रूचि नहीं है। इसका मुख्य कारण यह भी था कि उन्हें दूसरे खेलों के विषय में जानकारी ही नहीं थी। छात्रों को समाचारपत्र पढ़ने का अभ्यास हो, इसलिए मैंने उन्हें खेल जगत से संबंधित समाचारपत्र की कतरनों का संग्रह करने का निर्देश दिया। छात्र अब रोज ही समाचारपत्र पढ़ते और उसकी कतरनें अपनी कापी में चिपकाते। निरंतर ऐसा करने से उनमें समाचारपत्र पढ़ने की आदत का विकास हुआ। खेल जगत से संबंधित बहुत से खेल जैसे: फुटबॉल, हॉकी, टेनिस, बैडमिंटन, तैराकीआदि की जानकारी प्राप्त होने लगी।

कक्षा में दो समूह बनाकर खिलाड़ी और उनके द्वारा खेले जाने वाले खेलों से संबंधित खेल का आयोजन किया। कक्षा को दो समूह में विभाजित करके एक समूह के पास खिलाड़ियों के नाम की पर्ची तो दूसरे समूह के पास खेल के नाम की पर्ची दी गयी। पहले समूह का एक छात्र खिलाड़ी का नाम पुकारता तो दूसरे समूह का विद्यार्थी उस खिलाड़ी द्वारा खेले जाने वाले खेल की पर्ची दिखाता और इस तरह खिलाड़ी और खेल की जोड़ी बना लेते थे। इससे छात्रों को खेल और उससे संबंधित खिलाड़ियों की जानकारी होती गयी।

## मुहावरों और कहावतों के खेल :

विद्यार्थियों को मुहावरे और कहावतें अच्छी तरह से याद हों, वे उनके अर्थ जानकर उनका वाक्य में प्रयोग कर सकें, इसलिए मैंने मुहावरों और कहावतों से चित्र के पोस्टर बनाकर इस संकल्पना को स्पष्ट किया। कक्षा में चार समूह बनाए; जैसे : एक समूह को नाच न जाने आँगन टेढ़ा इत्यादि मुहावरों अथवा कहावतों के चित्र दिए गए थे। दूसरे समूह के पास उन मुहावरों, कहावतों की लिखित पट्टियाँ दी गयी थीं। तीसरे समूह को उन मुहावरों का अर्थ बताना होता था और चौथे समूह को उन मुहावरों अथवा कहावतों का वाक्य में प्रयोग करना होता था। इस तरह से कक्षा के सभी विद्यार्थी एक साथ सहभागी होकर मुहावरों और कहावतों को चित्र के माध्यम से उनके अर्थ और वाक्य में उनके प्रयोग को आसानी से सीख गए। अब कक्षा के सभी विद्यार्थी ऐसे उपक्रमों में आनंद के साथ हिस्सा लेने लगे। इसे एक उत्सव के रूप में आयोजित करने लगे।

## शुभकामना पत्र का लेखन :

हमारा देश उत्सव प्रिय देश है। यहाँ अक्सर कोई न कोई त्योहार जरूर होता है। विद्यार्थियों में लेखन क्षमता का विकास करने के उद्देश्य से उन्हें लेखन का अभ्यास हो और वे सुन्दर अक्षरों में कुछ अच्छा लिख सकें। विद्यार्थियों को आने वाले त्योहारों; जैसे– दीपावली, नवरात्रि, होली, ख्रिसमस, मकरसंक्रांति इत्यादि अवसरों पर सुंदर–सुंदर भेटकार्ड बनाकर उस पर स्वयं शुभकामना संदेश लिखें और अपने मित्रों अथवा रिश्तेदारों को भेटस्वरूप दें। इस उपक्रम में भी मेरी कक्षा के सभी बच्चे सहभागी होने लगे।

इस तरह से नये–नये उपक्रमों के आयोजन करने से मेरी कक्षा के विद्यार्थियों की उपस्थिति बढ़ने लगी। सभी छात्रों का सहभाग होने से शिक्षण प्रक्रिया प्रभावी हो गयी।

## घोष वाक्य स्पर्धा का आयोजन :

कक्षा में महापुरुषोंकी जयंती और स्मृति दिवस पर उनके द्वारा कहे गए सुविचार अथवा घोषवाक्य बोलने का आयोजन कर विद्यार्थियों को महापुरुषों से संबंधित जानकारियों का संग्रह करने के लिए प्रोत्साहित किया, जिससे वे उत्साह के साथ संग्रहित जानकारी पर बोल सकें। कक्षा में हिंदी दिवस, संविधान दिवस, विश्व हिन्दी दिवस, बालदिवस, युवा दिवस, वाचन प्रेरणा दिन, बालिका दिवस, विज्ञान दिवस और मराठी भाषा दिन मनाने के साथ ही विद्यार्थियों में जागरूकता लाने की दृष्टिकोन से पानी बचाओ, जल संरक्षण, वन संरक्षण, कन्या शिक्षण, तंबाखू मुक्त परिसर और प्लास्टिक बंदी आदि जैसे समसामयिक विषयों पर विद्यार्थियों को जानकारी का संग्रह करने और उस पर कुछ बोलने के लिए प्रोत्साहित किया। इस तरह के कार्यक्रमों में उनके अभिभावकों को भी आमंत्रित किया गया, जिससे वे अपने पाल्य की प्रगति को स्वयं देखें। शाला में कार्यरत शिक्षकों के सहयोग से यह सभी उपक्रम करने में बहुत आनंद आया।

## मेरे विद्यार्थी मेरी जिम्मेदारी :

प्रत्येक शिक्षक का यह कर्तव्य है कि वे अपने विद्यार्थियों की आवश्यकता को समझकर उस तरह उपक्रमों को कक्षा स्तर अथवा शाला स्तर पर कार्यान्वित करें। इस तरह के उपक्रमों से विद्यार्थियों में सीखने की क्षमता का विकास ज्ञानरचनावाद के माध्यम से स्वयं ही होता है। शिक्षक एक मार्गदर्शक के रूप में विद्यार्थियों को स्वतः सीखने का अवसर प्रदान करते हैं। भाषा की कक्षा में भाषाई खेलों का आयोजन शिक्षण को समृद्ध एवं प्रभावशाली तथा स्थाई बनाने में मदद करता है, साथ ही विद्यार्थियों में मूल्यशिक्षण और जीवन कौशल्य का विकास भी करने में महत्वपूर्ण भूमिका निभाता है।

इन उपक्रमों के आयोजन से एक खास बात यह देखने को मिली कि प्रत्येक छात्र इनमें सम्मिलित होने लगा तथा उनमें कुछ नया करने की सोच विकसित होने लगी। ऐसे उपक्रमों के बारे में समय–समय पर अभिभावकों को जानकारी देते हुए उन्हें भी सम्मिलित किया गया। पालक भी ऐसे उपक्रमों से परिचित होकर अपने बच्चों को प्रोत्साहित और प्रेरित करने लगे। शालाके मुख्याध्यापक और सहयोगी शिक्षकोंका भरपूर सहयोग मिलने के कारण मै यह उपक्रम पूर्ण कर पायी।

# शब्दकोडे

नंदा कुलकर्णी – भ्रमणध्वनी : ९०२८३४२७०४

पुढे दिलेल्या सूचक शब्दांवरून अपेक्षित शब्द लिहा. गोलातील अक्षरे क्रमाने एकापुढे एक लिहा. तुम्हांला सापडेल ........................

नमुना – (स) [खा] मित्र

१) ◯ □ □ □ □ विनवणी करणे.

२) □ ◯ □ वाळवंटाचे नाव

३) ◯ □ □ □ □ □ एक पदवी

४) □ ◯ एका प्राण्याचे नाव

५) ◯ □ □ □ संगीतातील एक राग

६) □ ◯ □ □ वादळ

७) □ □ ◯ मंद लाटा

८) □ ◯ □ मांजर

९) ◯ □ □ □ □ आकर्षक

१०) □ ◯ □ □ चर्चा

११) □ ◯ □ □ तुरुंग

१२) □ □ □ ◯ महाभारतातील एक व्यक्तिरेखा

१३) □ ◯ □ □ महादेव

१४) ◯ □ विवाह समारंभातील एक विधी

◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯ ◯

# मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या योजना

डॉ. द. वि. चिक्करमने

जीवन शिक्षण अंक जानेवारी – १९६० मधील लेख

**(जीवन शिक्षण मार्च २०२३ मधून पुढे चालू)**

राष्ट्रीय दिन तीन समजले जातात. (१) १५ ऑगस्ट–स्वातंत्र्यदिन (२) २ ऑक्टोबर–गांधीजयंती (३) २६ जानेवारी–प्रजासत्ताक–दिन. सर्व शाळांनी करावयाचे हे तीन कृती–नमुने होतील. या कृती–नमुन्यांचा उपयोग मुलांच्या मनांमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण करणे हा आहे. यांपैकी प्रत्येक कृती–नमुन्याचे वेळी मुलांकडून खूपच कार्यक्रम करून घेता येतील. सजावट, ध्वजारोहण, सभा, व्याख्याने, सामुदायिक भोजन, खेळ आणि नाटके वगैरे. राष्ट्रीय महत्त्व असलेल्या या तीनही दिवशी हस्तलिखित नियतकालिकांचे खास अंक प्रकाशित करता येतील. १५ ऑगस्ट निमित्त स्वातंत्र्य लढ्याचा अभ्यास करता येईल. २ ऑक्टोबरप्रसंगी ग्रामोद्धार–ग्रामीण समस्या यांचा ऊहापोह करता येईल. २६ जानेवारीच्या वेळी लोकशाही पद्धती, लोकशाहीत नागरिकांची जबाबदारी इत्यादी प्रश्नांचा खल करता येईल, या तिन्ही दिवशी जी नाटके सादर करता येतील, ती भारतीय इतिहासातील उज्ज्वल प्रसंगांचे दर्शन घडविणारी असतील. वरच्या वर्गातील मुले नाटके बसवतील. खालच्या वर्गातील मुले संवादात भाग घेतील, साभिनय गीते म्हणतील, ग्रामीण नृत्ये करतील आणि गोष्टींचे नाट्यीकरण करतील.

या तीन राष्ट्रीय दिनांबरोबरच वीरपुरुष, राष्ट्रीय नेते, लेखक, कवी, शास्त्रज्ञ इत्यादींच्या जयंत्या साजऱ्या करता येतील. ही गोष्ट स्थानिक परिस्थितीवर अवलंबून राहील. १४ नोव्हेंबर रोजी पंडितजींची जयंती असते आणि तो दिवस देशभर 'बालदिन' म्हणून साजरा करण्यात येतो. शिवजयंती, टिळकजयंती, टागोरजयंती वगैरे जयंत्या साजऱ्या करणे अगत्याचे आहे. कोणते दिन अगर जयंत्या साजऱ्या करावयाच्या हे शाळेच्या मर्जीवर राहील. राष्ट्रीय दिनोत्सव ज्या पद्धतीने आपण साजरे करतो, त्या धर्तीवरच या जयंत्या साजऱ्या करावयाच्या आहेत. जयंत्यांच्या दिवशी सभा होतील व त्या दिवसाचे महत्त्व सांगितले जाईल. वरच्या वर्गातील मुले नाटक करतील, खालच्या वर्गातील मुले साभिनय गीते म्हणतील, गोष्टीचे नाट्यीकरण करतील आणि त्या दिवसाची वैशिष्ट्ये दाखविणारा हस्तलिखित नियतकालिकाचा खास अंकही प्रकाशित करण्यात येईल.

स्थानिक यात्रा, उत्सवांनाही कृती–नमुना म्हणून राबविता येईल. उदा., गणेशचतुर्थी, दिवाळी, रामनवमी, कृष्णाष्टमी, नागपंचमी, रक्षाबंधन वगैरे. या धार्मिक उत्सवांना ऐतिहासिक महत्त्व आहे. ते महत्त्व उत्सव साजरा करताना मुलांच्या लक्षात आणून देता येईल. सभा, चर्चा, नाटके, साभिनय गीते, सजावटी, सामुदायिक भोजने इत्यादी सर्व या उत्सवांतील कार्यक्रम असू शकतील. हे उत्सव वर्गनिहाय साजरे केले जाणार नाहीत, तर शाळेमार्फत साजरे केले जातील. तथापि प्रत्येक वर्गाची बौद्धिक कुवत लक्षात घेऊन त्या त्या वर्गामार्फत वेगवेगळे कार्यक्रम साजरे करण्यात येतील, कोणते कार्यक्रम निश्चित करावयाचे, हे त्या त्या वर्गाच्या शिक्षकांनी ठरवायचे आहे, कारण कार्यक्रमाचा संबंध अभ्यासक्रमाशी असला पाहिजे.

सहली, भेटी वगैरे हा एक वेगळ्या प्रकारचा कृतिनमुना आहे. आपणा 'आपल्या सभोवताली थोडे पाहू या' हे शीर्षक या कृती–नमुन्याला देता येईल. मुले सभोवतालच्या निसर्गाचे दर्शन घेतील आणि तो

माणसाच्या उपयोगी कसा पडतो, याचेही मर्म जाणून घेतील. हे करीत असताना त्यांना त्या विभागातील वनस्पती आणि प्राणी यांच्या जीवनाचा व विद्युत शक्ती, कारखाने, गिरण्या इत्यादी भौतिक साधनांचा अभ्यास करावा लागेल. या कृती-नमुन्याचा एक भाग म्हणून शेती व स्थानिक उद्योगधंदे यांकडे लक्ष पुरवावे लागेल. या कृती-नमुन्याची साद्यंत आखणी मुले करतील. पंचायती, दवाखाने, पोस्ट ऑफिसेस, त्याचप्रमाणे नद्या, कालवे आणि गावातील दिवा-बत्तीची सोय इ. सामाजिक संस्थाचा व प्रश्नांचा अभ्यास मुलांनी करणे क्रमप्राप्त होईल. शालेय आरोग्य व्यवस्थेची ग्रामीण आरोग्य-व्यवस्थेशी सांगड घालता येईल. ज्याअर्थी हे कृती-नमुने स्थानिक परिस्थितीवर अवलंबून राहणार आहेत, त्याअर्थी त्यांची तपशीलवार माहिती येथे देणे विशेष गरजेचे आहे, असे नाही. स्थानिक उद्योगगृहांना भेटी देणे, त्याचप्रमाणे शेतीकेंद्रांना भेटी देणे या गोष्टी शैक्षणिकदृष्ट्याही मौलिक आहेत.

उद्योगांतून निर्माण होणाऱ्या काही थोड्या कृतिनमुन्यांकडे आता आपण वळू. उद्योगाच्या शिक्षणातून फार मोठी शैक्षणिक मूल्ये असलेले अगणित कृतिनमुने आपणास मिळू शकतील. पहिली व दुसरी या इयत्तांत मातीकाम, कागदकाम व बागकाम यांसारखे करावे लागणारे अत्यंत साधे उद्योगाचे काम उदाहरणादाखल घेऊ. हे काम कृतिनमुन्यांच्या स्वरूपात करता येईल. मुले कागदाच्या लगद्यापासून अगर मातीपासून फळे, प्राणी इ. नमुने करू शकतील. इ. तिसरी व चौथी मध्ये उद्योगापासून जी किमान अपेक्षा केली आहे, ती कृतिनमुन्याच्या स्वरूपात घेता येते. तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना एकच कृतिनमुना घेता येईल. वर्गासाठी संतरजी तयार करणे हा तो कृतिनमुना असेल. वर्गात बैठकीची जी गैरसोय आहे त्यामुळे सतरंजी करण्याला मुलांना प्रेरणा मिळेल. मग मुले वर्गासाठी सतंरजी करण्यास तयार होतील किंवा आसने करण्यास तयार होतील. ताबडतोब त्यांची आखणी सुरू होईल. आखणी होताच मुले कामास लागतील व झटदिशी कृतिनमुना तयार होईल. त्यांना बसावयास आसने मिळतील. त्यांना आपल्या कर्तबगारीचा अभिमान वाटेल. इयत्ता पाचवी, सहावी व सातवी यांतील कताई-विणकाम या बाबतीतही वेगवेगळ्या, पण संपूर्ण असलेल्या कृतिनमुन्यांची मालिका तयार करता येईल. पाचवीतील मुलगा आसन विणेल. सहावीतील मुलगा टॉवेल काढील व सातवीतील मुलगा शर्ट व विजार यांसाठी ४ वार कापड विणेल. मुलींच्या बाबतीत देखील असेच स्वतंत्र कृतिनमुने घेता येतील. पाचवीतील मुली गळ्यात बांधावयाचा रुमाल विणतील. सहावीतील मुली 'पुलओव्हर' तयार करतील. शेती-मूलोद्योगांतही पुऱ्या होणाऱ्या कामाच्या अपेक्षा निश्चित केल्या आहेत. तिसरी, चौथीतील मुले बागेतील छोट्या छोट्या वाफ्यांवर कामे करतील आणि इयत्ता पाचवी, सहावी व सातवी मधील मुले अन्नधान्य किंवा कापूस किंवा ऊस अशी पिके निघणाऱ्या शेतात कामे करतील. पुठ्ठाकाम आणि लाकूडकाम यांतील कामाचीही किमान मर्यादा ठरली गेली आहे. या कामांतून निरनिराळे स्वतंत्र कृतिनमुने तयार करता येतील. इयत्ता तिसरी, चौथी ची मुले पुठ्ठ्यांच्या फाईल्स तयार करतील आणि इयत्ता पाचवी, सहावी व सातवी मधील मुले क्रमाक्रमाने अवघड व कौशल्यपूर्ण वस्तू तयार करतील.

काही लोकांना वाटते, उद्योगाचे काम नीरस व शैक्षणिक मूल्यरहित आहे; पण हे खरे नाही. आपण शाळेत उद्योग कसा शिकवतो, यावर हे सर्व अवलंबून आहे. उद्योगाचे नीरस, यांत्रिक आणि कंटाळवाणे काम सरस, क्रियापूर्ण, उत्साहवर्धक आणि शैक्षणिक मूल्ये असलेलेही करता येईल. मात्र हे साध्य होण्यासाठी त्याचे

रूपांतर मुलांना हाताळता येईल, अशा कृतिनमुन्यात करता आले पाहिजे. अंकगणित, शास्त्र व भूगोल यांतील बराचसा भाग उद्योगाशी समवाय साधून शिकवता येईल किंवा शिकता येईल, हे वेगळे सांगण्याची काही जरूरी नाही. हे विषय शिकविण्याचे उद्योग हे एक प्रभावी साधन आहे. याप्रमाणे उद्योगाचे अध्यापन आनंददायक व फायदेशीर करता येईल. मग ते नीरस, कंटाळवाणे व यांत्रिक वाटणार नाही.

वर वानगीदाखल थोडेसे कृतिनमुने दिले आहेत. विस्तृत प्रमाणावर कृतिनमुने दिलेले नाहीत. कारण शिक्षकांनीच कृतिनमुन्यांचा विचार करून शाळेच्या वार्षिक कामाचे नियोजन केले पाहिजे. हे नियोजन शालेय वर्षाच्या सुरुवातीलाच केले पाहिजे. शालेय वर्षात निरनिराळ्या महिन्यांत कोणकोणते कृतिनमुने घ्यायचे याचा आराखडा शिक्षकांनी तयार केला पाहिजे. चांगल्या प्रकारे कृतिनमुन्यांचा आराखडा तयार करून त्याचा अभ्यास करून तो कार्यवाहीत आणला पाहिजे. बौद्धिक विषयांशी या कृतिनमुन्यांचा समवाय कसा साधावयाचा, किंवा बौद्धिक विषय शिकविताना या कृतिनमुन्यांचा कसा उपयोग करून घ्यायचा, हे शिक्षक विचारपूर्वक ठरवतील. अनुभवाने कृतिनमुन्यांत सुधारणा जशा करू शकतील, त्याप्रमाणे त्यांचा विस्तारही करू शकतील. काहीही असो, पुस्तकांच्याद्वारे शिकवायची जी नीरस पद्धती सध्या चालू आहे, तिच्याऐवजी कृतिनमुन्यांच्या माध्यमांतून शिकविण्याची पद्धती सुरू केली पाहिजे, कारण पुस्तकाच्याद्वारे शिकविताना मुलांची जीवनापासून फारकत होते. मुलांचा जीवनप्रसंगांशी संबंध आणून त्याद्वारे शिक्षण देण्याचे कार्य कृतिनमुन्यामुळे साधते.

## • जीवन-शिक्षणावरील विचार :

**शिक्षणाची बदलती कल्पना :** शिक्षण हे समाजशास्त्रच आहे आणि ते समाजाच्या गरजांवर अवलंबून आहे. समाज आणि त्याच्या गरजा यांत जसजसा बदल होत जातो, तसतशी शिक्षणाची कल्पनाही बदलत जाते. झपाट्याने बदलत असलेल्या समाजरचनेत शिक्षणाची कल्पना स्थिर राहू शकत नाही. तिचे स्वरूप समाजरचनेनुसार पालटत जाते. स्वातंत्र्यपूर्वकालात जी शिक्षणपद्धती रूढ होती, ती स्वातंत्र्यसंपादनानंतर योग्य ठरेनाशी झाली. तीत योग्य ते बदल करणे, ही एक आवश्यक बाब झाली. तद्वतच मानसशास्त्राची जसजशी प्रगती होत जाईल तसतसे त्या प्रगतीच्या अनुरोधाने शिक्षणविषयक कल्पनांमध्ये बदल घडवून आणणे क्रमप्राप्त होईल. शिक्षणविषयक रूढ कल्पना काय होती आणि हळूहळू तिच्यात कसा बदल होता चालला आहे, याचे विवरण या प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

पुस्तके वाचणे, परीक्षा पास होणे ही होती शिक्षणविषयक रूढ कल्पना! परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे हे शिक्षणाचे ध्येय समजले जात होते. ध्येयपूर्तीसाठी पुस्तकांचा कीस पाडणे हा उत्तम मार्ग समजला जात होता. सामान्यतः शाळा या ज्ञान विक्रीची दुकानेच बनल्या होत्या. मुलांनी पुस्तकी किडे बनावे म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले जात होते. खेळ, नाट्य इत्यादी इतर शालेय कार्यक्रमात भाग घेण्यासाठी मुलांना उत्तेजन मिळत नसे. एवढेच नव्हे, तर उलटपक्षी मुलांना निरुत्साही केले जात असे, कारण खेळ, नाट्य वगैरे गोष्टी या अभ्यासक्रमाबाहेरील गोष्टी समजल्या जात असत. या गोष्टी करण्यात जर मुलांनी वेळ घालवला, तर त्यांचे मुख्य अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष होईल आणि अर्थातच त्याचा परिणाम परीक्षेवर होईल, असे शाळाचालकांना प्रामाणिकपणे वाटे. अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे पुस्तके वाचणे व परीक्षा पास होणे, एवढाच समजला जात असे.

अशा प्रकारच्या शिक्षणपद्धतीचा विद्यार्थ्यांवर

कोणता परिणाम होईल, हे सांगावयास नकोच. परीक्षा अवघड व गुंतागुंतीच्या बनल्या. परीक्षेसाठी घातलेले प्रश्न कैक वेळा गोंधळात पाडणारे असत. अर्थातच या परीक्षांमध्ये नापास होणाऱ्यांची संख्या वाढत चालली. मोठमोठ्या परीक्षांमध्ये नापासांचे प्रमाण ६० ते ७० टक्के इतके असे. परीक्षांना आगळे महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे येनकेन प्रकारेण परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नाना प्रकारचे भलेबुरे मार्ग शोधण्यात आले. ज्या गोष्टींचा परीक्षेशी संबंध नाही किंवा परीक्षेत ज्यामुळे हमखास उत्तम प्रतीचे यश मिळणार नाही, त्या गोष्टी दुय्यम दर्जाच्या ठरल्या गेल्या किंवा शालेय कामात त्यांना अत्यंत खालच्या दर्जाचे लेखले जाऊ लागले. अशा प्रकारचे शिक्षण घेऊन बाहेर पडणारे लोक फक्त बौद्धिक स्वरूपाचे लिखापढीचे, कचेरीतील कारकुनी काम करण्याच्या लायकीचे ठरू लागले.

अशा प्रकारचे शिक्षण ज्यांनी घेतले, त्यांनी श्रमाच्या कामातील कौशल्य कधीच संपादन केले नाही. एवढेच नव्हे तर, उलटपक्षी श्रमाच्या कामांविषयी त्यांच्या मनात तिरस्कार निर्माण झाला. त्यांना घरी किंवा अन्यत्र श्रमाची कामे करावयाची लाज वाटू लागली. असली कामे सुशिक्षित माणसाने करणे, हे योग्य नव्हे आणि प्रतिष्ठेला शोभणारेही नव्हे असा त्यांचा समज होऊ लागला. असली माणसे शेतावर राबायला कधी तयार होणार नाहीत किंवा एखादा ग्रामोद्योग करण्यास कधी तयार होणार नाहीत, कारण शाळेत त्यांना असली कामे करावयाचे कधी वळणच दिले गेले नाही आणि त्यांना असल्या कामाबद्दल आदरही वाटत नाही.

अशा प्रकारच्या शिक्षणपद्धतीचा समाजावर जो नैतिक परिणाम व्हावयाचा तोच झाला. नैतिक निर्बंधांकडे क्वचितच लक्ष दिले जाऊ लागले. इतरांच्या हक्कांची बूज कोणी राखेनासे झाले. विद्यार्थ्यांपुढे सतत जर कोणते ध्येय ठेवले गेले असेल, तर ते व्यक्तिगत प्रगतीचे! शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये तीव्रतम स्पर्धा असे. परीक्षेत वरचा नंबर मिळविण्यासाठी सारी धडपड. या स्पर्धेचे स्वरूप अनिष्ट होत गेले व त्यातून अप्रामाणिकपणा वाढला व लाचलुचपतीला खतपाणी मिळाले. सर्वांच्या बौद्धिक विकासाला आणि कर्तृत्वाला पुरेसा वाव मिळेनासा झाला. यामुळे जबाबदारीची जाणीव किंवा शिस्तप्रियता निर्माण होईना. स्वार्थापुढे दुसऱ्यांच्या हिताची पर्वा कोणीही करेनासे झाले.

**(क्रमश:)**

'जीवन शिक्षण' हे मासिक, संचालक तथा संपादक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यासाठी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छपाई करून प्रकाशक तथा संचालक, कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक

'Jeevan Shikshan' a monthly magazine owned by State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune printed at Runa Graphics, behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411041 and published by Director, Kaustubh Diwegaonkar (I.A.S.) at State Council of Educational Research and Training, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Kaustubh Diwegaonkar (I.A.S.), Director

# इतिहासाच्या पानांवरून

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

## भातुकलीचा खेळ आणि शिक्षण

मुले अनुकरणातून अनेक गोष्टी शिकतात. मुलांचे निरीक्षण उत्तम असते. मोठ्यांचे वागणे, बोलणे त्यांचे व्यवहार यांची ते नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. भातुकलीचा खेळ हा असाच प्रकार आहे. या खेळात मुले घरातील मोठ्या माणसांच्या भूमिका करतात. यामध्ये कधी बाहुला-बाहुलीचे लग्न घडते, अथवा सण-समारंभ साजरा होतो. कधी आई-वडील बनून स्वयंपाक करण्यापासून सर्व कामे केली जातात. हा खेळ मागच्या पिढ्यांमध्ये सर्वत्र प्रचलित होता. त्यासाठी छोट्या स्वरूपातील भांडीकुंडी, घरातल्या वस्तू जमवल्या जात. या वस्तूंनाच 'भातुकली' म्हणत. या वस्तू माती, लाकूड, धातू अशा सर्व प्रकारात उपलब्ध असायच्या. तेव्हा मुलांना आजच्यासारखी मनोरंजनाची साधने उपलब्ध नव्हती. अगदी आवडीने अंगणात, ओसरीवर भातुकलीचा खेळ मांडला जायचा. त्या वेळी मुलं-मुली आपापल्या भूमिकेत रमत, तसेच त्याचप्रमाणे बोलत. या खेळाचा शिक्षणासाठी उत्तम उपयोग झालेला दिसतो. मराठी शालापत्रकाच्या सप्टेंबर १८९३ च्या अंकात भातुकलीच्या खेळावरच्या पुस्तकाची जाहिरात आहे. ते पुस्तक चित्रशाळा प्रेसने प्रकाशित केले होते.

मुलांच्या आवडीचा, त्यांच्या भावविश्वाचा वापर करून, मुला-मुलींना वाचनाची गोडी लागावी, यासाठी केलेला तो उपक्रम स्तुत्य वाटतो. पुढच्या अनेक वर्षांत ती जाहिरात होती. यावरून ते पुस्तक त्या काळात मुलांच्या आवडीचे ठरले असावे असे वाटते. भातुकलीच्या खेळामुळे नातेसंबंध आणि त्यातील भावबंध बालपणीच कळायचे. तो एक कुटुंबसंस्थेच्या संस्काराचा भाग होता. आता मुलांच्या हातात अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आली आहेत. ती कार्टूनमध्ये आणि कॉम्प्युटर गेममध्येच अधिक रमताना दिसतात, पण एके काळी भातुकलीसारख्या पारंपरिक खेळाचा शिक्षणासाठी उपयोग करून घेतला होता, हे विशेष वाटते.

मानवी आयुष्यातील ज्ञान ही पायाभूत गोष्ट आहे. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढावी आणि टिकावी; तसेच त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील रहावे.

*- डॉ. बाबासाहेब आंबेडकर*




भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना जयंतीनिमित्त

**विनम्र अभिवादन!**

RTE अंतर्गत २५% प्रवेश प्रक्रिया कार्यक्रमाचे उद्घाटन करताना प्रधान सचिव, मा. श्री. रणजितसिंह देओल (भा.प्र.से.), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. सूरज मांढरे (भा.प्र.से.), आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व मा. श्री. शरद गोसावी, संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.






दि. १२ एप्रिल, २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या गाभा समितीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना गाभा समितीचे अध्यक्ष तथा संचालक, मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर, बैठकीस उपस्थित मा. श्री. रमाकांत काठमोरे, सहसंचालक तथा सदस्य-सचिव, गाभा समिती आणि उपसंचालक व गाभा समिती सदस्य.

Date of Publication 3 May 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th May 2023
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ______________________
______________________
______________________
______________________